सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, ३ एप्रिल २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १२५ । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**

चेन्नई वि. पंजाब

वेळ : सायं.७.३० वाजता

ठिकाण : चेन्नई


**सोलापूर तरुण भारत** — प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

### नम्र सूचना!

छपाई साहित्याच्या दरवाढीमुळे नाईलाजास्तव आजपासून **'तरुण भारत'** अंकाची किंमत ८ रुपये करीत आहोत. तरी आमचे वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी आम्हाला नेहमीप्रमाणे सहकार्य करावे, ही विनंती.

**- व्यवस्थापक**

### विचारपुष्प



शाखेच्या संस्कारक्षमतेचे प्रमुख लक्षण कोणते मानता येईल? तर तेथील कार्यकर्ता, स्वयंसेवकांच्या मनात शाखेविषयी विलक्षण आत्मीयता असणे आणि त्यांच्या मनात शाखेची वेगवेगळ्या प्रकाराने वाढ करण्याचा उत्साह असणे. यासाठी आपापल्या उपशाखांमधील कार्यकर्ता, स्वयंसेवकांना नवनवीन कार्यक्रम योजण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# पश्चिम बंगाल सर्वाधिक ध्रुवीकरण झालेले राज्य

## न्यायिक अधिकाऱ्यांवरील हल्ल्यानंतर सर्वोच्च न्यायालय संतप्त




### रात्री दोन वाजेपर्यंत परिस्थितीवर नजर

**बंगालच्या महाधिवक्त्यांनी आचारसंहितेचा मुद्दा मांडताच सरन्यायाधीश संतापले. ते म्हणाले, दुर्दैवाने, तुमच्या राज्यात प्रत्येकजण राजकीय भाषा बोलतो. हे देशातील सर्वाधिक ध्रुवीकरण झालेले राज्य आहे. तुम्ही आम्हाला कठोर टिप्पणी करण्यास भाग पाडत आहात. तिथे नेमके कोण उपद्रवी आहेत हे आम्हाला माहीत नाही असे तुम्हाला वाटते का? मी स्वतः रात्री दोन वाजेपर्यंत सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून होतो. हे अत्यंत दुर्दैवी आहे.**

### आदेश आमच्या न्यायालयाचा

**सुनावणी दरम्यान न्या. जॉयमाल्या बागची म्हणाले की, आम्ही येथे विशेष अधिकाऱ्यांच्या संरक्षणासाठी आहोत. त्यांनी दिलेला आदेश हा आमच्या न्यायालयाचा आदेश मानला जातो. निवडणूक आयोगाने कुठूनही सुरक्षा दले आणावीत, पण न्यायालयीन अधिकाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करावी. सर्व राजकीय नेत्यांनी या घटनेचा एका सुरात निषेध करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.**

**नवी दिल्ली, २ एप्रिल**

मालदा जिल्ह्यातील एका गावात विशेष सघन पुनरावलोकन अर्थात एसआयआर कर्तव्यावर असलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना बुधवारी रात्री घातलेला घेराव आणि त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या घटनेवर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी संताप व्यक्त करीत पश्चिम बंगाल हे राजकीयदृष्ट्या सर्वाधिक ध्रुवीकरण झालेले राज्य असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणाची चौकशी एनआयए किंवा सीबीआयने करावी तसेच बंगालमध्ये केंद्रीय दल तैनात करावे, असा निर्देश न्यायालयाने दिला.

तीन महिलांसह एकूण सात न्यायिक अधिकाऱ्यांना आंदोलकांनी ओलीस ठेवल्यामुळे संतप्त झालेल्या सरन्यायाधीशांनी ही कठोर टिप्पणी केली. पश्चिम बंगालमध्ये प्रत्येकजण राजकीय भाषा बोलतो, असे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी म्हटले.

बंगालमधील कालियाचक येथे मतदार यादीतील नावे वगळल्याच्या निषेधार्थ मोठे आंदोलन झाले. एसआयआर प्रक्रियेत सहभागी असलेल्या सात न्यायिक अधिकाऱ्यांना मालदा जिल्ह्यात सुमारे नऊ तास ओलीस ठेवण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, हे न्यायालयीन अधिकारी न्यायाधीन प्रकरणांची पडताळणी करून संबंधित मतदारांना यादीत ठेवायचे की नाही, याचा निर्णय घेत होते. आंदोलकांनी सुरुवातीला न्यायालयीन अधिकाऱ्यांची भेट मागितली, मात्र ती नाकारण्यात आली. त्यानंतर संध्याकाळी चार वाजताच्या सुमारास आंदोलकांनी बीडीओ कार्यालयाला घेराव घातला आणि सात अधिकाऱ्यांना ओलिस ठेवले. यामध्ये एका महिला अधिकारी आणि तिच्या पाच वर्षांच्या मुलाचाही समावेश होता.

नऊ तासांच्या थरारानंतर रात्री एक वाजताच्या सुमारास पोलिस पथकाने या अधिकाऱ्यांची सुटका केली. अधिकाऱ्यांना सुरक्षित बाहेर काढत असताना आंदोलकांनी पोलिसांच्या वाहनांवर तुफान दगडफेक केली. हे आंदोलन जवळच्या भागातही पसरले. बांबू आणि फर्निचर टाकून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १२ रोखून धरला.

आज या प्रकरणी सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्या. विपुल पांचोली यांच्या न्यायासनाने बंगाल सरकारवर कडक ताशेरे ओढत याला गुन्हेगारी स्वरूपाचे अपयश म्हटले आहे. न्यायालयाने मुख्य सचिव, पोलिस महासंचालक, पोलिस अधीक्षक आणि मालदा जिल्हाधिकाऱ्यांनाही फटकारले. रात्री ११ वाजेपर्यंत तुमचे जिल्हाधिकारी तिथे हजर नव्हते. मला रात्री तोंडी अत्यंत कडक आदेश द्यावे लागले. पाच वर्षांच्या मुलाला अन्न आणि पाणीही मिळू दिले गेले नाही. हा प्रकार केवळ अधिकाऱ्यांना धमकावण्याचा प्रयत्न नसून, न्यायालयाच्या अधिकाराला आव्हान देण्याचा प्रयत्न आहे. हा पश्चिम बंगाल सरकारचा कर्तव्यातून काढलेला पळपुटा पाय आहे. माहिती असूनही अधिकाऱ्यांची सुरक्षित सुटका का केली नाही, याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल, अशा शब्दांमध्ये न्यायालयाने बंगालच्या वकिलांना फटकारले. *(वृत्तसंस्था)*

# सोलापूरचे 'आशीर्वाद' आता नागपूरचे जिल्हाधिकारी

## एस.कार्तिकेयन सोलापूरचे नवे जिल्हाधिकारी





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ एप्रिल-**

राज्यातील आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा सपाटा सुरुच असून आणखी दोन अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. यात सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा समावेश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या होम ग्राउंड असलेल्या नागपूरच्या जिल्हाधिकारीपदी कुमार आशीर्वाद यांची बदली झाली आहे. दरम्यान, कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस.कार्तिकेयन यांची सोलापूरचे जिल्हाधिकारीपदी बदली करण्यात आली.

सोलापूरचे मावळते जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आपल्या कामगिरीचा ठसा उमटविला. विमानतळ, पंढरपूर वारी, आयटी पार्क, सीना नदीला आलेल्या महापुरातील त्यांचे काम जिल्ह्यातील नागरिकांसाठी संस्मरणीय ठरले आहे. या काळात त्यांनी आपल्या प्रशासकीय कुशलतेने धाडसी निर्णय घेतले. कडक शिस्त आणि कामातील तत्परतेमुळे त्यांची कारकीर्द सोलापूरकरांसाठी लक्षवेधी ठरली. युवा कलेक्टर म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जाते.

विशेष म्हणजे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही प्रशासकीय तथा जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून निवडणुका शांततेत पार पाडण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आता, त्यांना थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या होम ग्राऊंडमध्ये म्हणजेच नागपूरच्या जिल्हाधिकारीपदी बदली देण्यात आली आहे. सध्या डॉ.बिपीन इटणकर हे नागपूरचे कलेक्टर आहेत, त्यांच्याकडून पदभार स्वीकारावा, असे बदली पत्रात नमूद करण्यात आले आहे.


### कार्तिकेयन यांचा परिचय

सोलापूरचे मावळते जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे २०१६ च्या बॅचचे महाराष्ट्र केडरचे तर नवे जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन हे २०११ च्या बॅचचे केरळ कॅडरचे अधिकारी आहेत. १८ एप्रिल १९९१ रोजी जन्मलेले एस.कार्तिकेयन हे तामिळनाडू राज्यातील असून त्यांचे शिक्षण एमबीबीएस पर्यंत झाले आहे. तामिळसह मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे.

# इराणची लष्करी क्षमता नष्ट

## डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा; नाटोवरही भडकले

**वॉशिंग्टन. २ एप्रिल**



इराणची लष्करी क्षमता नष्ट करण्यात यश आले. त्यांचे नौदल, वायुदल उद्ध्वस्त झाले आहे आणि त्यांचे नेतृत्वही संपवण्यात आले. प्रमुख संरक्षण कारखाने आणि पायाभूत सुविधा बहुतांशी उद्ध्वस्त झाल्यामुळे इराणची क्षेपणास्त्र प्रक्षेपण क्षमता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. युद्धात अमेरिकेचा विजय झाला आहे. करार होईपर्यंत आम्ही युद्धातून मागे हटणार नाही. त्यांनी करारास नकार दिल्यास पाषाण युगात, पाठवू असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला दिला.

यावेळी त्यांनी मदत करण्यास नकार देणाऱ्या नाटो देशांवर ताशेरे ओढले. इराणविरुद्धच्या युद्धाचा उद्देश आणि ३० दिवसांच्या काळात अमेरिकेला आलेल्या यशाची माहिती ट्रम्प यांनी देशाला केलेल्या संबोधनातून दिली. ट्रम्प म्हणाले, अमेरिकेचे मुख्य उद्दिष्ट पूर्णत्वाच्या जवळ येत असल्याने हा संघर्ष काही कालावधीत संपवला जाईल. करार करण्यास टाळाटाळ केल्यास अमेरिका इराणला पुन्हा पाषाण युगात ढकलून देईल. गेल्या चार आठवड्यात आमच्या सैन्याने युद्धात वेगवान, निर्णायक आणि मोठा विजय मिळवला आहे. असा विजय यापूर्वी फार कमी लोकांनी पाहिला असेल, असे ते म्हणाले. इराणची ड्रोन क्षमता आणि क्षेपणास्त्र ताकद खूप कमकूवत करण्यात यश आले. त्यांनी चालवलेली दहशतवादी राजवट आता संपुष्टात आली आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीच्या सुरक्षेची जबाबदारी या मार्गाने व्यापार करणाऱ्या देशांनी घ्यायला हवी. होर्मुझची सुरक्षा अमेरिकेची जबाबदारी नाही. दरम्यान ट्रम्प यांच्या दाव्यांची डेमोक्रॅटिक खासदार ग्रेगरी मीक्स, ॲडम स्मिथ आणि जिम हाइम्स यांनी खल्ली उडवली.

# अवकाळीचा शेतीला फटका


## लवकर नुकसान भरपाई देणार, राज्याचे कृषी मंत्री दत्तामामा भरणे यांची ग्वाही

**पुणे** : राज्यात वादळी वारा, मेघगर्जनेसह अवकाळी पाऊस कोसळत असून प्राथमिक अंदाजानुसार सुरे १ लाख २२ हजार हेक्टरहून (३ लाख ५ हजार एकर) अधिक क्षेत्रावरील शेती पिकांचे नुकसान झाले आहे.

प्रामुख्याने नाशिक भागात सर्वाधिक २९ हजार ८१२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्यापाठोपाठ अहिल्यानगर, जळगाव, धुळे, बुलढाणा जिल्ह्यांध्ये पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, याबाबत बाधित क्षेत्रफळाचे ताबडतोब मंडलनिहाय पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या असून, बाधितांना लवकर मदत दिली जाईल, अशी ग्वाही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. कृषी मंत्री भरणे यांनी भोर तालुक्यातील वडगाव डाळ येथे भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी, बाधित शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करत शेतकऱ्यांना दिलासा दिला. अहिल्यानगर, जळगाव, धुळे आणि बुलढाणा जिल्ह्यांध्येही पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अवकाळी पावसामुळे रब्बी पिकांसह फळबागा, कांदा, गहू, हरभरा आदी पिकांना मोठा फटका बसला असल्याचे प्राथमिक अहवालातून स्पष्ट झाले. नाशिक विभागात सर्वाधिक नुकसान नोंदवले गेले असून, येथील शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. अहिल्यानगर, जळगाव, धुळे आणि बुलढाणा या जिल्ह्यांध्येही हजारो हेक्टरवरील पिके उध्वस्त झाली आहेत.



'चांगभलं'



# गुलालाच्या उधळणीत दख्खनचा राजा श्री जोतिबाचा पालखी सोहळा

**तभा वृत्तसेवा । अरुण बळप,**
**कोल्हापूर, दि.२ एप्रिल-**

श्री जोतिबाच्या नावानं चांगभलं'च्या अखंड जयघोषात, गुलालाच्या न्हाऊन निघालेल्या वातावरणात आणि लाखो भाविकांच्या उपस्थितीत श्रीक्षेत्र वाडी रत्नागिरी येथे जोतिबा चैत्र यात्रेचा मुख्य पालखी सोहळा अमाप उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रविण डबाणे यांनी तोफेची सलामी दिल्यानंतर, विविध रंगी सुगंधी फुलांनी सजवलेली पालखी मुख्य मंदिरातून बाहेर आली. यावेळी उपस्थित हजारो भाविकांनी एकाच वेळी गुलाल आणि खोबऱ्याची उधळण केली. ज्यामुळे संपूर्ण मंदिर परिसर आणि डोंगर चैतन्यमयी 'गुलालमय' झाला. मंदिरातून प्रस्थान झाल्यानंतर पालखी सोहळा गजगतीने मूळमाया यमाईदेवीच्या मंदिराकडे रवाना झाला. मार्गावर भाविकांनी पालखीवर गुलाल व खोबऱ्यांची उधळण करत दर्शन घेतले. यमाई मंदिरात पालखी पोहोचल्यानंतर तिथे यमाईदेवीचा विवाह सोहळा पार पडला. आकर्षक फटाक्यांच्या आतषबाजीने आसमंत उजळून निघाला होता. रात्री पालखी सोहळा पुन्हा मुख्य मंदिरात परतला. पालखी सदरेवर विराजमान झाल्यानंतर गजानन डवरी, मच्छिंद्र डवरी आणि केदार डवरी यांनी पारंपारिक डवरी गीते सादर केली. दुपारी ४ च्या सुमारास जोतिबा डोंगर परिसरात मेघगर्जनेसह मुसळधार पावसाने हजेरी लावली.

पावसामुळे रस्त्यावर साचलेला गुलाल आणि चिखलामुळे निर्माण झालेली निसरडी परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना करण्यात आल्या. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने यंदा 'आयआयटी मंडी'च्या तज्ज्ञांच्या मदतीने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा प्रकल्प राबवला. त्यामुळे यात्रेतील गर्दीवर सलग लक्ष ठेवणे, वाहतुकीचे प्रभावी व्यवस्थापन करणे शक्य झाले.

### सोलापूरच्या जोतिबा भक्त मंडळाच्यावतीने अन्नदान

सोलापूर येथील श्रीक्षेत्र जोतिबा भक्त मंडळाच्या वतीने दरवर्षी याठिकाणी अन्नदान करण्यात येते. यंदा तीन दिवस अन्नदान करण्यात आले. या मंडळातर्फे दर रविवारी व पौर्णिमेलाही अन्नदान केले जाते. हे अन्नदान सचिव रमेश शिंदे व खजिनदार अरुण बळप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# ई-वाहनांना मिळणार आर्थिक बूस्ट

**मुंबई, २ एप्रिल**

राज्यात इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला गती देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मोठा निर्णय घेत विविध कंपन्या आणि शहरी वाहतूक उपक्रमांना कोट्यवधी रुपयांचा प्रोत्साहन निधी मंजूर केला आहे.

महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण- २०२५ अंतर्गत हा निधी वितरित करण्यात येत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. ई-वाहनांची मागणी वाढवण्यासाठी बजाज ऑटो लिमिटेड, महिंद्रा इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेड आणि युलर मोटर्स प्रायव्हेट लिमिटेड या उत्पादक कंपन्यांना तीनचाकी वाहनांसाठी एकूण २.५१ कोटी रुपयांहून अधिक अनुदान देण्यात आले आहे. तसेच सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम करण्यासाठी बृहन्मुंबई इलेक्ट्रिक सप्लाय अॅण्ड ट्रान्सपोर्ट, नागपूर महानगरपालिका परिवहन, पुणे महानगर परिवहन महामंडळ, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, नवी मुंबई महानगर परिवहन आणि ठाणे महानगर परिवहन या सहा प्रमुख संस्थांना मिळून ४.५५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ई-दुचाकी आणि ई-तीनचाकी वाहनांच्या प्रोत्साहनासाठी एथर एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड, टीव्हीएस मोटर कंपनी, चेतक टेक्नॉलॉजी आणि इतर कंपन्यांना एकूण ४.४५ कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम वितरित केली जाणार आहे.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# मंत्रालयातील १० हजार डीजी प्रवेश कार्ड गायब

## सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह ● प्रशासनाची कठोर भूमिका

◆ **मुंबई, २ एप्रिल**

मंत्रालयात प्रवेशासाठी वापरल्या जाणाऱ्या डीजी ॲपद्वारे प्रवेशासाठी दिलेले सुमारे १० हजार प्रवेश कार्ड गहाळ झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अभ्यागतांनी वापरानंतर कार्ड परत न केल्यामुळे हा प्रकार घडल्याचे स्पष्ट झाले असून, यामुळे मंत्रालयाच्या सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मंत्रालयात येणाऱ्या अभ्यागतांना डीजी प्रवेश ॲपद्वारे कार्ड दिले जाते. काम पूर्ण झाल्यानंतर हे कार्ड गेटवरील बॉक्समध्ये जमा करणे बंधनकारक असते. मात्र, अनेकांनी ही नियमावली पाळली नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर कार्ड परतच आले नाहीत. त्यामुळे गहाळ कार्डांची संख्या जवळपास १० हजारांपर्यंत पोहोचली असल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, प्रशासनाकडे अभ्यागतांचा डेटा उपलब्ध असल्याने संबंधित व्यक्तींशी संपर्क साधून कार्ड परत मिळवण्याचा प्रयत्न सुरू आहे. आतापर्यंत सुमारे ३०० कार्ड परत मिळाल्याची माहिती समोर आली आहे. मंत्रालयातील वाढती गर्दी लक्षात घेऊन राज्य सरकारने फेस डिटेक्शन आणि डीजी प्रवेश ॲप प्रणाली लागू केली होती. या प्रणालीमुळे प्रवेश प्रक्रिया सुलभ झाली असून, रांगेत उभे राहण्याचा त्रास कमी झाला आहे. मात्र, कार्ड परत न करण्याच्या या प्रकारामुळे आता ही व्यवस्था अडचणीत येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मंत्रालयात ही डिजिटल सेवा खऱ्या अर्थाने २०१७-१८ च्या सुमारास अधिक सक्षम करण्यात आली, जेणेकरून पारदर्शकता वाढेल. सध्या राबवल्या जात असलेल्या या विशेष मोहिमेमुळे आतापर्यंत सुमारे ३०० कार्ड्स परत मिळवण्यात यश आले आहे. तरीही, अद्याप हजारो कार्डे बाहेर असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव प्रशासनाने आता अधिक कठोर भूमिका घेतली आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### प्रशासनाचा कडक पवित्रा

- **जुने कार्ड नसेल तर प्रवेश नाही:** ज्या अभ्यांगतांच्या नावावर आधीचे कार्ड थकीत आहे, त्यांना ते जमा केल्याशिवाय नवीन प्रवेश दिला जाणार नाही.
- **कठोर डेटा ट्रॅकिंग:** अभ्यांगत कोणत्या विभागात आणि कोणत्या अधिकाऱ्याला भेटायला आले होते, याची संपूर्ण नोंद संगणकीय प्रणालीत असल्याने संबंधित व्यक्तीचा शोध घेणे आता सोपे झाले आहे.
- **रिकव्हरी बॉक्सची सक्ती:** मंत्रालयातून बाहेर पडताना मुख्य प्रवेशद्वारावर ठेवलेल्या रिकव्हरी बॉक्समध्ये कार्ड टाकणे आता प्रत्येकासाठी सक्तीचे करण्यात आले आहे.


## महत्त्वाचे

### अमित जोगी हत्या प्रकरणात दोषी

**बिलासपूर :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रामअवतार जग्गी यांच्या २३ वर्षांपूर्वी झालेल्या हत्या प्रकरणात छत्तीसगड उच्च न्यायालयाने गुरुवारी माजी मुख्यमंत्री अजित जोगी यांचे पुत्र अमित जोगी यांना दोषी ठरवले. तीन आठवड्यांत शरण या, असा आदेश न्यायालयाने दिल्याची माहिती सीबीआयच्या वकिलाने दिली. अमित जोगी हे दिवंगत अजित जोगी यांनी स्थापन केलेल्या जनता काँग्रेस छत्तीसगडचे अध्यक्ष आहेत. या प्रकरणात सत्र न्यायालयाने त्यांना २००७ मध्ये निर्दोष सोडले होते. सीबीआयने आव्हान दिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार उच्च न्यायालयाने मागील महिन्यात २००३ मधील हत्या प्रकरणाची पुन्हा सुनावणी सुरू केली. अमित जोगी यांना निर्दोष सोडण्याचा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय गुरुवारी छत्तीसगड उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश रमेश सिन्हा आणि न्या. अरविंद कुमार वर्मा यांच्या खंडपीठाने रद्दबातल ठरवला आणि त्यांना शरणागती पत्करण्याचा निर्देश दिला.

### अहमदाबाद-कोलंबो थेट विमानसेवा सुरू

**अहमदाबाद :** श्रीलंकेची खाजगी विमान कंपनी फिट्सएअर १५ मे पासून अहमदाबाद आणि कोलंबो दरम्यान थेट विमानसेवा सुरू करणार आहे. आठवड्यातून तीन वेळा चालणाऱ्या या सेवेमुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल आणि गुजरातहून श्रीलंकेकडे येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत वाढ होण्याची अपेक्षा आहे. ही विमान कंपनी सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या दिवशी विमानसेवा चालवेल, ज्यामुळे अहमदाबाद आणि कोलंबोदरम्यानची ही पहिली थेट विमानसेवा ठरेल. सध्या गुजरातहून येणाऱ्या पर्यटकांना मुंबई किंवा चेन्नईमार्गे कनेक्टिंग फ्लाईट्स घ्याव्या लागतात. सध्या दरवर्षी सुमारे २५ ते ३० हजार पर्यटक गुजरातहून श्रीलंकेला भेट देतात. या थेट कनेक्टिव्हिटीमुळे येत्या काही वर्षांत ही संख्या दुप्पट होईल, अशी आम्हाला अपेक्षा आहे. श्रीलंकेची पहिली खाजगी आंतरराष्ट्रीय विमान कंपनी, फिट्सएअर, सिटी ऑफ ड्रीम्स श्रीलंका, सिनामन हॉटेल्स अँड रिसॉर्ट्स आणि वॉकर्स टूर्स यांच्या भागीदारीचा भाग म्हणून या मार्गावर विमानसेवा चालवेल.



अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी गुरुवारी आपल्या कुटुंबासह अयोध्येतील राम मंदिराला भेट दिली. हनुमान जयंतीनिमित्त मंदिराला भेट देताना अदानी यांच्यासोबत त्यांच्या पत्नी प्रीती अदानी आणि मुलगा करण अदानी होते. श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने दिलेल्या माहितीनुसार, अदानी कुटुंबाने मंदिरातील विधींमध्ये भाग घेतला आणि प्रार्थना केली.

### सुप्रीम कोर्टात ट्रम्प यांची उपस्थिती

**वॉशिंग्टन :** स्वतःच्याच एका निर्णयाशी संबंधित खटल्याची सुनावणी पाहण्यासाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. अमेरिकेच्या इतिहासात राष्ट्राध्यक्षांची सुनावणीला उपस्थिती राहण्याची ही पहिलीच वेळ आहे.

बर्थराईट सिटीझनशिप अर्थात् जन्माने मिळणारे नागरिकत्वाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. यावर बुधवारी सुनावणी पार पडली. यावेळी ट्रम्प काळ्या सूटमध्ये आणि लाल टाय लावून व्हाईट हाऊसवरून न्यायालयात पोहोचले. सार्वजनिक गॅलरीच्या पहिल्या रांगेत बसून सुमारे एक तास सरकारी वकिलाचा युक्तिवाद ऐकला. सुनावणीवेळी उपस्थित नागरिक आणि वकिलांनी घोषणा दिल्या.

# इंडिया आघाडीतील घटक पक्षांतच लढत

## रालोआ तिरंगी लढत करण्याच्या प्रयत्नात

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली,२ एप्रिल**





१४० सदस्यीय केरळ विधानसभेसाठी ९ एप्रिलला एकाच टप्प्यात मतदान होत आहे. केरळ विधानसभा निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे राज्यात इंडिया आघाडीतील दोन घटक पक्षाच्या नेतृत्वातील आघाडीत चुरशीची लढत होत आहे. भाजपा नेतृत्वातील रालोआ ही लढत तिरंगी करण्याच्या प्रयत्नात आहे.

माकपच्या नेतृत्वातील डावी लोकशाही आघाडी (एलडीएफ) तसेच काँग्रेसच्या नेतृत्वातील संयुक्त लोकशाही आघाडी (युडीएफ) यांच्यात विधानसभा निवडणुकीची लढत होत आहे. गेल्या काही वर्षात राज्यात भाजपाचा प्रभाव बऱ्यापैकी वाढला आहे. त्यामुळे राज्यात भाजपाने या दोन्ही आघाड्यांसमोर आव्हान उभे केले आहे. सलग दोन विधानसभा निवडणुकीत आतापर्यंत राज्यात कोणत्याच आघाडीला सत्ता मिळत नव्हती. मात्र २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत ही परंपरा मोडल्या गेली, एलडीएफने सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवली. १९८० पासून राज्यात. १९८०, १९८७, १९९६, २००६, २०१६ आणि २०२१ अशा सहा विधानसभा निवडणुका एलडीएफने जिंकल्या.

२०२१ च्या विधानसभा निवडणुकीत एलडीएफला ९७ तर युडीएफला ४१ जागा मिळाल्या, दोन जागा अन्य पक्षांना मिळाल्या.

केरळमध्ये माकपच्या नेतृत्वातील डाव्या लोकशाही आघाडीत भाकप, केरळ काँग्रेस मणी गट, इंडियन सोशालिस्ट जनता दल, राष्ट्रीय जनता दल, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस एस आणि केरळ काँग्रेस बाळकृष्ण पिल्लई गट, नॅशनल सेक्युलर कॉन्फरन्स, जनाधिपत्य केरळ काँग्रेस यांचा समावेश आहे. काँग्रेसच्या नेतृत्वातील युडीएफमध्ये इंडियन युनियन मुस्लिम लीग( आययुएमएल), केरळ काँग्रेस जेकब गट, रिव्होल्युशनरी सोशालिस्ट पार्टी(आरएसपी), तृणमूल काँग्रेस केरळ, केरळ कामराज काँग्रेस या छोट्या पक्षांचा समावेश आहे. युडीएफमध्ये काँग्रेस सर्वाधिक म्हणजे ९२ जागा लढवत आहे, उर्वरित जागा त्यांनी आघाडीतीरल घटक पक्षांसाठी सोडल्या आहेत.

# राहुल गांधींनी केरळला दाखवले महिला मुख्यमंत्र्याचे स्वप्न

◆ **नवी दिल्ली, २ एप्रिल**

केरळ हे देशातील सर्वात साक्षर राज्य मानले जाते, पण राज्यात आतापर्यंत एकही महिला मुख्यमंत्री झाली नाही. मला त्या दिवसाची प्रतिक्षा आहे, ज्या दिवशी केरळच्या मुख्यमंत्रिपदावर एक महिला विराजमान झालेली असेल, असे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी एका प्रचार सभेत नुकतेच म्हटले आहे.



राहुल गांधी यांच्या या विधानावर सभेला उपस्थित महिलांनी टाळ्या वाजवल्या, पण पुरुषांनी मात्र त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. विशेष म्हणजे केरळमध्ये पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदारांची संख्या जास्त आहे. राज्यात महिला मतदारांची संख्या १ कोटी ३९ लाख असून पुरुष मतदारांची संख्या १ कोटी ३२ लाख आहे. राज्यातील महिला मतदारांना आपल्या बाजूला वळवण्यासाठी राहुल गांधी यांनी महिला मुख्यमंत्र्याचा मुद्दा छेडला, असे मानले जाते. केरळ विधानसभेच्या १४० जागांसाठी ४५७ उमेदवार रिंगणात आहे, यात महिला उमेदवारांची संख्या फक्त ५४ आहे. यातीन प्रमुख राजकीय आघाड्यांच्या महिला उमेदवारांची संख्या ३९ आहे. भाजपाच्या नेतृत्वातील रालोआने सर्वाधिक म्हणजे १४ महिलांना उमेदवारी दिली आहे. यात भाजपाच्या ११ महिला उमेदवारांचा समावेशआहे.

डावी लोकशाही आघाडी म्हणजे एलडीएफने १३ महिलांना रिंगणात उतरवले आहे. संयुक्त लोकशाही आघाडीने म्हणजे युडीएफने फक्त १२ महिलांवर विश्वास दाखवला. राज्याला महिला मुख्यमंत्र्याचे स्वप्न दाखवणाऱ्या काँग्रेसच्या ९२ उमेदवारांच्या यादीत फक्त ९ महिला उमेदवार आहेत. याला काँग्रेसमधूनही विरोध झाला. २०२१ मध्येही काँग्रेसने फक्त १० महिलांना उमेदवारी दिली होती. विद्यमान विधानसभेत १२ महिला आमदारांचा समावेश आहे. १९९६ ते २००१ च्या विधानसभेत सर्वाधिक म्हणजे १४ महिला आमदार होत्या. ◀(तभा वृत्तसेवा)

### परिचारिकांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक

राज्यातील महिला मतदारांना आपल्या बाजूला वळवण्यासाठी राहुल गांधी यांनी केरळी परिचारिकांच्या सेवाभावी वृत्तीचे जाहीर सभेत कौतुक केले. माझी आई सोनिया गांधी रुग्णालयात दाखल असतांना मी रात्रभर तिच्याजवळ थांबलो होतो, त्यावेळी दर एक तासाने एक परिचारिका आईला तपासण्यासाठी येत होती. ती केरळी होती. तुम्ही रात्री थोडा वेळ तरी झोपता की रात्रभर काम करता, असे मी त्याला परिचारिकेला विचारल्यानंतर तिने मी रात्रभर जागते, रुग्णाची काळजी करते, असे उत्तर मला दिले, असे राहुल गांधी म्हणाले.

# भाजपा नेत्यांना पाकिस्तानी दूरध्वनी क्रमांकांवरून धमक्या

### टूलकिटच्या माध्यमातून केले जातेय लक्ष्य

◆ **चंदीगड, २ एप्रिल**

सेक्टर-३७ मधील पंजाब भाजपा मुख्यालयाच्या बाहेर झालेल्या ग्रेनेड स्फोटामुळे भाजपाच्या नेत्यांना धक्का बसला आहे. पंजाबच्या कित्येक भाजपा नेत्यांना मागील काही दिवसांपासून पाकिस्तानी क्रमांकावरून धमकीचे कॉल्स येत असल्याने या स्फोटाची भीती नेत्यांना पूर्वीपासूनच होती.

मागील काही काळात भाजपाच्या संघटन सचिवांना जीवे मारण्याची धमकी देणारे पत्र चंदीगड कार्यालयात आले होते. याची माहिती चंदीगड पोलिसांना देण्यात आली होती, असे भाजपाच्या एका नेत्याने सांगितले. चंदीगड मुख्यालयाव्यतिरिक्त लुधियानातील भाजपा मुख्यालयात कित्येक वेळा असे कॉल्स आणि धमक्यांचे पत्र आले आहेत. भाजपाच्या विविध नेत्यांना ठार करण्याची आणि ग्रेनेडने उडवण्याची धमकी देण्यात आली. याबाबतच्या तक्रारी पंजाब पोलिसांना देण्यात आल्या आहेत. केवळ इतकेच नव्हे, तर काही दिवसांपूर्वी टूलकिटच्या माध्यमातून काही लोकांनी भाजपाच्या नेत्यांना लक्ष्य केले होते. त्यांनी जीवे मारण्याची धमकी देणे हा उद्देश त्यामागे होता. त्याची तक्रारही पोलिसांत झाली आहे. भाजपा नेत्यांना आलेल्या धमकीनंतर कित्येक वेळा चंदीगड आणि पंजाब पोलिसांनी विविध नेत्यांच्या सुरक्षेचे विश्लेषण केले. यानंतर पंजाबमधील भाजपाच्या काही नेत्यांची सुरक्षा वाढवण्याचा विचारही केला जात आहे. चंदीगड आणि लुधियाना कार्यालयात भाजपा नेत्यांना आलेले धमकीचे पत्र पोलिसांना सोपवण्यात आले आहेत. पोलिस त्यांचा तपास करीत आहेत. भाजपाच्या नेत्यांना धमकीचे दूरध्वनी येत असल्याच्या वृत्ताला भाजपाच्या नेत्यांनीही दुजोरा दिला आहे. ◀(वृत्तसंस्था)

# शक्तिपीठ महामार्गाचा नकाशा बदलला

## नागपूर ते गोवा प्रवास १८ तासांवरून ८ तासांवर

◆ **मुंबई, २ एप्रिल**

गेल्या अनेक महिन्यांपासून शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्गाबाबत राज्य सरकारने अखेर एक मोठा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

या प्रकल्पाचा जुना आराखडा गुंडाळून सरकारने आता पूर्णपणे नवीन आणि विस्तारित मार्ग निश्चित केला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सरकारने आता १ लाख १ हजार कोटी रुपयांच्या सुधारित खर्चाला मंजुरी दिली आहे. सुमारे ८५६ किलोमीटर लांबीचा हा महामार्ग विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या चारही विभागांना एका सूत्रात बांधणार आहे. हा महामार्ग १३ जिल्ह्यांतील विकासाची नवी पहाट घेऊन येणार आहे.

धार्मिक पर्यटनासह वाहतूक क्षेत्रातही हा महामार्ग क्रांती घडवून आर्थिक विकासाला वेगवान बनवणार आहे. सध्या नागपूरहून गोव्याला जाण्यासाठी १८ तास लागतात. तो वेळ आता केवळ आठ तासांवर येईल. नव्या आराखड्यात वर्धा, यवतमाळ, बीड, लातूर, नांदेड, हिंगोली, परभणी, धाराशिव, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग अशा १३ जिल्ह्यांतील ४० तालुक्यांचा समावेश आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### लोकभावनेचा आदर राखत बदल

**कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी या महामार्गासाठी जमिनी देण्यास कडाडून विरोध केला होता. त्यामुळे, सरकारने कोल्हापूर जिल्ह्यातील जुन्या मार्गाची अधिसूचना रद्द केली. लोकभावनेचा आदर करत आता हा मार्ग अधिक लोकाभिमुख करण्यासाठी त्यात मोठे तांत्रिक बदल करण्यात आले आहेत. वर्धा जिल्ह्यातील दिग्रजपासून सुरू होणारा हा प्रवास आता सिंधुदुर्गातील बांदा (सावंतवाडी) येथे जाऊन थांबणार आहे.**

### २१ तीर्थक्षेत्रं दर्शन होणार सुलभ

**शक्तिपीठ महामार्गामुळे राज्यातील प्रमुख धार्मिक स्थळे एकमेकांना जोडली जाणार आहेत. सुधारित मार्गामुळे आता माहूर, तुळजापूर आणि कोल्हापूर या तीन शक्तिपीठांसह औंढा नागनाथ, परळी वैद्यनाथ, पंढरपूर, नरसोबाची वाडी आणि ज्योतिबा अशा २१ पवित्र स्थळांना भाविक अत्यंत कमी वेळात भेट देऊ शकतील.**



फिलिपिन्स आणि कंबोडियाशी संबंध असलेल्या एका सायबर फसवणूक रॅकेटचा पर्दाफाश केल्यानंतर आणि बेकायदेशीर सिम बॉक्स वापरणे तसेच त्याची वाहतूक केल्याप्रकरणी पाच जणांना अटक केल्यानंतर गुरुग्राम येथे बुधवारी पोलिस अधिकाऱ्यांनी जप्त केलेले राऊटर्स प्रदर्शित केले

# खासगी ट्रॅव्हल्सची मुजोरी ठेचणार!

### परिवहन मंत्र्यांचा आरटीओला दणका

◆ **मुंबई, २ एप्रिल**

राज्यातील रस्त्यांवर फोफावलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीच्या विळख्यातून लाल परीची सुटका करण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. गुरुवारी मुंबईत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मंत्र्यांनी आरटीओ प्रशासनाला अक्षरशः धारेवर धरले. "आता केवळ कागदी घोडे नाचवून चालणार नाही, तर प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून कारवाई करा; अन्यथा घरचा रस्ता धरा," अशा कडक शब्दांत सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना अल्टिमेटम दिला आहे.

बैठकीत सादर झालेल्या अहवालातून एक धक्कादायक आणि संतापजनक वास्तव समोर आले आहे. अवैध वाहतुकीवर अंकुश ठेवण्यासाठी एसटी महामंडळाने आरटीओला जी वाहने उपलब्ध करून दिली आहेत, ती काही कामचुकार अधिकारी वैयक्तिक कामासाठी वापरत असल्याचे निदर्शनास आले. या दिखाऊ कारवाईवर मंत्र्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. केवळ २० कार्यालयांना मनुष्यबळ मिळाले असून उर्वरित ठिकाणी समन्वयाचा अभाव असल्याबद्दल त्यांनी प्रशासनाची कानउघाडणी केली. ज्या भागात अवैध वाहतूक थांबणार नाही, तेथील अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही, असे सरनाईक यांनी स्पष्ट बजावले आहे. मंत्र्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे आता खासगी ट्रॅव्हल्स माफियांचे आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या यंत्रणेचे धाबे दणाणले आहेत. या कडक अंमलबजावणीनंतर तरी एसटीचा रस्ता मोकळा होऊन प्रवाशांना दिलासा मिळणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'राकाँ'तील अंतर्गत कलह उफाळला

## निवडणूक आयोगास लिहिलेल्या पत्रावरून नेत्यांमध्ये ठिणगी ? ● पार्थ पवारांकडून एक्स पोस्टद्वारे खुलाशाचा प्रयत्न

◆ **मुंबई, २ एप्रिल**

राष्ट्रवादी अजित पवार गटातील अंतर्गत राजकारण आता दिल्लीच्या निवडणूक आयोगाच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचले असून, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी घेतलेल्या एका आक्रमक पवित्र्यामुळे पक्षात मोठी खळबळ उडाली आहे. पक्षाच्या घटनेतील बदल आणि वरिष्ठ नेत्यांच्या संशयास्पद पत्रव्यवहारावरून निर्माण झालेला हा पेच आता थेट संघर्षाच्या वळणावर येऊन ठेपला आहे.







सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला लिहिलेल्या पत्रात एक खळबळजनक मागणी केली आहे. "२८ जानेवारी २०२६ ते १० मार्च २०२६ या कालावधीत पक्षाच्या वतीने कोणत्याही व्यक्तीने केलेला पत्रव्यवहार ग्राह्य धरू नये आणि तो रद्द समजावा" असे त्यांनी पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे. तसेच, कार्यकारिणीची यादी देताना प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या नावापुढे कार्याध्यक्ष व प्रदेशाध्यक्ष ही पदे नमूद केली नाहीत. या एका वाक्यामुळे प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांसारख्या वरिष्ठ नेत्यांच्या गोटात अस्वस्थता पसरली आहे, कारण याच काळात या नेत्यांनी काही महत्त्वाचा पत्रव्यवहार केल्याचे समजते.

### वरिष्ठ नेत्यांची शिष्टाई अपयशी?

या पत्राद्वारे निर्माण झालेला अविश्वास दूर करण्यासाठी मंगळवारी प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, धनंजय मुंडे आणि हसन मुश्रीफ या दिग्गज नेत्यांनी सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांची भेट घेऊन प्रदीर्घ चर्चा केली. बैठकीनंतर झालेल्या या भेटीत नेत्यांनी आपली भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सूत्रांच्या माहितीनुसार, वरिष्ठ नेत्यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाने सुनेत्रा पवारांचे समाधान झालेले नाही.

२६ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईतील नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया येथे पार पडलेल्या राष्ट्रीय अधिवेशनात सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. या अधिवेशनात पक्षाच्या घटनेतील कलम १८ (१) मध्ये महत्त्वपूर्ण दुरुस्ती करून राष्ट्रीय अधिवेशनाचा कालावधी पाच वर्षांचा करण्यात आला. या निवडीची आणि घटनादुरुस्तीची माहिती १० मार्च २०२६ रोजी निवडणूक आयोगाला पत्राद्वारे देण्यात आली. ◀(तभा वृत्तसेवा)

### पार्थ पवार म्हणतात या सर्व अफवा...

राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते प्रफुल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्याबाबत प्रसारित होत असलेल्या बातम्या पूर्णपणे निराधार असल्याचा दावा खासदार पार्थ पवार यांनी एक्स पोस्ट द्वारे केला आहे. काहीजण मुद्दाम चुकीची माहिती पसरवून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, या अफवांमध्ये कोणतेही तथ्य नसून त्या पूर्णपणे काल्पनिक आहेत. ज्येष्ठ नेत्यांना जाणीवपूर्वक वादात ओढण्याचा प्रयत्न हा दुर्दैवी असून अशा प्रवृत्तींचा निषेध करायला हवा, असेही त्यांनी नमूद केले. तसेच कार्यकर्त्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता सत्यावर ठाम राहावे, असे आवाहनही पार्थ पवार यांनी केले आहे.

# होर्मुझसाठी एकवटले जगातील ३५ देश

## ब्रिटनच्या नेतृत्वात शिखर परिषद; भारताला निमंत्रण

◆ **नवी दिल्ली, २ एप्रिल**

इराण युद्धामुळे बंद झालेली होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा सुरू करण्यासाठी जागतिक समुदाय सक्रिय झाला आहे. या विषयावर चर्चा करण्यासाठी ब्रिटनच्या नेतृत्वात शिखर परिषद आयोजित करण्यात आली आहे. भारतासह ३५ प्रमुख देश यात सहभागी होणार आहे.

भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी गुरुवारी पत्रपरिषदेत सांगितले की, परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री परिषदेत आभासी पद्धतीने सहभागी होणार आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टॉर्मर यांनी परिषदेसाठी भारताला विशेष निमंत्रण दिले. ब्रिटिश पंतप्रधानांनी हा मार्ग पुन्हा सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. जहाजांची वाहतूक पुन्हा सुरू करणे, अडकलेल्या जहाजांची आणि खलाशांची सुरक्षा सुनिश्चित करणे, जागतिक तेल आणि वायू पुरवठा साखळी पुन्हा सुरू करणे या विषयांवर होणाऱ्या बैठकीचे नेतृत्व ब्रिटिश परराष्ट्र सचिव इव्हेट कूपर करणार आहेत.

बैठकीच्या पहिल्या टप्प्यात राजनैतिक आणि राजकीय पर्यायांवर चर्चा केली जाईल. भारतीय जहाजांची वाहतूक विना अडथळा आणि सुरक्षित व्हावी, यासाठी भारत इराणसह संबंधित प्रादेशिक देशांशी सातत्याने संवाद साधत आहे. भारताच्या प्रयत्नांना यश मिळत असून गेल्या काही दिवसांत सहा भारतीय जहाजे होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे मार्गस्थ झाली. भारताच्या मालवाहू जहाजांना इराणने विशेष सवलत दिली. भारत हा अशा मोजक्या देशांपैकी एक आहे. ◀(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# काळे ढग, रुपेरी रेषा

सुमारे चार वर्षांपूर्वी, २०२२ मध्ये जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्था असलेल्या राष्ट्रांच्या जी-२० परिषदेपाठोपाठ कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राशी संबंधित असलेल्या 'ग्लोबल पार्टनरशिप ऑफ आर्टिफिशियल इन्टेलिजन्स' (जीपीएआय) या आंतरराष्ट्रीय जागतिक भागीदारी संघटनेचे अध्यक्षपदही भारताकडे आले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून जबाबदार आणि मानवकेंद्रित विकास साधण्याबाबतच्या भारताच्या भरीव कामगिरीला आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेली ही मान्यता मानली जाते. तरीही, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या आक्रमणाची चिंता दूर झालेली नाही. २०२३ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेतही कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या आक्रमणाबाबत चिंता व्यक्त करणारा सूर उमटला होता. कृत्रिम बुद्धिमत्ता हे संकट आणि की वरदान यावर त्या परिषदेत स्पष्ट एकमत झालेले नाही, परंतु याचा वापर विवेकाने झाला नाही, तर हे संकटच ठरणार यावर मात्र अनेक राष्ट्रांचे एकमत झाले होते. यंत्र आणि तंत्र ही मानवाच्या भौतिक विकासाची साधने हाती लागल्यामुळे बहुतांश समाज तंत्रजीवी होत असून, आता तर मानवी मेंदूकरवी करून घेतली जाणारी अनेक कामे करण्यासाठी ही कृत्रिम बुद्धिमत्ता आता सिद्ध झाली आहे. जिथे मानवी मेंदूची क्षमता संपते, तेथे कृत्रिम बुद्धिमत्तेची क्षमता सुरू होते, असे या तंत्राबाबत अभिमानाने सांगितले जाते. जगातील अनेक देशांनी विकासाच्या नव्या वाटचालीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर प्राधान्याने सुरूदेखील केला असून, नजीकच्या भविष्यात माणसाच्या सहभागाची गरज असलेल्या क्षेत्रांतही कृत्रिम बुद्धिमत्तेला कामाला लावता येईल, असे लक्षणीय संशोधन पूर्ण झाले आहे. जसजशी प्रगतीच्या पुढच्या टप्प्याची प्रतीक्षा सुरू होते, तसतसे तंत्रावलंबित्व वाढत चालल्यामुळे एक दिवस यंत्रांच्या स्वाधीन होऊन, अवयवांकरवी करून घ्यावयाची सारी कामे यंत्रांकरवी करून घेण्याची वेळ येईल आणि माणसाचेच यंत्र होऊन जाईल हा विचार शक्यतेच्या सीमा ओलांडून वास्तवाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने माणसाच्या मेंदूचे काम बरेचसे हलके केल्यानंतर प्रगतीचा टप्पा माणसाला कोणत्या नव्या विचाराच्या किंवा चिंतेच्या खाईत नेऊन सोडणार आहे, याचा विचार करण्याची ही वेळ आली आहे. कारण, माणसाची कामे सोपी करण्यासाठी यंत्रांच्या विश्वात प्रगती करता करता माणसाचेच यंत्र व्हावे ही कल्पना कालपरवापर्यंत मोठी मनोरंजक वाटत होती. पण ही कल्पना आता केवळ स्वप्नरंजन राहिलेली नाही. मानवी मेंदूमध्ये बसविली जाणारी एक लहानशी चिप मेंदूच्या कामाचा ताण हलका करण्यास समर्थ ठरणार आहे. तशी चिप बसविण्याचा, म्हणजे मानवी मेंदूमध्ये चिपचे प्रत्यारोपण करण्याचा प्रयोग अमेरिकेत यशस्वी झाल्याची घोषणा अमेरिकेतील एक उद्योगपती एलन मस्क यांनी काही वर्षांपूर्वी केली आणि त्याचे पडसाद जगभर उमटले. मस्क यांच्या कंपनीनेच अशी चिप तयार केली आणि ज्या माणसाच्या मेंदूत ही चिप यशस्वीपणे बसविली आहे, त्याची प्रकृती उत्तम असून काही कामे करण्याकरिता ही चिप मेंदूला सहकार्य करू शकणार आहे. मानवी मेंदूमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचेच एक प्रकारे रोपण करणारी ही चिप बसविण्याकरिता अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाने परवानगी दिल्यानंतर लगेचच, म्हणजे केवळ सहा-सात महिन्यांतच अमेरिकेत चिपयुक्त मेंदूचा माणूस तयारही झाला आणि माणसाचे यंत्र होण्याचा एक महत्त्वाचा टप्पा पूर्णदेखील झाला.

नव्या जगातील माणूस नावाचे हे यंत्र प्रगतीच्या पुढच्या टप्प्यावर पोहोचत असतानाच, नैसर्गिक मेंदूच्या कमाल क्षमता सिद्ध करणाऱ्या बुद्धिमान तरुण पिढीचे काय होणार हा प्रश्न आता भयाणपणे समोर उभा राहिला आहे. भविष्याच्या सुरक्षिततेबाबत आश्वस्त असलेल्या तरुणाईला याच तंत्रावलंबित्वाचा फटका बसू लागला आहे. ओरॅकल नावाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तंत्रज्ञान क्षेत्रातील एका कंपनीतील तब्बल १२ हजार कुशल भारतीय कर्मचाऱ्यांना एका नव्या पहाटे केवळ एका ई-मेलद्वारे हाती नारळ देऊन नोकरीवरून काढून टाकल्याचा संदेश येतो, तेव्हा नव्या तंत्रावलंबित्वाचे परिणाम सुस्पष्टपणे जाणवू लागतात. म्हणूनच, विकासाची रुपेरी रेषा या भावनेने ज्या तंत्रज्ञानाकडे पाहिले जात होते, त्या रेषेमागे चिंतेचे काळे ढगदेखील आहेत, ही जाणीव आता गडद होऊ लागली आहे. ओरॅकल नावाच्या कंपनीतील १२ हजार भारतीय कर्मचाऱ्यांवर आदळलेली बेरोजगारीची कुऱ्हाड ही तर केवळ एक सुरुवात आहे.

सध्या युद्धस्थितीमुळे सर्वत्र अनिश्चिततेची दाट छाया पसरलेली असताना त्याच्या भयात भर घालणाऱ्या अशा घडामोडींतही दिलाशाची दुसरी बाजू अंधुकपणे उजोडात येताना दिसते, तेव्हा नैराश्याचे गडदपणही काहीसे धूसर होऊ लागते. युद्धाच्या संकटामुळे जगभरातील अनेक अर्थव्यवस्थांना मोठा फटका बसू लागला असून त्याच्या झळा घराघरापर्यंत पोहोचू लागल्या आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेपासून, खते, औषधे आणि चप्पल-बुटांसारख्या वस्तूदेखील महागाईच्या गर्तेत गटांगळ्या खाऊ लागल्याने, आर्थिक व्यवस्थापनाची चिंता दिवसागणिक गडद होणार आहे. अशा संकटाच्या परिस्थितीत बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळण्यासारखी अन्य चिंताजनक बाब नाही. तरीही, दुसरीकडे मात्र रोजगाराच्या संधींबाबतचे सामान्य चित्र मात्र काहीसे दिलासादायक असल्याची सुखद वार्ता नुकतीच समोर आल्याने, चिंतेच्या काळ्या ढगांची रुपेरी किनार जाणवून देणारी आनंददायी बाब म्हणून त्याकडे पाहावे लागेल. केंद्र सरकारच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयातर्फे जारी करण्यात आलेल्या आवधिक बल सर्वेक्षण (पीएलएफएस) या ताज्या वार्षिक अहवालाचे काही निष्कर्ष असे दिलासादायक ठरत आहेत. देशातील सामान्य बेरोजगारी कमी होत असून क्षमतावान समाजघटकांचा श्रमाच्या कामातील सहभाग वाढल्याने अर्थव्यवस्था संकटजन्य परिस्थितीत नाही असा या अहवालाचा निष्कर्ष आहे. महिलांचे उत्पन्न पुरुषांच्या उत्पन्नाच्या तुलनेत सुमारे ३१ टक्क्यांनी कमी आहे, पण ते वेगाने वाढत आहे. कदाचित, कामातील सहभागातील महिला व पुरुषांच्या असमानतेमुळे तसे होत असावे. मात्र, जानेवारी ते डिसेंबर २०२५ या वर्षात पुरुषांचे वेतन सरासरी ५.८० टक्क्यांनी तर महिलांचे वेतन सरासरी ७.१६ टक्क्यांनी वाढले आहे. गेल्या वर्षभरात महिलांच्या श्रमाची सरासरी दैनिक मजुरीदेखील १६ रुपयांनी वाढली आहे. स्वयंरोजगाराच्या क्षेत्रात मात्र, महिलांचा सहभाग पुरुषांच्या संख्येच्या तुलनेत काहीसा कमी असून या क्षेत्रात पुरुषांची कमाई महिलांच्या कमाईतून तिप्पट असल्याचा या अहवालाचा निष्कर्ष आहे. विशेष म्हणजे, या वर्षभरात बेरोजगारीचा दर ३.३ टक्क्यांवरून ३.१ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. शिक्षित वर्गातील बेरोजगारी तब्बल अर्धा टक्क्याने कमी झाली असून बेरोजगारीचा दर साडेसात टक्क्यांवर आला आहे आणि युवकांमधील बेरोजगारीदेखील कमी झाली आहे. देशातील ६७.८ टक्के लोकसंख्या किमान माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षित असली तरी केवळ ४.२० टक्के लोकसंख्येकडे औपचारिक तंत्रशिक्षण किंवा व्यावसायिक शिक्षण असल्याने, नव्या जगाची तंत्रस्नेही असण्याची गरज भागविण्यात ही लोकसंख्या कमी पडत आहे. ही चिंतेची बाब आहेच, शिवाय, रोजगारक्षम वर्गातील कौशल्य आणि क्षमतांची कमतरताही अधोरेखित होते. शिक्षण आणि रोजगाराच्या संधी यांमधील ही तफावत दूर होण्याची गरज आहेच, पण भविष्यात ज्या बाबींमुळे असुरक्षिततेचे सावट गडद होऊ शकते, त्या संकटांना सामोरे जाण्याची क्षमता प्राप्त करण्याचे मोठे आव्हान रोजगारक्षम लोकसंख्येस पेलावे लागणार आहे. ओरॅकल नावाच्या एका कंपनीतील कर्मचाऱ्यांवर कोसळलेल्या संकटातून आणि रोजगारविषयक सर्वेक्षणातून समोर आलेल्या सामान्य बाबींतून भविष्याच्या धोरणांची दिशा ठरवावी लागेल, हे आता पुरेसे स्पष्ट झाले आहे. पंधरा ते २९ या वयोगटातील सुमारे २५ टक्के तरुण रोजगार किंवा शिक्षण यामध्ये कोठेच नाहीत, ही बाबदेखील काळजीची काजळी गडद करणारी आहे. भविष्याचे संकेत स्पष्टपणे मिळत असताना, केवळ रुपेरी रेषेकडे पाहत आनंद मिळविण्यापेक्षा काळ्या ढगांची दखल घेतली नाही, तर ते महागात पडू शकते.

## अर्थविशेष

हितेश पारसे

# करदात्यांसाठी नवा युगारंभ; आयकर कायदा २०२६ समजून घ्या

१ एप्रिल २०२६ पासून भारताच्या कर प्रणालीमध्ये एक महत्त्वपूर्ण बदल होणार आहे. आयकर कायदा, १९६१ च्या जागी नवीन आयकर कायदा लागू होत असून, हा कायदा अधिक सोपा, पारदर्शक आणि करदात्यास अनुकूल बनविण्याचा प्रयत्न आहे. हा बदल केवळ कायद्यातील सुधारणा नसून, प्रत्येक करदात्याच्या आर्थिक नियोजनावर थेट परिणाम करणारा आहे.

नवीन कायद्यामध्ये ''कर वर्ष'' ही संकल्पना लागू करण्यात आली आहे. पूर्वी आर्थिक वर्ष आणि मूल्यांकन वर्ष यामधील गोंधळ आता दूर करण्यात आला असून, ज्या वर्षात उत्पन्न मिळेल त्याच वर्षात कराची गणना होणार आहे. यामुळे करदात्यांना रिटर्न फाइलिंग अधिक सोपे आणि स्पष्ट होणार आहे.

यासोबतच, नवीन कर पद्धतीला डीफॉल्ट दर्जा देण्यात आला आहे. करदात्यांनी वेगळा पर्याय निवडला नाही तर नवीन पद्धतीनुसार कर लागू होईल. तरीदेखील, जुनी पद्धत कायम ठेवण्यात आली आहे. जुन्या पद्धतीमध्ये ८० सी, ८० डी, एचआरए यासारख्या वजावट उपलब्ध आहेत, तर नवीन पद्धतीमध्ये कमी कर दर असून वजावट मर्यादित आहेत. विशेष म्हणजे मानक वजावट आता नवीन पद्धतीतही उपलब्ध आहे, ज्यामुळे पगारदार वर्गाला दिलासा मिळतो.

नवीन कायद्यामध्ये मध्यमवर्गीय करदात्यांसाठी मोठा दिलासा देण्यात आला आहे. सुमारे १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त होण्याची तरतूद असून, मानक वजावट धरल्यास १२.७५ लाखांपर्यंत कराचा भार कमी होऊ शकतो. त्यामुळे पगारदार आणि निश्चित उत्पन्न असलेल्या व्यक्तींना मोठा फायदा होणार आहे.

वरिष्ठ नागरिकांसाठी कर नियोजन विशेष महत्त्वाचे आहे. जुन्या पद्धतीमध्ये वयोमानानुसार करमुक्त मर्यादा जास्त आहे (रु. ३ लाख/ रु. ५ लाख), तसेच कलम ८० टीटीबी अंतर्गत ५०,००० पर्यंत व्याजावर वजावट उपलब्ध आहे. नवीन पद्धतीमध्ये अशा सवलती नसल्याने ज्येष्ठ नागरिकांनी दोन्ही पद्धतींची तुलना करून निर्णय घेणे आवश्यक आहे. याशिवाय, फॉर्म १२१ (फॉर्म १५एच) वेळेवर सादर केल्यास बँकेकडून होणारा टीडीएस




टाळता येऊ शकतो.

पगारदार व्यक्तींसाठी जेवण व्हाऊचर/कार्डवर रु. १.०५ लाखांपर्यंत करसवलत हा एक नवीन आणि व्यवहार्य फायदा आहे. योग्य पगार रचना केल्यास कर बचत करता येते. त्यामुळे वर्षाच्या सुरुवातीलाच एचआर किंवा कर सल्लागाराशी चर्चा करणे आवश्यक आहे.

नवीन कायद्यात आयटीआर फाइलिंग प्रक्रिया अधिक सोपी करण्यात आली आहे. आधीच भरलेला डेटा, सुलभ फॉर्म आणि डिजिटल प्रणालीमुळे अनुपालन सुलभ झाले आहे. तसेच सुधारित परताव्यासाठी अधिक लवचीकता देण्यात आली आहे, ज्यामुळे चुका दुरुस्त करण्याची संधी मिळते.

गुंतवणुकीच्या बाबतीत भांडवली नफा नियमांमध्येही बदल करण्यात आले आहेत. शेअर बायबॅक वर भांडवली नफा लागू करण्यात आला आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांनी त्यांच्या गुंतवणुकीचे कर परिणाम समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. नवीन कायद्यात पारदर्शकतेवर विशेष भर देण्यात आला आहे. करदात्यांनी सर्व उत्पन्न, विशेषतः विदेशी मालमत्ता आणि व्यवहार, अचूकपणे जाहीर करणे आवश्यक आहे. चुकीची माहिती दिल्यास दंड आणि कारवाईची तरतूद करण्यात आली आहे.

महत्त्वाच्या देय तारखा (आर्थिक वर्ष २०२५-२६) - प्रत्येक करदात्याने लक्षात ठेवाव्यात नवीन बदलांनुसार काही महत्त्वाच्या तारखांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे :

आयटीआर १ आणि आयटीआर २ (सामान्य करदाते) : ३१ जुलै २०२६ (कोणताही बदल नाही)

आयटीआर ३ आणि आयटीआर ४ (व्यवसाय/प्रोफेशन): ३१ ऑगस्ट २०२६ (पूर्वी ३१ जुलै)

ऑडिट असलेली प्रकरणे : ३१ ऑक्टोबर २०२६ (बदल नाही)

सुधारित विवरणपत्र/अद्ययावत विवरणपत्र : (३१ मार्च २०२७, पूर्वी ३१ डिसेंबर) याशिवाय आगाऊ कराच्या तारखा देखील महत्त्वाच्या आहेत :

१५ जून - १५ टक्के, १५ सप्टेंबर - ४५ टक्के, १५ डिसेंबर - ७५ टक्के, १५ मार्च - १०० टक्के. या तारखा पाळल्या नाहीत तर व्याज आणि दंड लागू होऊ शकतो.

**ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष मार्गदर्शन**

पेंशन आणि व्याज उत्पन्नाची अचूक नोंद ठेवावी

फॉर्म १२१ (फॉर्म १५एच) वेळेवर भरावा

८० टीटीबी आणि ८० डीडीबी कपातचा योग्य वापर करावा

वैद्यकीय खर्चाचे पुरावे जतन करावेत

नवीन व जुनी पद्धत यांची तुलना करूनच पर्याय निवडावा

**वर्षाच्या सुरुवातीला कर नियोजन का आवश्यक?**

कर नियोजन हे वर्षाच्या शेवटी करण्यापेक्षा वर्षाच्या सुरुवातीला केल्यास अधिक फायदेशीर ठरते. योग्य वेळी : कर पद्धत निवडणे, गुंतवणूक नियोजन करणे, सर्व कागदपत्रे व्यवस्थित ठेवणे

उत्पन्नाचे स्रोत ट्रॅक करणे. यामुळे शेवटी कराचा ताण कमी होतो.

**निष्कर्ष** : नवीन आयकर कायदा २०२६ हा कर प्रणाली अधिक सोपी, पारदर्शक आणि आधुनिक बनविणारा आहे. मात्र या सोपेपणासोबत करदात्यांवर अधिक जबाबदारीही येते. योग्य माहिती, वेळेवर नियोजन आणि पूर्ण अनुपालन केल्यास करदात्यांना आर्थिकदृष्ट्या मोठा फायदा होऊ शकतो.

शेवटी, प्रत्येक करदात्याने हे लक्षात ठेवावे ''कर नियोजन हे वर्षाच्या शेवटी नव्हे, तर वर्षाच्या पहिल्याच दिवसापासून सुरू झाले पाहिजे.''

(९०९६३३२३५३, कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार)

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# लेझी गर्ल जॉबचा ट्रेंड

फार आधी नाही, अगदी ५-६ वर्षांपूर्वीपर्यंत आपल्या कामात खूप मेहनत करणे, उशिरापर्यंत काम करणे, फटाफट कामे आटोपून पुढच्या जबाबदाऱ्या घेणे, ही यशाची गुरुकिल्ली मानली जात होती. पण, आता जेन झी युवावर्गाला असे वाटत नाही. लेझी गर्ल जॉब्ज् या लोकप्रिय वर्कप्लेस ट्रेंडनुसार, खूप मेहनत करून यश मिळतंच असं नाही. त्यापेक्षा कामाच्या लवचीक वेळा, कामाचा संतुलित ताण आणि आपलं काम-जीवन यात योग्य ताळमेळ साधणं, जास्त महत्त्वाचं मानलं जातंय. आटोपता येतील एवढ्याच जबाबदाऱ्या आणि कमी ताण घेतल्यासही यश मिळू शकतं, असं हा ट्रेंड शिकवतो.

२६ वर्षांची अन्वी तिच्या कंपनीसाठी वर्क फ्रॉम होम करते. सकाळी ९.३० वाजता ती लॅपटॉपवरून लॉग इन करते. ठरावीक काम, मीटिंग्ज अटेंड करते आणि सायंकाळी ५.३० वाजता लॉग आऊट होऊन लॅपटॉप बंद करून योगावर्गाला निघून जाते. पण, दोन महिन्यांपूर्वी असं नव्हतं. सकाळी ९.०० वाजता लॉग इन करणारी अन्वी रात्री-अपरात्री मेल चेक करायची, केव्हाही होणाऱ्या मीटिंगला धडपडत उपस्थित राहायची. सतत कामाच्या तणावात पिचलेल्या, थकलेल्या अन्वीने विचार केला. तिला घडवायचं असलेलं करीयर हे आहे का? कामाशिवाय आयुष्यात काहीही उरणार नाही, हे यश आहे का? पण, या वैचारिक मंथनातून तिने स्वतःच्या गरजांनुसार नोकरी शोधली. तुलनेने कमी असला तरी निश्चित पगार, कामाचे ठरावीक तास आणि उरलेला स्वतःसाठीचा वेळ देणारी ही नोकरी आहे. अशा नोकऱ्यांना सोशल मीडियावर लेझी गर्ल जॉब्ज् म्हणून ओळखतात. हे विचित्र वाटत असलं तरी खरं आहे. तज्ज्ञांच्या मते, या ट्रेंडमधून युवावर्गाचे बदललेले विचार दिसतात. आपले वैयक्तिक जीवन कायम ठेवून, एक चांगले आणि स्थायी करीयर घडविण्याकडे युवकांचा कल आहे.

लेझी गर्ल जॉब्ज् म्हणजे नेमकं काय? तर, कामाचे लवचीक तास, टारगेटचा तणाव नसलेली आणि महत्त्वाचं म्हणजे जास्तीचे काम न करताही व्यवस्थित पगार देणारी नोकरी! आपल्या महत्त्वाकांक्षांना जरा मुरड घालून, जीवनाचा आनंद घेण्यासाठी केलेली तडजोड म्हणजे लेझी गर्ल जॉब्ज्! याचा अर्थ ही जेन झी मंडळी काम टाळतात, आळशी आहेत, ऐतखाऊ आहेत, असा अजिबात नाही. सतत मेहनत करून, समाजमान्यता असलेलं व्यावहारिक यश मिळविण्याच्या पारंपरिक विचाराला छेद देणाऱ्या या जेन झी विचाराकडे लक्षपूर्वक बघायला हवं. जेन झी मुला-मुलींचं उद्दिष्ट अगदी सोपं आहे. स्मार्टवर्क करून, चांगली कमाई करायची आणि मग आपलं वैयक्तिक आयुष्य आनंदाने जगायचं. यात अगदी फूलशेती करण्यापासून, शास्त्रीय संगीत शिकण्यापर्यंत आणि घरी बाईक दुरुस्तीपासून कुकरी क्लासेस लावण्यापर्यंत कोणत्याही कामाचा आनंद असू शकतो.

हा बदल एका रात्रीतून आलेला नाही. जगभरातील वर्कप्लेसेसवर केलेल्या संशोधनानुसार, जास्त तणाव युवावर्गाच्या कामाला आणि करीयरला प्रभावित करतो. स्टेट ऑफ द ग्लोबल वर्कप्लेसच्या अहवालानुसार, जगभरातील ७६ टक्के कर्मचारी कधी-कधी तणावपूर्ण मानसिक अवस्थेत काम करतात. तर, २८ टक्के कर्मचारी क्वचित किंवा नेहमीच तणावात काम करतात. सतत तणावात राहिल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. एका विशिष्ट वयानंतर, वारंवार आजारी पडणे आणि लहानसहान कारणांनी सुट्या घेण्याच्या प्रमाणात ६३ टक्के वाढ होते. विशेष म्हणजे असे लोक लेझी गर्ल जॉब्ज् शोधू लागतात. या संशोधनानुसार, जगभरातील केवळ ३३ टक्के कर्मचारी स्वतःला यशस्वी मानतात. जेन झी म्हणजे वर्ष १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली पिढी! यांची विशेषता म्हणजे ते पूर्णतः डिजिटल नेटिव्ह म्हणजे स्मार्टफोन्स आणि सोशल मीडियासोबत मोठी झालेली पिढी आहेत. खूप भावनिक नसली तरी विविधता, समानता आणि मानसिक आरोग्यासह सामाजिक बदलांमध्ये बिनदिक्कत पुढाकार घेणारी ही पिढी आहे. आला क्षण आनंदाने जगायला हवा, पुढचा विचार करून कशाला स्वतःला गुंतवायचं? कामाच्या वेळी स्मार्ट काम करायचं आणि वैयक्तिक आयुष्याचा आनंद घेताना कामाकडे बघायचंही नाही, हा त्यांच्या जीवनाचा सहज फंडा आहे. वेळोवेळी नॉस्टॅल्जिक होणे, जुनी ॲनालॉग पद्धती समजून घेणे, स्वतःला डिटॉक्स करणे या त्यांच्या प्राथमिकता आहेत. संशोधनानुसार, लेझी गर्ल जॉब्ज् ही संकल्पना करीयरमधील उच्चतम यशाऐवजी स्वतःचं उत्तम आरोग्य आणि आनंदी जीवनाला प्राधान्य देते आहे. सोप्या भाषेत वैयक्तिक आयुष्यासोबत, आनंदी क्षण आणि नात्यांसोबत तडजोड न करता नोकरी करणं, ही यशस्वी करीयरची नवी व्याख्या आहे.

९८५०३३९२४०

## तंत्रवेध

डॉ. दीपक शिकारपूर

# युद्ध, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नैतिक प्रश्न

लष्करी आणि गुप्तहेर खात्यांकडून सतत नवीन तंत्रज्ञानाचा पाठपुरावा केला जात असतो. शत्रूच्या एक पाऊल पुढे राहण्याचा हा प्रयत्न असतो. यामुळेच त्यांनी न वापरलेले तंत्रज्ञान कालांतराने इतर संस्था वा व्यक्तीपर्यंत पोहोचते (किंवा काही वेळा ते अधिकृतपणे औद्योगिक वापरासाठी खुलेही केले जाते). मग त्यावर काही व्यक्ती अधिक संशोधन करतात, प्रबंध वा पुस्तके लिहितात आणि अशा प्रकारे माहितीचा प्रसार होत जातो. यात मूळ यंत्रणांचे काहीच नुकसान होत नसल्याने त्या या प्रसाराकडे फारसे लक्ष देत नाहीत. हॅकिंगचे नवनवे मार्ग यातूनच उदयाला येतात. आज सर्वोच्च लष्करी खात्याच्या हाती असलेले तंत्र अशा प्रकारे खाली झिरपायला फक्त तीन ते पाच वर्षे लागतात. एखाद्या यंत्रणेवर हल्ला करणे ही बाब तिचे संरक्षण करण्यापेक्षा निश्चितच अधिक सोपी असल्याने आणि हा मार्ग वापरणारे घुसखोर थेट दिसत नसल्याने सायबर घातपातांचे प्रमाण वाढत आहे. पृथ्वीभोवती आज शेकडो नव्हे, हजारो उपग्रह फिरत आहेत. त्यापैकी बहुतेक उपग्रहांवर हवामानाचा अंदाज देणे आणि या ना त्या बहाण्याने (किंवा उघडपणेही) सर्वत्र नजर ठेवणे एवढेच काम सोपवलेले आहे, असे म्हणायला हरकत नाही. या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सर्वसामान्य नागरिकाच्या अक्षरशः प्रत्येक हालचालीचा मागोवा घेणे शक्य असते. यावर विश्वास बसणे अवघड असले तरी ते सत्य आहे. एकविसाव्या शतकात युद्धाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. पारंपरिक युद्धात सैनिक आणि शस्त्रास्त्रांचा वापर महत्त्वाचा होता, परंतु आज कृत्रिम बुद्धिमत्ता युद्धाचा मुख्य घटक बनली आहे. इराणविरुद्ध इस्रायल-अमेरिका संघर्षात याचे स्पष्ट उदाहरण दिसते.

कृत्रिम बुद्धिमत्ता माहितीचे मोठ्या प्रमाणावर विश्लेषण करून लक्ष्य ओळखणे, निर्णय घेणे आणि हल्ल्यांचे नियोजन करणे, यासाठी वापरली जाते. त्यामुळे युद्ध अधिक वेगवान आणि अचूक झाले आहे. एआयमुळे युद्धातील निर्णयप्रक्रिया, लक्ष्य ओळखणे, हल्ल्यांचे नियोजन आणि अंमलबजावणी या सर्व बाबींमध्ये क्रांतिकारी बदल झाले आहेत. काही अहवालांनुसार एआयच्या मदतीने केवळ बारा तासांमध्ये जवळपास ९०० हल्ले करण्यात आले. हे पारंपरिक युद्धात अशक्यप्राय होते. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे युद्धाचा वेग, अचूकता आणि निर्णयक्षमता अभूतपूर्व पातळीवर पोहोचली आहे. अत्यल्प वेळेत लक्ष्य शोधणे, त्याचे विश्लेषण करणे आणि हल्ला करणे शक्य झाले आहे. त्यामुळे युद्ध केवळ शक्तीचे नव्हे तर तंत्रज्ञानाचे झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक किंवा यंत्रांना मानवी बुद्धिमत्तेसारखे विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता देणारे तंत्रज्ञान. युद्धात याचा उपयोग विविध स्तरांवर केला जातो. मोठ्या प्रमाणावर माहिती संकलन करून तिचे विश्लेषण करणे, शत्रूच्या हालचालींचा अंदाज लावणे, लक्ष्य निश्चित करणे आणि योग्य वेळी हल्ला करणे, या सर्व गोष्टी कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे अत्यंत सोप्या झाल्या आहेत. पूर्वी या सर्व प्रक्रिया मानवी विश्लेषकांवर अवलंबून होत्या. त्या वेळखाऊ आणि कधी कधी अचूक नसत. आता कृत्रिम बुद्धिमत्ता काही क्षणांमध्ये हजारो माहितीबदूंचे विश्लेषण करून अधिक अचूक निष्कर्ष देते.

अधिक अचूक हल्ले, जलद निर्णय आणि सैनिकांचे कमी नुकसान हे याचे काही सकारात्मक परिणाम आहेत. चुकीचे लक्ष्य निवडले जाण्याचा धोका, नागरिकांचे नुकसान आणि संघर्ष अधिक वेगाने वाढण्याची शक्यता ही मोठी आव्हाने आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा सर्वांत मोठा प्रभाव म्हणजे युद्धातील वेग. पूर्वी लक्ष्य शोधण्यासाठी अनेक दिवस किंवा आठवडे लागत असत. माहिती गोळा करणे, तिचे विश्लेषण करणे आणि निर्णय घेणे ही प्रक्रिया संथ होती. आता मात्र कृत्रिम बुद्धिमत्ता काही सेकंदांमध्ये उपग्रह, सेन्सर, संचार प्रणाली आणि इतर साधनांमधून मिळालेली माहिती एकत्र करून योग्य लक्ष्य ओळखते. यामुळे निर्णयप्रक्रिया अत्यंत जलद झाली आहे. युद्धातील ही वेगवान प्रक्रिया संघर्षाची तीव्रता वाढवते. कमी वेळेत अधिक हल्ले करणे शक्य होते. त्यामुळे युद्धाचा कालावधी कमी होऊ शकतो, परंतु त्याची तीव्रता अधिक वाढते. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे अत्यल्प वेळेत मोठ्या प्रमाणावर हल्ले करणे शक्य झाले आहे. काही घटनांमध्ये काही तासांमध्येच शेकडो हल्ले करण्यात आले आहेत. ही गोष्ट पारंपरिक युद्धाच्या तुलनेत पूर्णपणे वेगळी आहे. पूर्वी एका मोठ्या हल्ल्यासाठी मोठी तयारी करावी लागायची, वेळ लागायचा आणि अनेक टप्पे पार करावे लागत. आता ही प्रक्रिया स्वयंचलित झाली आहे. यामुळे युद्ध अधिक आक्रमक झाले आहे. शत्रूला प्रतिक्रिया देण्याची संधी कमी मिळते आणि संघर्ष अधिक तीव्र होतो.

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मानवरहित विमान, स्वयंचलित शस्त्रे आणि यंत्रसामग्रीचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. ही साधने स्वतः लक्ष्य शोधू शकतात, त्याचे विश्लेषण करू शकतात आणि आवश्यक असल्यास हल्लाही करू शकतात. यामुळे मानवी सहभाग कमी होतो आणि धोकादेखील कमी होतो. परंतु याच गोष्टीमुळे एक मोठा प्रश्न निर्माण होतो. तो म्हणजे यंत्रांनी स्वतः निर्णय घेतले तर त्यांची जबाबदारी कोण घेणार? कृत्रिम बुद्धिमत्ता केवळ रणांगणापुरती मर्यादित नाही. ती सायबर युद्धामध्येही महत्त्वाची भूमिका बजावते. शत्रूच्या संगणकीय प्रणालींवर हल्ला करणे, वीजपुरवठा खंडित करणे, बँकिंग प्रणालीमध्ये अडथळे निर्माण करणे या गोष्टी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने शक्य झाल्या आहेत. तसेच माहिती युद्धामध्येही तिचा मोठा वापर होतो. खोटी माहिती पसरवणे, जनमतावर प्रभाव टाकणे आणि समाजामध्ये गोंधळ निर्माण करणे हादेखील युद्धाचा एक भाग बनला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे युद्धाचा वेग वाढल्यामुळे काही सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम दिसतात. सकारात्मक बाजू म्हणजे हल्ले अधिक अचूक होतात, सैनिकांचे नुकसान कमी होते आणि निर्णय जलद घेतले जातात. परंतु नकारात्मक बाजू अधिक गंभीर आहे. चुकीचे लक्ष्य निवडले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे निरपराध नागरिकांचे नुकसान होऊ शकते. तसेच युद्धाचा वेग इतका वाढतो की त्यावर नियंत्रण ठेवणे कठीण होते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर युद्धामध्ये केल्यामुळे अनेक नैतिक प्रश्न निर्माण झाले आहेत. सर्वांत मोठा प्रश्न असतो जबाबदारीचा. कृत्रिम बुद्धिमत्तेने चुकीचा निर्णय घेतला, तर त्यासाठी जबाबदार कोण?

इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिका संघर्षाने दाखवून दिले आहे की कृत्रिम बुद्धिमत्ता युद्धाचे स्वरूप पूर्णपणे बदलत आहे. ती युद्ध अधिक वेगवान, अचूक आणि प्रभावी बनवते, परंतु त्याच वेळी अनेक नैतिक आणि मानवी प्रश्न निर्माण करते. योग्य नियंत्रण नसेल तर हे तंत्रज्ञान मानवतेसाठी मोठा धोका ठरू शकते. कृत्रिम बुद्धिमत्ता एक शक्तिशाली साधन आहे. तिचा उपयोग कसा केला जातो यावर भविष्यातील जग अवलंबून आहे. ती युद्ध अधिक घातक बनवू शकते कवा शांततेसाठीही उपयोगी ठरू शकते. म्हणूनच आजची सर्वांत मोठी गरज म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जबाबदारीने, नैतिकतेने आणि मानवहितासाठी करणे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वाचक पत्रे

### श्री हनुमान चालीसा : जीवन सकारात्मक करणारा मंत्र...

संतांनी देवी-देवतांची स्तुती करण्यासाठी अनेक स्तोत्रे रचलेली आहेत. केवळ स्तुती करणे हा या स्तोत्रांचा उद्देश नसून, विशिष्ट लयीत आणि योग्य उच्चारांनी म्हटलेल्या स्तोत्रांमुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. त्यांपैकीच एक म्हणजे संत श्री गोस्वामी तुलसीदास यांनी रचलेली श्री हनुमान चालीसा! श्री हनुमान चालीसा अवधी भाषेत रचलेली आहे. 'चालीसा' म्हणजे चाळीस चौपद्या असलेली स्तुती! या प्रत्येक चौपदीत श्री हनुमानाचे गुण, पराक्रम आणि भक्तीचे महत्त्व वर्णन केलेले आहे. दररोज हनुमान चालीसा पठन केल्याने मनाला शांती मिळते, भीती नष्ट होते. हनुमान हे संकटमोचक आहेत; त्यामुळे संकटांचा सामना करण्याचे बळही या पठनातून मिळते. हनुमान चालीसामधील प्रत्येक ओळ आपल्यात धैर्य निर्माण करते आणि संयम बाळगायला शिकवते. आजच्या धावपळीच्या जीवनात अंतर्मनाची शांती मिळवण्यासाठी अर्थ समजून हनुमान चालीसाचे पठन दररोज करायला हवे.

**डॉ. स्वाती देशमुख**/ नागपूर

### पालखी मुक्काम परंपरेत खंड नको

जगद्गुरू संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांच्या वारीची थोर परंपरा म्हणजे महाराष्ट्राचा फार मोठा ऐतिहासिक, धार्मिक ठेवा, ज्याचा वाटतो प्रत्येकालाच हेवा. पंढरीच्या विठुरायाच्या भेटीच्या ओढीने वारकरी वारीची वाट चातकाप्रमाणे डोळे लावून पाहत असतो. तर 'साधू संत येती घरा तोचि आम्हां दिवाळी दसरा' असे म्हणत वारीचे मनापासून स्वागत करणारे देखील तेवढेच असुसलेले असतात.

पुण्याच्या ऐतिहासिक पूर्वभागात जवळजवळ ३५० वर्षे या दोन्हीही थोर संतांच्या पालख्या मुक्कामी विसावतात. त्या अवघ्या दोन दिवसांत संपूर्ण परिसर भगव्या पताकांनी भगवामय होऊन विठुरायाच्या जयघोषाने दूमदूमून जातो. वारकऱ्यांसाठी गोडधोड जेवणाच्या पंगती उठतात, तर कुठे अभंग-कीर्तनांनी सारा परिसर भक्तिरसात डुंबून जातो. पुणेकरसुद्धा मोठ्या दिलाने बिल्डिंगच्या पार्किंगमधून वारकरी मंडळींना वामकुक्षीसाठी जागा मिळवून देतात.

सकाळी उठून चहापान, नाश्ता देतात. गेली कित्येक वर्षांची ही महान परंपरा आहे. परंतु यंदा मात्र नको ते एक वेडं खूळ जन्माला घातलं जातयं.

काय तर म्हणे अपुऱ्या सोयी सुविधा व दाटीवाटीचे कारण पुढे करीत आळंदी देवस्थानमधील काही महाभागांनी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची पालखी भवानी पेठेत न आणता तिच्या मुक्कामाची जागा बदलण्याचा उगाच घाट घातला आहे. आता चर्चेला सर्वत्र उधाण आले असून पूर्वभागातील नागरिकांमध्ये कमालीची नाराजी दिसून येत असतानाच एवढ्या वर्षांची जुनी परंपरा आता खंडित होतेय की काय, हा प्रश्न पडला असून त्यांच्या ठायी नकळत एक बोचरी खंत उरी दिसतेय. तरी यावर योग्य तोडगा काढून जुन्या महान परंपरेत खंड पडू नये ही अपेक्षा.

**आनंद बेंद्रे**/पुणे

### पाणी... भविष्यातील ज्वलंत समस्या

आपल्या पूर्वजांनी पंचमहाभूतांना म्हणजेच पाणी, तेज, वायू, पृथ्वी व आकाश यांना देवाचे स्थान दिले आहे. यात पाण्याचे महत्त्व त्यांनी त्याकाळी सर्व गोष्टी मुबलक असून देखील खूप मोठ्या प्रमाणात जाणले होते. म्हणूनच नदीला किंवा कोणत्याही पाण्याच्या स्रोताला ते देव मानून किंवा आईचा दर्जा देऊन त्याची नित्यनेमाने पूजा करीत असत. परंतु पूर्वीच्या काळची आणि आजची परिस्थिती यात खूप फरक आहे. वाढती लोकसंख्या आणि त्यांच्या गरजा पुरवताना निसर्गावर प्रचंड ताण आला आहे. गेल्या काही वर्षांत निसर्गाचे सगळे संतुलन बिघडले आहे. दरवर्षी काही अंशाने पृथ्वीचे तापमान वाढत आहे. पृथ्वीवरील सर्व सजीवास जगण्याकरिता पाणी हा सगळ्यात मोठा स्रोत आहे आणि हे पाणी केवळ पावसाच्या रूपात पृथ्वीवर पडून सर्वच सृष्टीचे भवितव्य त्यावर अवलंबून असते. आणि तोच पाऊस गेले काही वर्षे अत्यंत लहरी, अनियमित असा झाला आहे. पावसाचा पॅटर्न गेल्या काही वर्षांत संपूर्णपणे बदलला आहे. देशाच्या काही भागात पावसाचा थेंब नाही तर कुठे प्रचंड प्रमाणात ढगफुटी व मुसळधार, अतिरेकी असा पाऊस पडून काही तासात नाले, नद्या, रस्ते भरभरून वाहत गाव, खेडी, शहरे पाण्याखाली देखील जात आहेत. शहराचा व अन्य भागांचा विचार करता संपूर्ण शहरावर कॉंक्रीटचे थर घातलेले त्यामुळे पाऊस कमी पडला काय किंवा अधिक पडला काय हे पाणी मुरायलाच आता कुठे जागा उरली नाही. त्यामुळे पाण्याचे लगेच फुगोटे तयार होऊन पाणी तुंबण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. विकासाच्या दिशेने वाटचाल करत असताना पाण्याचा प्रचंड मोठ्या प्रमाणात वापर होऊ लागला आहे. पण भविष्यात पाण्याचे मर्यादित साठे हे समस्त मानवाकरिता खूप मोठे आव्हान असणार आहे. आता तर गेल्या अनेक वर्षांपासून बाटलीबंद पाणी विकले जाऊ लागले आहे. पिण्याच्या पाण्यासाठी कधी पैसे मोजावे लागतील असे स्वप्नात देखील वाटले नाही ते आज सत्यात उतरले आहे.

**लोकेश बापट**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



महत्वाचे...



## भाजपचा बुथ मजबुतीकरण पॅटर्न राज्यात पहिल्यांदाच उत्तर सोलापुरात

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार आणि अविनाश महागावकर यांच्या पुढाकाराने भाजपाची मूळ संकल्पना ज्याच्या शक्तीने कोणतीही निवडणूक जिंकू शकतो ती म्हणजे बुथ मजबुतीकरण हा पॅटर्न बीबीदारफळ, मार्डी जिल्हा परिषद मतदार संघातील एकूण ३२ बूथमध्ये राबविला आणि यशस्वी करून दाखविला. यामुळे हा पॅटर्न राज्यभरातील विविध मतदारसंघात राबण्याची शक्यता आहे. या तालुक्यातील दोन मतदारसंघात बुथ मजबुतीकरण स्पर्धा लावण्यात आली होती. त्या स्पर्धेचे स्वरूप ज्या बूथमध्ये एकूण मतदानापैकी ७०% मतदान होईल त्या बूथसाठी व झालेल्या मतदानापैकी भाजपा उमेदवारास ६०% पेक्षा जास्त होईल अशा मतदान झालेल्या सर्व बूथना प्रोत्साहन म्हणून रोख स्वरूपात बक्षीस देण्यात आले. या उपक्रमामुळे पक्षाला झालेला फायदा विचारात घेता हा उपक्रम मोठ्या प्रमाणात राबिवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. संबंधित जिल्हा परिषद गटातील मार्डी, दारफळ, हगलूर, कारंबा, बाणेगाव, भोगाव, खेड, अकोलेकाटी, गुळवंची सह जवळपास सर्वच गावामधील बूथ या बक्षीसासाठी पात्र ठरले. यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजित पवार, पृथ्वीराज माने, चैताली मुळे, तेजस्वीनी बोराडे, सुनील भोसले, सुनीता बारसकर तसेच मंडल अध्यक्ष, सेलचे अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## विनयभंगाचा जाब विचारावयास गेलेल्या पिडीतेला काठीने बेदम मारहाण

### तिघाविरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा दि.२ एप्रिल -**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागात एका तरुणीला तू खूप आवडतेस असे म्हणून तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्याचा जाब विचारावयास गेलेल्या पिडीतेस काठीने बेदम मारहाण केल्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी रसूल सिकंदर मुलाणी,अमिर सिकंदर मुलाणी,मदार सिकंदर मुलाणी या तिघा विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील पिडीता तथा फिर्यादी दि.५ मार्च रोजी सायंकाळी ७.३० वाजता घरामध्ये असताना वरील आरोपी रसूल सिकंदर मुलाणी याने येवून तू मला खूप आवडतेस असे म्हणून शरीराला झोंबा झोंबी करुन तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्यावर यातील पिडीता आरोपीचा भाऊ अमिर मुलाणी,मदार मुलाणी,आई नुरजहां मुलाणी यांना सांगण्याकरिता त्यांच्या घरासमोर गेली असता आरोपींनी तू खोटे बोलत आहेस रसूल तसं करुच शकत नाही असे म्हणून आरोपींनी पिडीतेच्या डोकीत,तोंडावर,उजव्या मांडीवर काठीने मारहाण करुन जखमी केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार श्रीमंत पवार हे करीत आहेत.

## मल्लेवाडीच्या पोलिस पाटलाला बेदम मारहाण; जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**मंगळवेढा दि.२ एप्रिल -**

मल्लेवाडी येथील पोलीस पाटील आनंद आप्पासो रायबान यांना जातीवाचक शिवीगाळी करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी विनायक भाऊसाहेब पाटील, शुभम अरुण सोलनकर,अजित सिताराम माळी या तिघाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी आनंद रायबान हे दि.१ एप्रिल रोजी ९.३० वाजता मल्लेवाडी गावातील चौकात असताना वरील आरोपींनी जवळ येवून तू आमची बदनामी करतो,इतर गावातील लोकांजवळ शिवीगाळी करतो असे म्हणून फिर्यादीस हाताने मारहाण केली. त्यावेळी आरोपी शुभम सोलनकर याने फिर्यादीच्या गळ्यातील एक तोळ्याची सोन्याची चैन हिसकावरुन घेतल्याचा आरोप फिर्यादीचा असून फिर्यादीला दोन्ही हातावर पायावर काठीने मुक्कामार देवून तू चांभार जातीचा आहे, तू गावात कसा राहतो ते आम्ही बघतो? असे म्हणून जातीवाचक शिवीगाळ केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान या घटनेचा अधिक तपास मंगळवेढ्याचे डीवायएसपी डॉ.बसवराज शिवपुजे हे करीत आहेत.

**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
**कलबुर्गी आणि बार्शी स्थानकावरील एमपीएस स्टॉलसाठी ई-लिलाव**

निविदा सूचना क्र. SUR-MPS-2026-4. सोलापूर विभागातील कलबुर्गी आणि बार्शी टाऊन स्थानकावरील एमपीएस स्टॉलसाठी ई-लिलावासंदर्भात (सामान्य लिलाव-सिग्नल स्टेज) दिनांक 25.03.2026 ची निविदा सूचना. अनुक्रमांक 1, लिलाव सूची लॉट क्रमांक: MPS-SUR-KLBG-MPS-4-25-1, अनुक्रमांक 2, लिलाव सूची लॉट क्रमांक: MPS-SUR-BTW-MPS-6-24-1, लिलाव सुरू होण्याची व संपण्याची तारीख आणि वेळ: सुरू - सकाळी 10.00 वा. 14.04.2026, बंद - सकाळी 10.40 वा. 14.04.2026, स्थानकांची नावे: कलबुर्गी आणि बार्शी टाऊन स्थानकावरील एमपीएस स्टॉलचा ई-लिलाव, पद्धत: आयरेप्स ई-लिलावाद्वारे (लीज मोड्यूल) ई-लिलाव, निविदेचा कालावधी: वार्षिक परवाना शुल्क आणि 5 वर्षे, चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी 10% वाढीसह. वेबसाइटचा पत्ता: सर्व ई-लिलावाचा तपशील, संबंधित माहिती आणि कागदपत्रे सेंट्रल रेल्वे/इंडियन रेल्वे पोर्टल http://www.lreps.gov.in/ वर उपलब्ध आहेत. सहभागींना अर्ज करण्यापूर्वी वेबसाइटला भेट देण्याची विनंती आहे.
ANJ-19
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डने प्रवास करणे टाळा.

Classifieds

**पाहिजेत**

**पार्ट-फुल टाईम राहत्या घरातून ऑनलाईन, ऑफलाईन काम करून अधिक इन्कम मिळवा. संधी सार्वांसाठी. प्रियांका मॅडम मो. 9226340650**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

# महसूल वसुलीमध्ये उद्दिष्टापेक्षा अधिक यश

## प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून ४२८.८७ कोटी रुपयांची वसुली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकलूज यांनी महसूल वसुलीत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. परिवहन कार्यालयाकडून देण्यात आलेल्या ३८९.६२ कोटी रुपयांच्या उद्दिष्टांच्या तुलनेत प्रत्यक्ष ४२८.८७ कोटी रुपयांची महसूल वसुली करण्यात आली असून, हे उद्दिष्टाच्या ११० टक्के आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात वायुवेग पथकांमार्फत कठोर कारवाई करण्यात आली. हेल्मेट न वापरणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर, सीटबेल्टचा अभाव, विमा व पीयूसी नसलेली वाहने, योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण नसलेली वाहने, रिफ्लेक्टर टेल लॅम्प नसलेली वाहने, विना अनुज्ञप्ती वाहन चालविणे तसेच क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली. या अंतर्गत एकूण २७,१७५ चलान जारी करण्यात आले. या कारवाईतून १४ कोटी रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले असून, हे १९ कोटी रुपयांच्या उद्दिष्टाच्या ७३.७२ टक्के आहे.

वाहन नोंदणीच्या बाबतीतही दोन्ही कार्यालयांनी लक्षणीय प्रगती केली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे ८७,१२८ नवीन वाहनांची नोंदणी झाली असून त्यातून २२७ कोटी ६ लाख रुपयांचा कर ऑनलाईन प्राप्त झाला आहे. तर उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकलूज येथे ४१,७५० वाहनांची नोंदणी होऊन ९२ कोटी २२ लाख रुपयांचा कर प्राप्त झाला आहे.

ई-वाहनांच्या नोंदणीतही वाढ दिसून येत आहे. सोलापूर कार्यालयात ८,१२८ ईलेक्ट्रीक दुचाकी व ३२९ चारचाकी वाहनांची नोंदणी झाली असून, अकलूज येथे ९० दुचाकी व १ चारचाकी ई-वाहनांची नोंद झाली आहे. HSRP नंबर प्लेट बसविण्याच्या मोहिमेतही प्रगती झाली आहे. सोलापूर कार्यालयात १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या ९,२६,८३९ वाहनांपैकी २,६०,५४६ वाहनांना क्ष्ठझ नंबर प्लेट बसविण्यात आल्या आहेत. तर अकलूज कार्यालयात १,९८,१२२ वाहनांपैकी ८२,०७८ वाहनांवर क्ष्ठझ नंबर प्लेट बसविण्यात आल्या आहेत. एकूणच, महसूल वसुली, नियमभंगावरील कारवाई, वाहन नोंदणी आणि ई-वाहन प्रोत्साहन या सर्व बाबींमध्ये प्रादेशिक परिवहन विभागाने उल्लेखनीय प्रगती साधली असून शासनाच्या उद्दिष्टपूर्तीस मोठा हातभार लावला आहे.

## नीलकंठ बँकेला पाच कोटी रुपयांचा नफा

### चेअरमन सीए धनराज नोगजा यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

शहरातील अग्रगण्य सहकारी बँक म्हणून ओळख असलेल्या नीलकंठ को-ऑप बँक लि., सोलापूर ने आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेरीस उत्कृष्ट आर्थिक कामगिरीची नोंद केली आहे. बँकेने सुदृढ व्यवस्थापन, पारदर्शक धोरणे आणि ग्राहक-केंद्रित सेवांच्या बळावर सर्वच आर्थिक निर्देशांकांमध्ये भरीव प्रगती साधली आहे, असे बँकेचे चेअरमन सीए धनराज नोगजा यांनी सांगितले

बँकेचे भाग भांडवल ५.३६ कोटी रुपये इतके असून एकूण ठेवी २११.५९ कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्या आहेत व त्यामध्ये गत सालापेक्षा २१ कोटीनी ठेवीमध्ये वाढ झाली आहे. तसेच कर्जवाटपातही बँकेने प्रभावी वाढ नोंदवत १२६.८५ लाख रुपयांचा टप्पा गाठला आहे. आर्थिक वर्षात बँकेने ४.९६ कोटी रुपयांचा नफा मिळवला असून गुंतवणूक ८७.१३ कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे.



धनराज नोगजा

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, बँकेने सलग तिसऱ्या वर्षी ०% निव्वळ एनपीए (छझ) राखत आर्थिक शिस्त आणि कर्ज वसुली व्यवस्थापनामध्ये उत्कृष्टता सिद्ध केली आहे. बँकेचे अध्यक्ष सीए. धनराज ह. नोगजा, उपाध्यक्ष पद्मा वि. भुतडा तसेच व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष कौस्तुभ वि. करवा यांच्या मार्गदर्शनाखाली बँक सातत्याने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद श्री. बलदवा आणि सरव्यवस्थापक सीए. शुभम ना. सोमाणी यांच्या नेतृत्वाखाली बँकेने आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून णझख सेवा, डेबिट-कम-एटीएम कार्ड्स आणि NEFT/RTGS/IMPS मोबाईल ॲप सुविधा सुरू केल्या आहेत.

## अल्पभाषिक शाळांच्या शिक्षक मान्यता तातडीने द्या

### महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २ एप्रिल-**

अल्पसंख्याक व अल्पभाषिक शाळांच्या शिक्षक मान्यता तातडीने दयाव्यात व संबंधित कर्मचाऱ्यांचे शालार्थ प्रकरणे उपसंचालक कार्यालयात तातडीने पाठवून देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष गुरुनाथ वांगीकर यांनी केली.

जिल्हातील माध्यमिक प्राथमिक शिक्षक व शाळांचे प्रलबित प्रकरणे व समस्या याविषयी निवेदन माध्यमिक शिक्षण अधिकारी सचिन जगताप व प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांना देण्यात आले.

यावेळी कृती समितीचे जिल्हाअध्यक्ष गुरुनाथ वांगीकर, प्रमोद बत्तुल, दिपक जळकोटे, राजाराम बटाणे, सचिन व्हनमाने, स्वप्निल वाडकर उपस्थित होते दोन्ही शिक्षणाधिकारी यांनी प्रकरणे तातडीने निपटारा करण्याचे आश्वासन दिले.




**या आहेत मागण्या**

अल्पभाषीक शाळेतील नव नियुक्त शिक्षकांच्या प्रलंबित मान्यता तातडीने द्या.
वैयक्तीक मान्यताप्राप्त शिक्षकांच्या शालार्थ प्रकरणे शिफारसीनुसार उपसंचालक कार्यालयात तातडीने पाठवा.
टप्पा वरील शाळा कर्मचाऱ्यांची प्रकरणे तातडीने द्या.
टप्पावरुन १०० टक्के तुकडीवरील शिक्षकांची प्रकरणे तातडीने आयुक्त कार्यालयात पाठवा
वेतनेतर अनुदानीत कॅम्प तातडीने आयुक्त कार्यालयात पाठवून द्या
आरटीई मान्यता फाईलविषयी तातडीने कार्यवाही करा
पेन्शन फाईलीचा तातडीने निकाल व्हावा.
युडायस प्रणाली व स्टुडेंट पोर्टेलवरील माध्यमिक सेवकसंच सन २०२५-२६ची तात्काळ दुरुस्ती करा
जिल्हातील अल्पभाषिक शाळेतील नवनियुक्त कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मान्यता तातडीने द्या.
शाळासाठीच्या वेतनेत्तर अनुदान कॅम्प घेउन तातडीने अनुदान वितरण करा.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीव्दारे कळविणेत येते की, मिळकतीचे वर्णन डिा व सब डिा सोलापुर पैकी तालुका सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपलिका हद्दवाढ मधील यासी जुना सर्व्हे नं. १४५, नविन सर्व्हे नं. १४३/२/ब प्लॉट नं/१, यामधील यशराज नगरी, जवाहर नगर जवळील, जुना विडी घरकुल येथील यांसी प्लॉट नं. १, याचे एकुण क्षेत्र ७७.४५ चौरस मीटर असून बिनशेती प्लॉट आहे. यांसी सोमपा मिळकत नं. ७०१०४१३ असे आहे. यांसी चतुसिमाः पुर्वेसः मंजुर लेआऊट मधील ९ मीटर रस्ता, पश्चिमेसः फायनल प्लॉट नं. ३७, दक्षिणेस : प्लॉट नं. २, उत्तरेस : सर्व्हे नं. जमीन, येणेप्रमाणे हि प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे इतर सर्व तद्‌गभुत वस्तुसहची व वहिवाटीसहची मिळकत हि अबेदा अब्दुलरशिद शेख रा. सोलापूर यांची मालकी व कब्जेवहिवाटीची असुन सदर मिळकत हि आमचे अशिलास विक्री करण्याचे ठरवुन काही रक्कम स्विकारुन तसा तोंडी विक्री व्यवहार ठरलेला आहे.

तरी वर नमुद मिळकतींवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे, गहाण, दान, लिज, भाडेपट्टा, लिन, पोटगी, टाच, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, इसारा पावती, साठेखत, करारपत्र, खरेदीखत व कोर्ट केसेस, स्टे अथवा इतर न्यायालयीन वाद, वहिवाटीचे वादाबाबत वगैरे कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी सदर हि जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०८ (आठ) दिवसाचे आत खालील नमुद विधिज्ञ पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी आपले हरकती किंवा तक्रारी नोंदवावी. मुदतीत कोणाचेही तक्रार किंवा हरकती न आल्यास आमचे अशिल पुढील खरेदीचे व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर कोणाचेही तक्रार अगर हरकत आल्यास आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तरी कोणाचेही फसगत होऊ नये म्हणुन हि जाहीर नोटीस दिली असे ताः ०२/०४/२०२६

सही/-
**ॲड. किरण सुरेश कटकुर**
**ॲड. सोनाली कटकुर-चव्हाण**
मो. नं. ८८५७९२२९०२/८६६९०४००४५
ऑ. ३४/२/७२, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर
**अशिल : संतोष सिद्राम मेनकूदळे**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ मधील मौजे शेळगी येथील सर्व्हे नं.१४/ब१+२+६+७/अ२/१/१अ पैकी ‘‘श्री. तिरुपती बालाजी नं.१ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. शेळगी, सोलापूर‘‘ मधील प्लॉट नं.७५ यांसी नवीन सिटी सर्व्हे नं. ६२८/७५ असे असून, याचे एकूण क्षेत्र ८५.६२ चौ.मी. अथवा ९२१.२७ चौ. फुट इतके आहे. यांसी चतुः सिमाः-पुर्वेसः- प्लॉट नं.७४, पश्चिमेसः- प्लॉट नं.७६, दक्षिणेसः- सर्व्हे नं.१६, उत्तरेसः-रस्ता.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मिळकत ही श्रीमती निर्मला मडीवाळप्पा दुलंगे यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असुन, त्यांनी सदरहु मिळकत ही आमचे अशिल-सुरज बिरप्पा पांढरे यांना खरेदी देण्याचे ठरवून, आमचे अशिलाकडून इसारापोटी रक्कम स्विकारुन तशी आमचे अशिलांचे नावे इसारापावती लिहून दिलेली आहे. सदरहु मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री सदरहु मिळकत मालकांनी आमचे अशिलास दिली आहे.

तरी वर नमूद मिळकतीवर अन्य कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार, टाच, साठेखत, गहाणखत वगैरे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाच्या आत त्यांचे हक्काचे पृष्ठयर्थ कागदपत्रासह त्यांची लेखी हरकत नोंदवावी. याप्रमाणे मुदतीत कोणी काही हक्काची जाणीव न दिल्यास, सदरहु मिळकत वर नमूद मालकांचे मालकीची असून ती निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली ता.०२/०४/२०२६.

सही/-
**ॲड. हर्षवर्धन एम. शिंदे**
बी.ए. एलएल.बी.,
ऑफिस- गाळा नं.९, लिंगशेट्टी मंगल कार्यालय, कस्तुरबा मार्केट समोर, बुधवार पेठ, सोलापूर. मो.नं.९६३७९६६१६१
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### जाहीर लिलाव

**श्री नृसिंह देवपंच कांदलगाव**, ता. बार्शी या देवस्थानच्या मौजे कांदलगाव, ता. बार्शी येथील शेतजमिनी -

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १) | ११८ | ०-७६ | १.९४ |
| २) | १२० | ०.५६ | ०.८७ |
| ३) | १७५ | १-८० | ४.९४ |
| ४) | ४६ | ०-३४ | ०.९७ |
| ५) | ४८ | ३-६१ | ११.०६ |

वरीलप्रमाणे देवस्थानच्या मालकीच्या कांदलगांव शिवारातील शेतजमिनी सन २०२६-२७ च्या सालासाठी कसण्यासाठी (खंडाने) देणे आहेत. त्याचा जाहीर लिलाव **रविवार दि. ५ एप्रिल २०२६** रोजी सकाळी ८-३० वाजता **कांदलगांव येथील नृसिंह मंदिरात** होणार आहे. सदर लिलावात ज्याला भाग घ्यावयाचा आहे त्यांनी मंदिरात उपस्थित राहावे. लिलावात भाग घेतलेल्या व्यक्तीपैकी जो जास्त रक्कम देईल त्याला जमीन कसण्यासाठी देण्यात येईल. लिलावात भाग घेण्यासाठी ५०००/- (पाच हजार) रुपये अनामत रक्कम भरणे बंधनकारक आहे. लिलाव मंजूर झाल्यानंतर त्या दिवशी १० टक्के व उर्वरित रक्कम ८ (आठ) दिवसांत देणे बंधनकारक आहे.आठ दिवसात रक्कम न दिल्यास १० टक्के पैसे जप्त केले जातील व पुन्हा नव्याने लिलाव काढला जाईल.

**टीप - १)** सदरचा लिलाव आयत्या वेळेची परिस्थिती पाहून तीन वर्षांसाठी देण्याबाबत पंच कमिटी निर्णय घेईल. **२)** जमीन ही कसण्यासाठी देण्यात येणार आहे. जमीन पडीक ठेऊन चालणार नाही. **३)** लिलाव रद्द करणे बाबतचे सर्वाधिकार हे चेअरमन यांना असतील.

**स्थळ : कांदलगांव**
**दिनांक : ०२/०४/२०२६**

सही/-
**हरिदास बजरंग फुरडे,**
**चेअरमन, श्री नृसिंह देवपंच,**
**कांदलगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी व ता बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर, सब. डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी बिनशेती प्लॉट याचा तपशीलः गट नंबर ६३३/१/३ यामधील बिनशेती प्लॉट नंबर २१ याचे क्षेत्रफळ १५२.०१ चौ.मी. चे चौ. फुट १६३५.६२ आहे. यापैकी पूर्व बाजूचा प्लॉट याचे क्षेत्रफळ ७५.५६ चौ.मी. चे चौ. फुट ८१३.०२ आहे. याचा बिनशेती आकार रु. ५०.०० पैसे आहे. याची मोजमापे :- पूर्व बाजू :- मीटर ९.७५ दक्षिण बाजू मीटर ७.६२५, पश्चिम बाजू :- मीटर १०.०७ व उत्तर बाजू :- मीटर ७.६२५ आहे असा संपूर्ण खुला बिनशेती प्लॉट. याची चतुःसिमा पुर्वेस :- प्लॉट नंबर २०, दक्षिणेस :- प्लॉट नंबर २२, पश्चिमेस : प्लॉट नंबर २१ पैकी माझे मालकीचा उर्वरित प्लॉट व उत्तरेस :- १२.०० मीटर रुंदीचा रस्ता आहे. सदर प्लॉटची पाणी व वागणुक उत्तर बाजूच्या रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुः सिमा पूर्वक प्लॉट आतिल दगड, माती वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह.

सदर बिनशेती प्लॉट श्री भगवान विष्णू डोईफोडे यांच्या खरेदी मालकीचा असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद असून सदर बिनशेती प्लॉट प्रत्यक्ष कब्जे वाहिवाटीस आहे. सदरची बिनशेती प्लॉट ते विक्री करू इच्छितात, सदर बिनशेती प्लॉट विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने बिनशेती प्लॉट यांनी सदरचा बिनशेती प्लॉट विक्री करणेबाबतचा करार आमच्या अशीलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे, व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशील बरोबर ठरविला आहे.

सदर बिनशेती प्लॉटवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०८ दिवसाचे आत अशिलातर्फे वकिल यांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून बिनशेती प्लॉट बिनबोजाचा, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर बिनशेती प्लॉट खरेदी करतील. खरेदीनंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दि. ०२/०४/२०२६.

सही/-
**अशील**
**श्री महादेव दशरथ शिंदे**

सही/-
**ॲड. अमरदिप राजीव क्षीरसागर,**
**ऑफिस पत्ता :-** गाळा नं. २७, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्स सुलाखे हायस्कूल रोड, बार्शी. रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.
(अशिला तर्फे ॲडव्होकेट)

**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन- अभिलेख कक्ष**

दुरध्वनी नं.-९४२१९६९५१६ Email-tahakkalkot@gmail.com
जा.क्र. २०२६/जन्म-मृत्यू/कावि/७१०/२०२६ दि. ०२/०४/२०२६

### जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
श्री. राजु बसवराज कोळी
रा. दोड्याळ ता. अक्कलकोट -- अर्जदार
**विरुध्द**
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय
ग्रामपंचायत, दोड्याळ ता अक्कलकोट -- सामनेवाला

ज्याअर्थी, यातील राजु बसवराज कोळी रा. दोड्याळ ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा मुलगा प्रविण राजु कोळी यांचा जन्म दि. २०/०९/२०१३ रोजी मौजे दोड्याळ ता. अक्कलकोट येथे झाला आहे. परंतू माझ्या मुलाच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्याच्या मुलाच्या जन्माची नोंद प्रविण राजु कोळी या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०४/०३/२०२६ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. २/४/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

सही/-
**तहसिलदार अक्कलकोट**

### जाहीर प्रसिध्दीकरण

नि.नं. ६
सिव्हील किरकोळ अर्ज नं. १६१/२०२६

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ सिनीअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात**
(मे. एन.सी. बोरफळकर सो)

**१) कुमारी महानंदा अमरप्पा केसरभावी वगैरे ३**
सर्व राहणार ब्लॉक नं.बी-५, नम्रता सोसायटी, विजापूर रोड, नडगिरी पेट्रोल पंपासमोर, सोलापूर **अर्जदार**
**विरुध्द**
**महाराष्ट्र शासन**
(समन्स मा. जिल्हाधिकारी सोलापूर रा. जिल्हा दुध डेअरी शेजारी, सातरस्ता, सोलापूर यांचेवर बजावण्यात यावे) **सामनेवाला**

डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी शहर सोलापूर येथील तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, यातील अर्जदाराचे वडिल कै. अमरप्पा राचप्पा केसरभावी हे महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्या अधिपत्याखाली शिपाई म्हणून नोकरीस होते. ते दि. ०३/०३/१९८३ रोजी सेवानिवृत्त झाले होते. त्यांना निवृत्तीवेतन (पेन्शन) मिळत होती. कै. अमरप्पा राचप्पा केसरभावी हे दि. २४/०४/२००८ रोजी मयत झाले. त्यानंतर त्यांचे निवृत्ती वेतन (पेन्शन) त्यांची पत्नी व अर्जदारांची आई श्रीमती अमरव्या अमरप्पा केसरभावी हिस फॅमिली पेन्शन मिळत होती. अर्जदाराची आई श्रीमती अमरव्वा अमरप्पा केसरभावी ही दि. ०९/०२/२०११ रोजी मयत झालेली आहे.

महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय वित्त विभाग यांच्या शासन निर्णय क्र. सेविवे/२०१८/ प्र.क्र.४४/सेवा-४ दि. ०७/०१/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमीत केलेला आहे. त्या शासन निर्णयाप्रमाणे सरकारी नोकरी मधील कर्मचारी यास पुर्वी पेन्शन मिळत असेल, तर त्यांच्या पश्चात त्यांच्यावर अवलंबून असलेल्या अविवाहीत मुली किंवा घटस्फोटीत मुलगी किंवा विधवा मुलगी, मतिमंद मुलगी किंवा मुलगा वगैरे यांना त्यांच्या पश्चात फॅमिली पेन्शन देण्याबाबत शासन निर्णय निर्गमीत केलेला आहे.

त्याअर्थी यातील अर्जदार नं. १ कुमारी महानंदा अमरप्पा केसरभावी, अर्जदार नं.२ चंद्रशेखर अमरप्पा केसरभावी, अर्जदार नं.३ रेवण अमरप्पा केसरभावी यांनी मे. कोर्टात वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी यांचे व्यतिरिक्त कोणीही वारसदार असल्यास ही जाहीर प्रसिध्दकरण नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अथवा मे. कोर्टाने नेमलेली तारीख ०५/०५/२०२६ रोजी स्वतः अगर त्यांचे विधीज्ञामार्फत ठिक सकाळी ११.०० वाजता मे. कोर्टात हजर होऊन लेखी हरकत दाखल करावी. जर मुदतीत कोणाचीही तक्रार किंवा हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचेही, कोणतीही काहीही हरकत नाही असे समजून सदर अर्जाचा निकाल केला जाईल व त्यानंतर कोणाचीही, कसलीही तक्रार, हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी ही जाहीर प्रसिध्दीकरण नोटीस दिली असे दिनांक ०१/०४/२०२६.

सही/-
**सही. लिपिक**
**मे. दिवाणी न्यायाधीश व स्तर**
**सोलापूर**

कोर्टाचा शिक्का

सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश व स्तर**
**सोलापूर**






## महत्त्वाचे

### भारतीय टेनिसपटू बिली जीन किंग चषकासाठी सज्ज

**नवी दिल्ली :** भारताने दिल्ली येथे आगामी बिली जीन किंग चषक आशिया/ओशनिया गट-१ टेनिस



स्पर्धेची तयारी सुरू केली आहे. संघाचा कर्णधार विशाल उप्पल याने, अनुभव आणि तारुण्याचा सुरेख मेळ साधणाऱ्या या संतुलित संघाबद्दल आपला विश्वास व्यक्त केला आहे. ७ ते ११ एप्रिल दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेपूर्वी येथील वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी संघ या आठवड्याच्या सुरुवातीलाच दिल्लीत दाखल झाला आहे. गत वर्षी भारताने प्ले-ऑफ फेरीपर्यंत मजल मारली होती, परंतु त्यापुढे जाण्यात त्यांना अपयश आले होते. या नवीन चेहऱ्यांमध्ये पदार्पण करणाऱ्या वैष्णवी अडकरचा समावेश आहे. ही माझ्यासाठी एक उत्तम संधी आहे. देशाचे प्रतिनिधित्व करणे हा माझा सन्मान आहे, असे वैष्णवी म्हणाली. भारताची तिसऱ्या क्रमांकाची खेळाडू वैदेही चौधरी हिने २०२५-२६ च्या हंगामात एक विजेतेपद आणि अनेक स्पर्धांच्या उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला होता. ती सध्या क्रमवारीत सुमारे ४५० व्या स्थानावर आहे. २०२५-२६ चा हंगाम अत्यंत यशस्वी ठरलेल्या अनुभवी खेळाडू ऋतुजा भोसले व सहजा यमलपल्लीने सांघिक एकजुटीचे महत्त्व विशद केले.

### अर्जेंटिना फुटबॉल संघाचा भारत दौरा रद्द

**कोची :** अर्जेंटिना फुटबॉल संघाचा भारत दौरा रद्द झाला आहे. लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखालील अर्जेंटिना राष्ट्रीय फुटबॉल संघाने मोठ्या प्रमाणावर आर्थिक बांधिलकी दर्शविली असूनही, नियोजित मैत्रीपूर्ण सामना खेळण्याचे वचन पाळले नाही व राज्याची दिशाभूल केली, असा आरोप केरळचे क्रीडामंत्री व्ही. अब्दुरहिमान यांनी केला. मेस्सी व विश्वविजेत्या संघाला केरळमध्ये आणण्यासाठी आम्ही सखोल चर्चा केली आणि सर्वतोपरी प्रयत्न केले. या आंतरराष्ट्रीय संघासाठी आवश्यक असलेल्या २५० कोटी रुपयांच्या निधीसाठी प्रायोजक मिळवणे हे एक अत्यंत कठीण काम होते, असे अब्दुरहिमान यांनी मलप्पुरम येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले. ही योजना बारगळल्याबद्दल त्यांनी यावेळी तीव्र नाराजी व्यक्त केली.

### रॅसी व्हॅन डर डुसेनचा क्रिकेटला रामराम

**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकेचा अनुभवी फलंदाज रॅसी व्हॅन डर डुसेन याने



आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. सोशल मीडियावर भावनिक पत्र लिहित त्याने हा निर्णय जाहीर करत देशासाठी खेळणे हा आपल्या आयुष्यातील सर्वात मोठा सन्मान असल्याचे सांगितले. उशिरा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करूनही रॅसीने एकदिवसीय सामन्यांत उत्कृष्ट कामगिरी करत स्वतःची छाप सोडली. २०२३ च्या विश्वचषकात त्याने दोन शतके झळकावत संघाला उपांत्य फेरीपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. आता त्याच्या निवृत्तीनंतर दक्षिण आफ्रिका संघाला मधल्या फळीतील अनुभवी खेळाडूची उणीव भासणार आहे.

### आसामच्या देवी दैमारीला कुस्तीत रौप्यपदक

**अंबिकापूर :** रायपूर येथे आयोजित खेलो इंडिया वनवासी क्रीडा स्पर्धेमध्ये महिलांच्या ६२ किलो वजनी गटाच्या कुस्ती स्पर्धेत



आसामच्या देवी दैमारीने रौप्यपदक पटकावले. प्रतिकूल परिस्थितीतून आलेल्या देवी दैमारीने हे यश संपादन केले आहे. कुस्तीपटू देवी दैमारी ही आव्हानांवर मात करण्यासाठी आवश्यक असलेल्या याच चिकाटी आणि दृढनिश्चयाच्या भावनेचे मूर्तिमंत उदाहरण आहे. आसामच्या गोलाघाट जिल्ह्यातील सिसुपानी भागातील दिनेशपूर गावातील रहिवासी असलेल्या या २८ वर्षीय तरुणीने वयाच्या सातव्या वर्षीच आपले आई-वडील गमावले. त्यानंतर ती आपल्या काका-काकींकडे राहू लागली. आर्थिक अडचणींमुळे, आपले प्रशिक्षण सुरू ठेवण्यासाठी तिला मिळेल ती छोटी-मोठी कामे करावी लागली. तिच्या या सर्व कष्टांचे अखेर सार्थक झाले. हे पदक माझ्या कठोर परिश्रमाचे फळ आहे. मी २०२२ मध्ये बोकाखात येथील काझीरंगाजवळ असलेल्या खेलो इंडिया केंद्रात कुस्तीचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. तिथे सराव करण्यासाठी मला जवळच एक खोली भाड्याने घ्यावी लागली होती; परंतु १,००० रुपये भाडे देण्यासाठी माझ्याकडे पैसे नव्हते. त्यामुळे, मला वर्षभर अर्धवेळ नोकरी करावी लागली, असे बोडो जमातीशी संबंधित असलेल्या देवीने सांगितले.

# सीएसकेचे मुसंडी मारण्याचे ध्येय

**चेन्नई, २ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम पंजाब किंग्स आणि चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) यांच्यादरम्यान सामा खेळला जाणार आहे.

आपल्या पहिल्याच घरच्या सामन्यात बलाढ्य पंजाब किंग्जला कडवी झुंज देण्यासाठी चेन्नई सुपर किंग्सला खेळाच्या सर्वच विभागांमध्ये लक्षणीय सुधारणा करावी लागेल. राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या सलामीच्या सामन्यात सीएसकेची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली होती.



आता युवा खेळाडूंनी भरलेल्या सीएसके संघाला गुवाहाटीमध्ये काहीच जमले नाही. त्या मानहानिकारक पराभवाला मागे टाकून पुढे जाण्याचीच सीएसकेची आता एकमेव इच्छा असेल.

शुक्रवारी होणाऱ्या सामन्यासाठी चेन्नईची खेळपट्टी फलंदाजीसाठी अत्यंत अनुकूल असेल अशी अपेक्षा आहे. दुखापतग्रस्त महेंद्र सिंह धोनी स्नायूंच्या दुखापतीतून सावरत असतानाही, कर्णधार ऋतुराज गायकवाडला मोलाचा सल्ला देण्यासाठी तो उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या हंगामासाठी संघात समाविष्ट केलेला त्यांचा सर्वात मोठा खेळाडू संजू सॅमसन सीएसकेकडून पदार्पण करताना फार काळ खेळपट्टीवर टिकू शकला नाही; त्यामुळे आता आपल्या घरच्या प्रेक्षकांसमोर छाप पाडण्यासाठी तो नक्कीच उत्सुक असेल.

रॉयल्सविरुद्धच्या सामन्यात सीएसकेला डेवाल्ड ब्रेव्हिसच्या सेवेपासून वंचित राहावे लागले होते. तो दुखापतीतून किती सावरला आहे, याबद्दल अद्याप कोणतीही स्पष्टता नाही.

फलंदाजीची फळी कोसळल्यानंतर इम्पॅक्ट प्लेयर म्हणून सर्फराज खानला मैदानात उतरविण्यात आले होते. तो फार काळ खेळपट्टीवर टिकला नाही, तरीही २०१३ च्या हंगामापासूनच्या आपल्या पहिल्याच सामन्यात तो खेळपट्टीवर अत्यंत सहजतेने खेळताना दिसून आला. कार्तिक शर्मासारख्या युवा खेळाडूंकडून संघाच्या अपेक्षाही वाढत जातील.

> **आजचा सामना**
>
> **पंजाब किंग्स वि. चेन्नई सुपर किंग्स**
>
> **स्थळ :** एम. ए. चिदम्बरम्, स्टेडियम, चेन्नई
>
> **वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
>
> **थेट प्रसारण** स्टार स्पोर्ट्सवर

गोलंदाजीत मॅट हेनरी व नूर अहमदसारखे गोलंदाज जोमाने पुनरागमन करण्यासाठी नक्कीच आतुर असतील.

सीएसकेचा सामना गेल्या वर्षीच्या अंतिम फेरीतील संघ पंजाब किंग्सशी होणार आहे. पंजाब किंग्स श्रेयस अय्यर व रिकी पॉंटिंगच्या काळात एक बलाढ्य संघ बनला आहे.

या हंगामात विजेतेपद पटकावण्याच्या उद्देशाने, त्यांना कूपर कॉनोलीच्या रूपात एक सक्षम तिसऱ्या क्रमांकाचा खेळाडू सापडला आहे. पंजाब संघात मार्कस स्टोइनिसच्या नेतृत्वाखाली एक मजबूत अष्टपैलू खेळाडूंचा गाभा आहे.

आयपीएलमध्ये या दोन्ही संघांची एकमेकांशी ३२ वेळा गाठ पडली असून, दोन्ही संघांनी प्रत्येकी १६ सामने जिंकले आहेत. अनेकदा पंजाबने सीएसकेविरुद्ध आपली बाजू समर्थपणे लावून धरत चांगली कामगिरी केली आहे. *(वृत्तसंस्था)*

# पुण्याचा दिग्विजय भोंडवे ग्रीकोरोमन महाराष्ट्र केसरी

## दुसऱ्या ग्रीकोरोमन वरिष्ठ राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेचा समारोप

**देवळी, २ एप्रिल**

कुस्तीप्रेमींसाठी उत्साहाची ठरलेल्या दुसऱ्या ग्रीकोरोमन महाराष्ट्र केसरी किताबाच्या अंतिम लढतीत पुण्याच्या दिग्विजय भोंडवे याने बुलढाण्याच्या अक्षय शेळकेवर मात करीत मानाचा महाराष्ट्र केसरी किताब पटकावला. दिग्विजय भोंडवे याला गृहराज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर व आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या हस्ते चांदीची गदा व रोख देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ बुधवारी स्व. दत्ता मेघे क्रीडा नगरी येथे उत्साहात पार पडला. स्पर्धेत राज्यभरातील नामांकित पहेलवानांनी दमदार कामगिरी केले. पुरस्कार वितरण अशोक उईके यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. पंकज भोयर होते. यावेळी स्पर्धेचे आयोजक माजी



विजेता दिग्विजय भोंडवे यांना पुरस्कृत करताना उईके, बाजूला डॉ. भोयर व उपस्थित मान्यवर

खासदार रामदास तडस, स्वागताध्यक्ष आ. राजेश बकाने, भाजपा जिल्हाध्यक्ष संजय गाते, माजी जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, भाजपा महिला आघाडीच्या अध्यक्ष वैशाली येरावार, कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप अप्पा भोंडवे, विदर्भ केसरी संजय तिरथकर, रविराज देशमुख, तहसीलदार समर्थ क्षीरसागर, उपाध्यक्ष राहुल चोपडा, मदन चावरे, माजी नगराध्यक्ष शोभा तडस, एस. एम. डब्ल्यू. इस्पातचे उपाध्यक्ष श्यामसुंदर मुंदडा यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रास्ताविकात रामदास तडस यांनी सांगितले की, खऱ्याअर्थाने २०१४ नंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुस्तीला राजाश्रय देण्याचे काम केले. आता क्रीडा क्षेत्राचा विकास होत आहे. तर, डॉ. पंकज भोयर यांनी, कुस्ती व कबड्डीसाठी आवश्यक मॅट तत्काळ डीपीडीसीमार्फत उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. ना. अशोक उईके यांनी, कुस्ती हा प्राचीन व परंपरागत खेळ असून, त्यात चपळता, बुद्धी, ताकद व कौशल्याचा संगम असल्याचे सांगितले. याप्रसंगी वरिष्ठ गट ग्रीकोरोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेतील विविध वजन गटांतील विजेत्या पहेलवानांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरित करण्यात आले. संचालन ज्योती भगत यांनी तर आभार रवींद्र करोटकर यांनी मानले. *(तभा वृत्तसेवा)*

# हनुमान जयंती निमित्तच्या कुस्ती मैदानात तिन्ही कुस्त्या बरोबरीत



**तभा वृतसेवा**
**माळशिरस, दि २ एप्रिल-**

ग्राम दैवत हनुमान जयंती निमित्त ग्राम स्थांच्या वतीने घेण्यात आलेल्या कुस्ती मैदानात पहिल्या क्रमांकाची कै बाजीराव देशमुख (वस्ताद) यांचे स्मरणार्थ एक लाख इनामाची पै.धनाजी कोळी व पै सतपाल सोनटक्के यांच्यातील कुस्ती बरोबरीत झाली. त्याच बरोबर दुसऱ्या क्रमांकाची राहुल सूळ व कालीचरण सोलनकर तसेच तिसऱ्या क्रमांकाची सोनू सोनटक्के व अण्णा यमगर याही कुस्त्या बरोबरीत झाल्या.

हनुमान जयंती निमित्त येथील शाळेच्या क्रीडांगणावर १० रुपये पासून १ लाख रुपये इनामाच्या कुस्त्याचे आयोजन करण्यात आले होते. या तालुक्यातील पैलवानांनी उत्तम प्रतिसाद दिला. या कुस्ती स्पर्धेसाठी धनाजी मदने, हनुमंत शेंडगे, सोमनाथ दडस यांनी समालोचक म्हणून काम पहिले. तर नामांकित पैलवानांनी पंचाची भूमिका बजावली. यास्पर्धेस पै. विजय देशमुख, माणिकराव वाघमोडे, रावसाहेब मगर, तुकाराम देशमुख, हिम्मत सोनवलकर, गौतम माने, सर्जेराव घोडके, सचिन वावरे आदी उपस्थित होते.

# विश्वचषकापूर्वी ऑस्ट्रेलिया झिम्बाब्वेच्या दौऱ्यावर

**सिडनी, २ एप्रिल**

ऑस्ट्रेलियाचा संघ सप्टेंबर महिन्यात तीन एकदिवसीय आंतरराष्ट्रीय (वन-डे) सामन्यांच्या मालिकेसाठी झिम्बाब्वेचा दौरा करणार आहे. २०१४ नंतर या आफ्रिकन देशात खेळण्याची ही त्यांची पहिलीच वेळ असेल. झिम्बाब्वे हा देश दक्षिण आफ्रिका व नामिबिया यांच्यासह २०२७ च्या वन-डे विश्वचषकाचे सह-यजमानपद भूषवणार आहे. त्यामुळे, या वर्षीच्या दौऱ्यामुळे ऑस्ट्रेलियन संघाला तिथल्या स्थानिक परिस्थितीशी आणि वातावरणाशी जुळवून घेण्याची व परिचित होण्याची संधी मिळणार आहे. हे तिन्ही एकदिवसीय सामने १५ ते २० सप्टेंबर या कालावधीत हरारे स्पोर्ट्स क्लब येथे खेळले जातील. ऑस्ट्रेलियाचे पुन्हा एकदा झिम्बाब्वेध्ये स्वागत करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. ही एकदिवसीय मालिका अत्यंत चुरशीची आणि स्पर्धात्मक ठरेल, असे झिम्बाब्वे क्रिकेटचे व्यवस्थापकीय संचालक गिव्हमोर माकोनी म्हणाले.

# सोलापूरचा महिला संघ सुपर लीग फेरीमध्ये पात्र

## भक्ती पवार, साक्षी वाघमोडे चमकल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित आमंत्रित वरिष्ठ महिला च्या वनडे स्पर्धेमध्ये सोलापूर संघ पाच पैकी चार सामने जिंकून सुपर लीग स्पर्धेसाठी पात्र झाला.

सोलापूर संघाने अनुक्रमे बीड जिल्हा संघ, ज्युडिशियल क्लब पुणे, हिंगोली संघ, धुळे जिल्हा संघ, या सर्व बलाढ्य संघा वर विजय मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली. यामध्ये कर्णधार साक्षी वाघमोडे, भक्ती पवार,माही राठोड, कार्तिकी देशमुख.प्रतिभा माशाळे, स्नेहा शिंदे यांची उत्कृष्ट फलंदाजी, तसेच विभावरी देवकते,भक्ती पवार



भक्ती पवार



भक्ती पवार

अमृता गव्हाणे, पुनम माशाळे यांच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे हे यश प्राप्त झाले. भक्ती ने १४ बळी घेतले तर कर्णधार साक्षी वाघमोडेने शतकी खेळी करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. या उत्कृष्ट कामगिरीसाठी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन रणजितसिंह मोहिते पाटील, सेक्रेटरी धैर्यशील मोहिते पाटील व चंद्रकांत रेम्बर्सु, महिला निवड समितीच्या चेअरमन किरण मणियार, स्नेहल जाधव, सारिका कुरनूरकर, मानसी जाधव यांनी संघाचे कौतुक केले.

# अंबर, माऊली, मॉडर्न, समर्थ संघाचे विजय

## इंडियन मॉडेल पॅरेंट्स लीग क्रिकेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

श्री अरुणोदय मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. प्रायोजित केलेल्या इंडियन मॉडेल पॅरेंट्स लीग सिझन १६ क्रिकेट स्पर्धेत अंबर, माऊली मास्टर, मॉडर्न व समर्थ संघाने शानदार विजय मिळविले.

येथील रेल्वे मैदानावर झालेल्या या स्पर्धेत अंबरने रॉयल्सवर ७ गडी राखून विजय मिळविला. माऊली मास्टर संघाने टाईम्सवर ५ धावांनी मात केली. मॉडर्न या संघाने अल्फा २२ धावांनी हरविले. समर्थ संघाने रॉयल इंडियन्सला १४ धावांनी नमविले. अनुक्रमे हिरालाल बुधाराम, चेतन वनगुंटी, अब्दुल पिरजादे व एकनाथ शिंदे हे सामन्याचे मानकरी ठरले.



एकनाथ शिंदे



अब्दुल पिरजादे



हिरालाल बुधाराम



चेतन वनगुंटी

**संक्षिप्त धावफलक :**

**रॉयल्स :** १२ षटकात ९ बाद ८७ (महेश आरकाल ३४, बालाजी बोल्ली व शरणप्पा पासोडी १५, हिरालाल बुधाराम३-१६, महेंद्र ढवाण २-५) **पराभूत विरुद्ध अंबर :** १०.४ षटकात ४ बाद ९२ (हिरालाल बुधाराम नाबाद ३२, विनायक बेऊर २५, सुरेश नागदेव १३, कुमार देवसानी, प्रमोद मंगलपल्ली, महेश आरकाल व सचिन वांगीकर प्रत्येकी १ बळी).

**माऊली मास्टर :** १२ षटकात ६ बाद ९० (चेतन वनगुंटी ३३, जावेदा नाईकवाडी २९, सुंगधराज कुलकर्णी १४, मकरंद बसवंती १-८, प्रवीण पाटील १-२३) **वि. वि. टाईम्स :** १२ षटकात ८ बाद ८५ (चेतन बत्तीन ३४, आनंद खमितकर २०, चेतन वनगुंटी२-१०).

**मॉडर्न :** १२ षटकात ४ बाद १२५ (अब्दुल पिरजादे नाबाद ५२, अहमद शेख ३३, शंकर सरवदे १२, अभिजित कुलकर्णी २-२१) **वि. वि. अल्फा :** १२ षटकात ५ बाद १०३ (अझम मुजावर २४, गणेश जाधव ४६, गिरीष तुंबल २-१२).

**समर्थ :** १२ षटकात ७ बाद १०४ (एकनाथ शिंदे ३६, इम्तियाज अत्तार ३०, रवी माने ११, अतुल लवटे २-१४, विनय खट्टे २-११, अजिंक्य कुलकर्णी २-२१) **वि. वि. रॉयल इंडियन्स :** १२ षटकात ८ बाद ९० (प्रितीश कुलकर्णी ११, अतुल लवटे १९, कौस्तुभ सुरु १६, हरीष कुलकर्णी १५, नितीन शिंदे २-१२).

# सुमुख गायकवाड व श्रेयांस शहा यांना बुद्धिबळातील ‘फिडे इन्स्ट्रक्टर’चा जागतिक किताब

## सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

भारतातील प्रथितयश अनुभवी प्रशिक्षक सुमुख गायकवाड आणि कॅंडिडेट मास्टर श्रेयांस शहा या गुरु-शिष्य जोडीने जागतिक बुद्धिबळ संघटनाकडून दिला जाणारा प्रशिक्षकांसाठीचा तिसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च ‘फिडे इन्स्ट्रक्टर’ (आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक) हा किताब मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या या यशामुळे सोलापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

सोलापूरचे पहिले आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड यांनी हैदराबाद येथे आयोजित फिडे ट्रेनर परीक्षेत यश मिळवत सोलापूरचे पहिले ‘आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक’ होण्याचा मान मिळवला आहे. तसेच सोलापूरचे पहिले आंतरराष्ट्रीय कॅंडिडेट मास्टर श्रेयांस शहा यांनी पुणे येथे झालेल्या फिडे ट्रेनर परीक्षेत उत्तीर्ण होत ‘आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक’



सुमुख गायकवाड



श्रेयांस शहा

हा किताब संपादन केला. सुमुख गायकवाड यांनी विविध राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पदकविजेते खेळाडू घडविले आहेत. तर श्रेयांस शहा यांनी आशियाई तसेच अनेक आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंना मार्गदर्शन केले आहे. विशेष म्हणजे, श्रेयांस यांनी बुद्धिबळाचे प्राथमिक धडे सुमुख गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले आहेत, हा एक सुंदर योगायोग आहे. या दोघांच्या जागतिक यशामुळे सोलापूरातील खेळाडूंना बुद्धिबळातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण व कौशल्य



मिळण्यास मदत होणार असून स्थानिक खेळाडूंची गुणवत्ता उंचावण्यास निश्चितच हातभार लागणार आहे.

श्रेयांस व सुमुख यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल भारतीय बुद्धिबळ संघाचे मुख्य प्रशिक्षक व मेजर ध्यानचंद पुरस्कार विजेते अभिजीत कुंटे, महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष परिणय फुके, सचिव निरंजन गोडबोले, संघटनेचे आधारस्तंभ अशोकभाऊ जैन तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते-पाटील, अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर आदींनी अभिनंदन केले.



# ‘एलबीपीएम’ महाविद्यालयातील पाच खेळाडूंची जिल्हा कबड्डी संघात निवड

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

सात रस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील पाच खेळाडूंची जिल्हा कबड्डी संघात निवड झाली. ज्ञानेश्वरी खोसे, वैष्णवी खोसे, मेघना दोडमिसे, श्रुती बंडगर, पूजा बेरे हे निवड झालेले पाच खेळाडू आहेत. त्यांना क्रीडा संचालक प्रा. भक्तराज जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचीही प्रशिक्षक म्हणून निवड झाली आहे. सिन्नर (जि. नासिक) येथे सुरु असलेल्या स्पर्धेत ते सहभागी झाले आहेत. त्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागाचे चेअरमन संजीव पाटील, प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे, उपप्राचार्य डॉ. किशोर पवार, डॉ. मधुकर जडल यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### चिखलठाणच्या कोटलींग देवाच्या यात्रेला सुरुवात

**जेऊर दि.२ एप्रिल**

आंबील पौर्णिमा उत्सवाने चिखलठाण ता करमाळा येथिल कोटलींग यात्रेला सुरुवात झाली आहे भाविकांच्या उपस्थितीत कोटलींग जोगेश्वरी विवाह सोहळा संपन्न होऊन देवाची पालखी मिरवणूक काढण्यात आली . मुख्य यात्रा चैत्र कृष्ण अष्टमीला म्हणजे दहा एप्रिल रोजी संपन्न होत आहे. सोलापूर सातारा धाराशिव पुणे नगर जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कोटलींग देवाची यात्रा ही करमाळा तालुक्यातील सर्वात मोठी यात्रा समजली जाते चैत्र पोर्णिमेच्या दिवशी चांगभले च्या जयघोषात कोटलींग जोगेश्वरी विवाह सोहळ्याने या यात्रेची सुरुवात होते मुख्य यात्रा चैत्र कृष्ण अष्टमीला म्हणजे १० एप्रिल रोजी छबीना मिरवणूक होणार आहे सर्वधर्म समभावाचे प्रतिक असणार्या या यात्रेत विविध जाती जमातीच्या समाजातील लोकांना मान असतो गावातील परिट समाजातील प्रतिधीच्या हस्ते देवाला तेल लागते, आंबील पौर्णिमा दिवसी या देवाच्या मानाच्या कावडी बसवल्या जातात. देवाला तेल लागल्याच्या कालावधीत गावातील लोकांकडून तेलवान कडकपणे पाळले जाते .यामध्ये मांसाहार पुर्णपणे बंद असतो देवाचे भक्त चैत्र शुक्ल सप्तमी म्हणजेच २५ मार्चपासून नऊ दिवसाचे उपवास धरतात पौर्णिमे दिवशी आंबील पिऊन हे उपास सोडले जातात आंबिल पोर्णिमेच्या आरतीनंतर ढोल लेझीमचा ठेका धरत देवाची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली होती. बारा बलुतेदार संघटनेच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



### जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त बांधकाम कामगारांना गृहोपयोगी साहित्य वाटप

**करमाळा, दि.२ एप्रिल -**

शिवसेना श्रमिक राष्ट्रीय कामगार सेना सोलापूर जिल्हाध्यक्ष अमोल जाधव यांच्या ३१ मार्च रोजी असणाऱ्या वाढदिवसानिमित्त एक अनोखा आगळा वेगळा उपक्रम म्हणून वाढदिवसानिमित्त वायपट खर्च न करता कामगारांची गरज ओळखून गरजू बांधकाम कामगारांना गृहउपयोगी किट (भांडी) वाटप करण्यात आले सदर कार्यक्रम हा अमोल जाधव यांच्या गायकवाड चौक येथील संपर्क कार्यालय येथे संपन्न झाला. या गृहपयोगी वस्तूमध्ये एकूण ३० वस्तू दिल्या आहेत. यामध्ये ताट -४, वाट्या -८, ग्लास-४, पातेले - ३, मोठा चमचा -२, जग -१, मसाला डबा -१, डबे -३, परात -१, प्रेशर कुकर -१, कढई - १, टाकी - १ या वस्तूंचा समावेश आहे. बांधकाम कामगार हा सातत्याने स्थलांतरित करीत असतो. एका साईटवरील काम संपले की नवीन बांधकामाच्या ठिकाणी अगदी कुटुंबासह अनेक बांधकाम कामगार जात असतात. अशावेळी अनेक अडचणींचा या बांधकाम कामगारांना सामना करावा लागतो. अगदी निवासस्थानाची सोय, पाल्यांचे शिक्षण आणि आरोग्यविषयक समस्या यांची मोठी गैरसोय होत असते, पण यातूनही या बांधकाम कामगारांच्या संसाराला वेगळ्या पद्धतीने हातभार लागण्यासाठी हा अनोखा उपक्रम राबवला आहे असे यावेळी जाधव यांनी व्यक्त केले.



### झाडी येथे शिबिरात ११७ जणांचे रक्तदान; कै. प्रशांत मते यांना आगळीवेगळी श्रद्धांजली

**वैराग, दि.२ एप्रिल -**

बार्शी तालुक्यातील झाडी येथे सामाजिक कार्यकर्ते कै. प्रशांत मते यांच्या ८ व्या पुण्यस्मरणाचे औचित्य साधून 'मावळा ग्रुप'च्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तब्बल ११७ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून आपल्या लाडक्या व्यक्तिमत्त्वाला आगळीवेगळी श्रद्धांजली अर्पण केली. श्री भगवंत ब्लड बँक, बार्शी यांच्या सहकार्याने हे शिबिर पार पडले. यावेळी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून या उपक्रमाचे कौतुक केले. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बार्शी नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष रोहित पाटील, गटनेते विजय चव्हाण, भाजपा तालुकाध्यक्ष मदन दराडे, पंचायत समिती सदस्य संजय भड, रणजीत महानवर,प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी कै. प्रशांत मते यांच्या स्मृतींना उजाळा दिला आणि 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' असल्याचे सांगत तरुणांच्या या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. शिबिरात गावातील व परिसरातील ११७ तरुणांनी उत्साहाने सहभाग घेऊन रक्त संकलनास मदत केली. श्री भगवंत ब्लड बँकेच्यावतीने सर्व रक्तदात्यांना 'गौरव पत्र' देऊन सन्मानित करण्यात आले. या यशस्वी उपक्रमासाठी 'मावळा ग्रुप'चे सर्व सदस्य, झाडी ग्रामस्थ आणि श्री भगवंत ब्लड बँकेचे टीमने विशेष परिश्रम घेतले. शिबिराच्या माध्यमातून जमा झालेले रक्त गरजू रुग्णांसाठी मोलाचे ठरणार असून, झाडी येथील या उपक्रमाची संपूर्ण तालुक्यात चर्चा होत आहे.

## निधन वृत्त...

### संजना बडवे



**बार्शी दि. २ एप्रिल -**

श्री भगवंत मंदिरातील मानाचे पुजारी व श्री भगवंत सहकारी पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक भागवत बडवे यांच्या पत्नी संजना बडवे (वय - ६८) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. निधनापूर्वी एक तास अगोदर त्या श्री भगवंत मंदिरात पुजारी म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. मंगळवार पेठेतील मोक्षधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# नंदेश्वर येथे अवकाळी पावसाचा मोठा फटका

**बेदाणे शेडचे नुकसान, वीज पडून गाय दगावली**

**आ.आवताडे यांची पाहणी; प्रशासनाला मदतीच्या सूचना**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ एप्रिल-**

मंगळवेढा तालुक्यातील नंदेश्वर परिसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी व नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अचानक झालेल्या पावसाने द्राक्ष उत्पादनासाठी उभारण्यात आलेल्या बेदाणे शेडचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. याचदरम्यान नंदेश्वर येथील शेतकरी धोंडीराम गरंडे यांची गाय वीज पडून मृत्यूमुखी पडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

घटनेची माहिती मिळताच आमदार समाधान आवताडे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. त्यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी प्रांत अधिकारी बि.आर. माळी, तहसीलदार मदन जाधव, तालुका कृषी अधिकारी मनिषा मिसाळ, पंचायत समिती सभापती दिपाली ताड, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर, उपनगराध्यक्ष येताळा भगत, पंचायत समिती सदस्य आप्पासाहेब निकम,मंडल कृषी अधिकारी बालाजी टेकाळे, कृषी पर्यवेक्षक ढाने, सहाय्यक दिपक कोकरे, तलाठी महेश राऊत, पशुधन विकास अधिकारी कुंभार, माजी नामदेव जानकर, दादासाहेब दोलतडे, अशोक चौंडे, भारत गरंडे, दामाजी बंडगर, राहुल कसबे, ज्ञानेश्वर गरंडे, जयसिंग कांबळे, दत्ता साबणे, नानासाहेब बंडगर, मायाप्पा गरंडे, आण्णासाहेब बंडगर, आण्णासाहेब पाटील, सिद्धेश्वर डांगे तसेच स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदार समाधान आवताडे म्हणाले, नंदेश्वर परिसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाच्या माध्यमातून बाधित शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळवून देण्यासाठी मी स्वतः पाठपुरावा करणार आहे. प्रशासनाने पंचनामे जलद गतीने पूर्ण करून एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

आमदार आवताडे यांनी प्रशासनाला तातडीने हालचाल करण्याचे आदेश देत, नुकसानग्रस्त पिकांचे, घरांचे तसेच मृत जनावरांचे पंचनामे त्वरित पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील सर्व बाधितांना शक्य तितक्या लवकर आर्थिक मदत मिळवून देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून, शासनाने तात्काळ मदत जाहीर करावी अशी मागणी स्थानिक शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.

# पंढरपुरात कडकडाटासह दमदार पाऊस

**शेतकऱ्यांचे मोठे नुकसान, दिवसभर सुर्यदर्शन नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ एप्रिल -**

गेल्या आठ दिवसापासून सूर्यनारायणाने आग ओकण्यास सुरुवात केलेली आहे. त्यामुळे सर्वत्र वातावरणात उकाडा निर्माण झाला होता. मात्र बुधवारी दुपारी १२ वाजल्यापासून ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला होता. मात्र विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस झाला.यामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याचे दिसून येत आहे.

राज्यात १ ते ५ एप्रिल दरम्यान अनेक जिल्ह्यांमध्ये पाऊस पडेल, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्यानुसार बुधवारी दुपारी १२ वाजल्यापासून पंढरपूर शहर व तालुक्यात



ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला होता; मात्र रात्री ८ नंतर अचानक वातावरणात बदल होऊन विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस पडला. या पावसामुळे आंबा, डाळिंब, द्राक्ष, बेदाणा, केळी, ज्वारी, गहू, कांदा, भाजीपाला आदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याचे दिसून येत आहे. शेतातील पिकांचे नुकसान झाले असल्यामुळे कृषी विभागाने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी होऊ लागली आहे.

**बाजारभावाचे संकट असतानाच पाऊस**

अधिच सध्या बाजारात शेतमालास दर नाही. त्यामुळे एकीकडे शेतकरी चिंताग्रस्त असतानाच बुधवारी रात्री अचानक विजेच्या कडकडाटासह पाऊस झाला असल्यामुळे शेतकऱ्यांवर आता आसमानी संकट देखील कोसळले असल्याने शेतकरी वर्गातून चिंता व्यक्त केली जात आहे.

**गुरुवारी सकाळीही हलक्या सरी**

बुधवारी रात्री नंतर गुरुवारी सकाळी देखील पावसाच्या हलक्या सरी शहरात कोसळल्या. सकाळी थोडावेळ सुर्यदर्शन झाले मात्र दुपारनंतर पुन्हा एकदा आभाळ भरुन आलेले होते. तसेच उकाड्याच्या प्रमाणात देखील वाढ झालेली होती.

**प्रशासकीय इच्छाशक्तीचा विजय**

# कोळेगाव-कटफळ नकाशावरील रस्ता अखेर मोकळा; ५०० शेतकऱ्यांना दिलासा



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.२ एप्रिल -**

अनेक वर्षांपासून कागदावरच असलेला आणि प्रत्यक्ष वहिवाटीसाठी बंद असलेला माळशिरस तालुक्यातील कोळेगांव ते कटफळ (ता. सांगोला) हा नकाशावरील रस्ता अखेर प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे मोकळा झाला आहे. सुमारे ३ किलोमीटर लांबीचा हा रस्ता खुला झाल्याने माळशिरस आणि सांगोला या दोन्ही तालुक्यातील सुमारे ५०० शेतकऱ्यांचा दळणवळणाचा मोठा प्रश्न सुटला आहे.

अकलूजच्या उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माळशिरसचे तहसीलदार सुरेश शेजुळ यांच्या आदेशानुसार ही धडक कारवाई करण्यात आली. विशेष म्हणजे, हा रस्ता मार्गी लावण्यासाठी तहसीलदार शेजुळ यांनी स्वतः दोन वेळा प्रत्यक्ष स्थळाला भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला व सामंजस्याने मार्ग काढला.

हा रस्ता खुला करण्यात पिलीवचे मंडलाधिकारी विजय एकतपुरे यांची प्रबळ इच्छाशक्ती कामी आली. तसेच भूमी अभिलेख उपअधीक्षक मडके व भूमापक प्रशांत पाटील यांनी तांत्रिक बाजू यशस्वीपणे हाताळल्या. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी वेळापूर पोलीस स्टेशनचे पी.एस.आय. प्रणीत कांबळे व सूर्यवंशी मॅडम यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

कोळेगांव ग्राम पंचायतीच्यावतीने या रस्त्यासाठी दीर्घकाळापासून पाठपुरावा सुरू होता. रस्ता खुला होत असताना माजी सरपंच रजनी प्रसाद दुपडे, उपसरपंच,सविता नागनाथ दुपडे ग्रामपंचायत सदस्य,सुषमा धनंजय दुपडे,सुनीता ज्योतीराम सावंत,मोहिनी बाळासाहेब वाघमारे, पोलीस पाटील बिभीषण दुपडे,ड. नवनाथ सावंत,अजय भंडगे आदी उपस्थित होते.

> अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न सुटल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. शेतीमाल ने-आण करण्यासाठी आता शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागणार नाही. प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयाचे हे उत्तम उदाहरण आहे.
>
> **- रजनी दुपडे, माजी सरपंच**

# राजेवाडी आणि निरा उजवा कालव्यातील वितरकांना वेळेत पाणी सोडा



**आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या बैठकीत सूचना**


**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२ एप्रिल -**

राजेवाडी तलाव आणि निरा उजवा कालव्याच्या काही वितरकांना अद्याप पाणी सोडण्यात आलेले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. या समस्येचे निराकरण करण्यासाठी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी बैठक आयोजित केली होती. या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर पाणी सोडण्याचे निर्देश त्यांनी दिले. यावेळी नीरा उजवा कालवा व राजेवाडी तलाव फलटणचे कार्यकारी अभियंता मोरे, उपविभागीय अधिकारी राजेंद्र धोत्रे, तसेच पंढरपूर पाटबंधारे विभागाचे अधिकारी व शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी ज्या वितरकांना अजूनही पाणी सोडण्यात आलेले नाही, त्यांना तातडीने आणि वेळेत पाणी उपलब्ध करून देण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले. तसेच पाण्याचे समन्यायी वाटप, अनधिकृत उपसा रोखणे आणि दुरुस्तीच्या कामांमुळे होणारा विलंब टाळणे यावरही चर्चा करण्यात आली. काही वितरकांमधून पाणी अद्याप सोडले नसल्याने उन्हाळी पिकांना पाण्याची टंचाई भासत होती. यामुळे शेतकऱ्यांनी पाणी सोडण्याची मागणी केली होती.

> राजेवाडी तलाव आणि निरा उजवा कालव्याच्या टेल एंड भागातील शेतकऱ्यांना नेहमीच पाणी मिळण्यात अडचणी येतात. या बैठकीत अधिकाऱ्यांनी लवकर पाणी सोडण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे पिकांना जीवदान मिळेल. ज्या ठिकाणी कालव्याच्या देखभाल-दुरुस्तीचे काम चालू आहे ते वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरून पाण्याची गळती आणि अपव्यय टाळता येईल.
>
> **- आ.डॉ. बाबासाहेब देशमुख**

## पश्चाताप

प्रभू येशूचे शिष्य मत्तय (२७: ४४) व मार्क (१५:३२) ह्यांनी आपल्या शुभ वर्तमानात लिहिलेले आपण वाचतो की, येशू बरोबर वधस्तंभावर लटकवलेल्या दोन्ही चोरांनी प्रथम येशूची निंदा केली व प्रभू येशूचा आणखी एक शिष्य लुकाच्या शुभ वर्तमानात आपण वाचतो. (लुक २३:४० :४१ ) एक चोर दुसऱ्या चोराला म्हणतो तुलाही ती शिक्षा झाली असता तू देवाला सुद्धा भीत नाहीस काय आपली शिक्षा तर यथा न्याय आहे. कारण आपण आपल्या कृत्यांचे योग्य फळ भोगीत आहोत परंतु ह्याने काही अयोग्य केले नाही. प्रभू येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर प्रथम उच्चारलेल्या क्षमेच्या शब्दामुळे लुक (२३:३४) हे बाप्पा त्यांना क्षमा कर कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही व तिथे जमलेले लोक अधिकारी व शिपाई येशूची निंदा व छळ करीत आहेत. या सर्वांचा परिणाम चोराच्या मनावर हृदयावर व अंतकरणावर झाला त्याने प्रभू येशूला जाणले ओळखले व विश्वास ठेवून विनंती केली व म्हटले लुक (२३:४२) अहो येशू आपण आपल्या राजाधिकाराने याल तेव्हा माझी आठवण करा येशू त्याला म्हणाला मी तुला खचित सांगतो तू आज माझ्याबरोबर सुख लोकात असशील लूक (२३: ४३) हे दैवी आश्वासन प्रभू येशू कडून मिळविले व मरणाला सामोरे गेला. आयुष्याच्या शेवटच्या अवस्थेत असताना थोड्यावेळाच्या काळासाठी प्रभू येशूच्या संपर्कात हा चोर येऊन खरा पश्चाताप करून तारण साधून घेतले व मरणानंतरच्या चांगल्या सुख लोकांच्या जागेची आश्वासन मिळवले आज जे



लोक देवाचे भय बाळगत खऱ्या पश्चातापाने आपले पाप कबूल करतात त्यांच्या जीवनात स्वर्गीय शांतीचा अनुभव येतो जीवनात विजयी होतात व आनंदाने आपले जीवन जगू शकतात कारण प्रभू येशूने म्हटले मार्क सत्य व जीवन मीच आहे. योहान (१४: ६) आज जगाची परिस्थिती बदलत आहे. पण न बदलणाऱ्या प्रभूकडे (परमेश्वर) आज स्वतः पश्चाताप करून पाप कबुली देऊन जर आपण आपली पापे पदरी घेतली तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करेल व आपल्याला सर्व अनितीपासून शुद्ध करेल. पहिले योहान (१:९) याचा अनुभव जिवंतपणेच या पृथ्वीवर घेऊयात या व खऱ्या अर्थाने गुड फ्रायडेची शिकवण समजून घेऊ

**-सुनील एस. मोरे**
**९८८१७२१५७८**

# राज्यात नावलौकिक होईल असा शिक्षण विभागाने कारभार करावा : केदार सावंत






**जि.प.मध्ये नतमस्तक होऊन स्वीकारला सभापती पदभार**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२ एप्रिल -**

जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रशासनाने तातडीने कामाला लागावे, राज्यात नावलौकिक होईल असा शिक्षण विभागाने कारभार करावा अशा सूचना देत जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी गुरुवारी जिल्हा परिषदेत आल्यानंतर नतमस्तक होऊन सभापती पदभार स्वीकारला. यावेळी त्यांनी शिक्षण विभागाची आढावा बैठक घेतली. याप्रसंगी शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी शिक्षण विभागाची संपूर्ण माहिती दिली. यावेळी मार्गदर्शन करताना सभापती चेतनसिंह केदार यांनी शिक्षण विभागाचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी प्रशासनाने प्रयत्नशील राहावे. गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करावेत. फक्त कागदोपत्री काम नको, प्रत्यक्ष निकाल दिसला पाहिजे.

प्राथमिक शाळांचा पट वाढला पाहिजे, यासाठी प्रयत्न करावेत. शाळांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव पाठविण्यात यावेत. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रशासनाने प्रयत्नशील रहावे. शिक्षण क्षेत्रात नवनवीन कल्पना अंमलात आणाव्यात. आदर्श शाळा, गुणवंत विद्यार्थी व गुणवंत शिक्षकांना पाठबळ द्यावे अशा सूचना देत शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल असे सांगितले. दरम्यान चेतनसिंह केदार सावंत यांनी गुरुवारी जि.प.प्रा.शाळा सांडसमळा वाढेगाव, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र वाढेगाव व आंधळगाव या ठिकाणी भेटी देऊन प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधांचा साठा, तपासणी यंत्रणा आणि रुग्णांना दिल्या जाणाऱ्या उपचार पद्धतींची सखोल पाहणी करण्यात आली. ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने सेवा मिळावी, यासाठी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून काम करावे आणि कोणत्याही रुग्णाला उपचाराविना परत पाठवू नये, असे निर्देश पाहणीत सभापती चेतनसिंह केदार यांनी दिले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## थोडक्यात...



### कै.वि.मो. मेहता प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

कै.वि.मो.मेहता प्राथमिक शाळेत इ४थी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी नियामक मंडळाचे अध्यक्ष सुरेश मंकणी, मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर, सीमा डिगे यांची प्रमुख उपस्थिती होती. श्रुती कुलकर्णी यांनी 'अशी पाखरे येती' हे गीत सादर केले. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शाळेविषयी आपले ऋण व्यक्त केले. तिसरीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून चौथीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. वर्गशिक्षिका सुजाता यादव यांनीही मनोगत व्यक्त केले.



### प्रा.मित्रगोत्री, दत्ता भोसले यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

मराठा समाज सेवा मंडळ संचलित छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज मधील प्रा.डॉ.अरुण मित्रगोत्री व ग्रंथालय परिचर दत्ता भोसले यांचा निवृत्तीनिमित्त मंडळाचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा.डॉ.अरुण मित्रगोत्री व ग्रंथालय परिचर दत्ता भोसले यांनी आपल्या सेवाकाळात संस्थेने सुवर्ण अक्षरांनी लिहावे अशा पध्दतीचे कार्य केले, असे माजी महापौर मनोहर सपाटे यांनी सांगितले. याप्रसंगी संस्थेचे सरचिटणीस प्रा.महेश माने, खजिनदार महादेव गवळी, संचालक विनायक पाटील, सुरेश पवार, मुकुंद जाधव, मंगेश जाधव, अशोक चव्हाण, अलका सुरवसे आदींची प्रमुख उपस्थिती होती. माजी प्राचार्य डॉ.यशवंत डोके, अविनाश कुलकर्णी, मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, डॉ.मधुकर पवार, डॉ.अरुण सोनकांबळे, प्रा.डॉ.नागेश गायकवाड, प्रा.डॉ.राणी मोटे, प्रा.सचिन चव्हाण, हरिभाऊ कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राचार्यद्वय डॉ.नितीन मोटे, मंजुश्री पाटील, उषा गोकुळे, किशोर बनसोडे, नागनाथ नवगिरे, बाळासाहेब ओहोळ, नंदकुमार येच्चे, जयजित पटवा, दादा सुरवसे, बाई भोसले, सुरेखा मित्रगोत्री, बाबुराव व्यवहारे, बाबूराव डोंगरे, अरविंद येळे, प्रा.डॉ.युवराज सुरवसे, प्रा.डॉ.वाल्मिकी कीर्तिकर उपस्थित होते.

# पंढरपूरला होणार अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय

## वडाळ्यात होणार अप्पर तहसील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

महसूल विभागाचा वाढता व्याप आणि लोकसंख्येचा विचार करून राज्य मंत्रिमंडळाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी, नागरिकांची कामे जलद गतीने व्हावीत यासाठी राज्यात ११ नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालये, ६९ अतिरिक्त तहसीलदार कार्यालयांची निर्मिती करणार आहे.

यामध्ये पुणे विभागात पंढरपूर येथील अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथील अप्पर तहसील कार्यालयाचा समावेश असून, ही कार्यालये लवकरच कार्यान्वित होतील, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिली.

या निर्णयामुळे पंढरपूर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयास पंढरपूर, सांगोला, माळशिरस, माढा, करमाळा आणि मोहोळ हे तालुके प्रशासकीयदृष्ट्या जोडले जाणार आहेत. तर येथील नव्याने होत असलेल्या वडाळ्याच्या अप्पर तहसील कार्यालयास बाळे, मार्डी आणि वडाळा हे तीन सर्कल जोडले जाणार आहेत. यामुळे या भागातील लोकांची प्रशासकीय कामे आता त्या-त्या भागातील कार्यालयात होणार आहेत. नागरिकांना जिल्हा किंवा तालुका मुख्यालयापर्यंत जाण्यासाठी करावी लागणारी पायपीट कमी होणार आहे.




### प्रशासकीय विकेंद्रीकरणावर भर

राज्यातील अनेक जिल्ह्यांचा भौगोलिक विस्तार मोठा आहे, तसेच काही तालुके जिल्हा मुख्यालयापासून अत्यंत दूर अंतरावर आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे महसूल विभागावर कामाचा मोठा ताण येत होता. हा ताण कमी करण्यासाठी महसूल विभागाने सादर केलेल्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दाखवला आहे. यामध्ये प्रामुख्याने पुणे विभागात ३ नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी पदे निर्माण केली जाणार असून, इतर विभागांमध्ये प्रत्येकी १ पद असेल. विशेष म्हणजे पुणे जिल्ह्यातील बारामती येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय, तर चाकण येथे अतिरिक्त तहसीलदार कार्यालय सुरू होणार आहे.

### नवीन कार्यालय निर्मितीचे असे आहेत निकष

नवीन कार्यालयांची निर्मिती करताना सरकारने काही विशिष्ट निकष लावले आहेत. यामध्ये संबंधित क्षेत्रातील तालुक्यांची संख्या, एकूण लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्रफळ, आदिवासी आणि दुर्गम भागातील जनतेची गरज यांचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे. जिल्हा मुख्यालयापासून प्रस्तावित कार्यालयाचे अंतर आणि तालुक्यातील सर्वात दूरच्या गावाची स्थिती लक्षात घेऊन हे निर्णय घेण्यात आले आहेत. अतिरिक्त तहसीलदार कार्यालयांसाठी महसूल मंडळांची संख्या आणि गावांमधील आंतर यावर भर देण्यात आला आहे.




**पैटिंगमधून संदेश...:** युध्द थांबवण्यासाठी सचिन खरात यांनी पेंटिंगतून जगाला संदेश देताना चार पुतळा परिसरात टिपलेले छायाचित्र.

# दोंदे नगरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात

## हजारो भाविकांनी घेतले श्रींचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०२ एप्रिल-**

जुळे सोलापुरातील दोंदे नगर येथील जागृत हनुमान मंदिरात श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. श्री हनुमान समाजसेवी संस्थेच्या वतीने आयोजित जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त मंदिर परिसरात आकर्षक मंडप उभारण्यात आला होता.



मंदिरात रांगोळीच्या माध्यमातून श्री हनुमानाची गदा साकारण्यात आली होती, जी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. मंदिर भगव्या पताकांनी सजवल्यामुळे वातावरणात मंगलमय चैतन्य निर्माण झाले होते. याप्रसंगी उद्योजक धीरेंद्र कपूर यांनी आपल्या कुटुंबासोबत श्री हनुमानाची पूजा व आरती केली. हनुमान जयंतीनिमित्त सकाळी जन्मोत्सव सोहळा पार पडल्यानंतर दुपारी बारा ते चार या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, तर सायंकाळी भजनाचा कार्यक्रम झाला. मंदिर परिसरात पूजा साहित्य विक्रीचे विविध स्टॉल्सही लावण्यात आले होते. दिवसभरात सोलापूर शहरासह परिसरातील हजारो भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने हनुमानाचे दर्शन घेतले. दोंदे नगर येथील हे मंदिर १९९० पासून भाविकांचे श्रद्धास्थान असून २००२ साली मंदिराची भव्य उभारणी करण्यात आली आहे. श्री हनुमान समाजसेवी संस्थेच्या वतीने येथे सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी बसवराज सोन्नद, विठ्ठल गरड, भिमराया कापसे, सुरेश खमितकर, दयानंद स्वामी, नागेश कालेकर आणि अन्य सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.


# सिध्देश्वर बँकेचा करपूर्व नफा १०.५० कोटींचा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २ एप्रिल-**

सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी अत्यंत कठीण परिस्थिती असताना मार्च - २०२६ अखेरीस बँकेने रु. १००० कोटी मिश्र व्यवसायाचा टप्पा पार पाडला आहे. ही बाब अतिशय कौतुकास्पद आहे. अशी भावना बँकेचे मार्गदर्शक राजशेखर शिवदारे यांनी व्यक्त केले. बँकेने रु. १००० कोटी रुपयाचा मिश्र व्यवसाय पार पाडल्या निमित्त आयोजित केलेल्या प्रसंगी ते बोलत होते. जगातील युद्धजन्य परिस्थितीमुळे बँकिंग क्षेत्राला पुढील काळात फार जपून काम करावे लागणार आहे. परंतु सिद्धेश्वर बँकेची व्यवसाय करण्याची पद्धत पाहता या बँकेस व्यवसाय वाढीची संधी उपलब्ध असेल असे मत त्यांनी व्यक्त केले.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय घाळे यांनी दि. ३१ मार्च २०२६ अखेर बँकेच्या आर्थिक व्यवहाराचे विवेचन सादर केले. ठेवी रु. ६०१.९७ कोटी, कर्जे ४१८.६३ कोटी, ढोबळ नफा रु. १० कोटी ५० लाख, असून नेट एनपीए 0% असल्याची माहिती सादर केली.

मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत यंदाच्या वर्षी बँकेच्या ठेवी ६० कोटी रुपयांनी वाढल्या आहेत. हे जनतेने सिद्धेश्वर बँकेवर दाखविलेल्या विश्वासाचे प्रतिक असल्याचे चेअरमन नरेंद्र गंभिरे यांनी सांगितले. त्यांनी सर्व ठेवीदारांचे आभार व्यक्त केले. यासाठी


नरेंद्र गंभिरे


सुचेता थोबडे

मार्गदर्शक श्री. राजशेखर शिवदारे यांचे मार्गदर्शन, संचालक मंडळाचे सहकार्य व सेवक वर्गानी उपसलेले कष्ट सहाय्यभूत ठरले असे प्रतिपादन केले. बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चे सदस्य श्री. मल्लिनाथ दुलंगे यांनी आपल्या मनोगतात बँकेने रु. १००० कोटीचा मिश्र व्यवसायाचा टप्पा पार केला तो फार महत्वाचे असल्याचे सांगितले.

सभासदांनी, ठेवीदारांनी सिद्धेश्वर बँकेवर दाखविलेला विश्वास कायम राखण्यास ही बँक कटिबद्ध असल्याचे मत बँकेचे तज्ञ संचालक श्री. राजन रिसबूड आणि इतर संचालकांनी व्यक्त केले.

याप्रसंगी बँकेचे व्हा. चेअरमन सुचेता थोबडे, संचालक श्री. अशोक लांबतुरे, श्री. पशुपतीनाथ माशाळ, रुपाली बिराजदार, अॅड. मल्लिनाथ पाटील, शिवानंद कोनापुरे, भीमाशंकर म्हेत्रे, सिद्धेश्वर मुनाळे, महेश सिंदगी, अॅड. धानय्या चिवरी, सेवक प्रतिनिधी राजेश कलशेट्टी, बसवराज कोरवार आणि सरव्यवस्थापक राम शर्मा हे उपस्थित होते.


इंदरमल जैन


दीपक मुनोत


संजय सेठीया

# महावीर बँकेच्या ठेवीत रु. २८ कोटीने वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २ एप्रिल-**

आर्थिक वर्ष २०२५-२६ अखेर सोलापुरातील अग्रगण्य श्री महावीर अर्बन को-ऑप. बँक लि, सोलापूर या बँकेच्या ठेवीत रु. २८ कोटीने वाढ झाली आहे.

दिनांक ३१.०३.२०२६ अखेर बँकेचे एकूण ठेवी रु. ५३१, कर्जे रु. ३७० कोटी, ढोबळ नफा रु. ९ कोटी, आणि एन.पी.ए. १.१५% इतका आहे. बँकेने डिजिटल बँकिंग व्यवहारात अवघ्या एकच वर्षात रु. ५०० कोटीचे व्यवहार पूर्ण करून सहकारी बँकिंग क्षेत्रात कांती घडवून उतुंग यश प्राप्त केले आहे. बँकेच्या डिजिटल बँकिंग च्या मोबाईल बँकिंग अॅप द्वारे RTGS, NEFT, IMPS व्यवहार करता येते आणि UPI व्यवहार करता येते.

बँकेस आत्ता पर्यंत उत्तम कामगिरी बद्दल विविध पारितोषक प्राप्त झाले आहेत. ह्यात विविध प्रमुख प्रतिष्ठीत संस्थाकडून आदर्श बँक उत्कृष्ट बैंक सर्वोत्तम अध्यक्ष असे अनेक पुरस्कार बँकेस प्राप्त झाले आहेत. बँकेचे एकूण सहा शाखा असून लवकरच स्वमालकीचे माधव नगर शाखा सुरु करण्यात येणार आहे. बँकेचे सभासद, ठेवीदार, खातेदार, ग्राहक आणि हितचिंतक यांच्या अतूट विश्वासामुळेच श्री महावीर बँक' यशाची नवनवीन शिखरे सर करत आहे, असे चेअरमन इंदरमल जैन, दिपक मुनोत, व्हाईस चेअरनम संजय सेठिया यांनी सांगितले.



# श्री साईलिला मंदिरच्या वतीने जिर्णोध्दार, कळसारोहण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २ एप्रिल-**

जुना विडी घरकुलमधील आय ग्रुप येथील श्री साईलिला सांस्कृतिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला श्री साईबाबा मंदिर जिर्णोध्दार आणि भव्य कळसारोहण समारंभ अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.





गुरुवार, दि.२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजून ४१ मिनिटांच्या शुभमुहूर्तावर नगरसेवक प्रथमेश कोठे यांच्या हस्ते मंदिराचे मुख्य कळसारोहण करण्यात आले. यावेळी भाविकांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. याप्रसंगी नगरसेवक सतीश सिरसिल्ला, नगरसेविका दीपिका यलदंडी, उज्वला दासरी यांची प्रमुख उपस्थिती होती. कळसारोहण सोहळ्यानिमित्त कळस महाअभिषेक व पादुका पंचामृत अभिषेक, शास्त्रोक्त पद्धतीने होमहवन, श्री कळसारोहण प्राणप्रतिष्ठापना आणि महाआरती आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी नागेश गोरंटला, बालाजी कुंटला, भरत पेरला, सिध्देश्वर गुर्रम, विशाल बुगडे, रघुनंदन सामलेटी, राहुल तलकोकुल, मनोज बुधाराम, निखिल बिनगुंडी यांच्यासह आय ग्रुप परिसरातील सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी जुना विडी घरकुल परिसरातील साईभक्त उपस्थित होते.



# 'बोल बजरंग बली की जय'च्या घोषणांनी बार्शी शहर दुमदुमले

- महाप्रसाद, रक्तदान शिबिरासह विविध उपक्रमांचे आयोजन
- हनुमान जयंतीच्या उत्सवाला वाऱ्यासह पावसाची हजेरी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २ एप्रिल-**

श्री हनुमान जयंतीच्या पार्श्वभूमीवर बोल बजरंग बली की जयच्या घोषणांनी बार्शी शहर दुमदुमून गेले होते. बार्शी शहरातील विविध मंदिरात महाप्रसाद, रक्तदान शिबीरासह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ऐनापुर मारुती, संतोष गुंड मित्र मंडळ (अलीपूर रोड), दोस्ती ग्रुप (खुरपे बोळ), इंडस्ट्री एरिया येथे मधुशेठ चांडक परिवार, विजय तरुण गणेश मंडळ (जुनी वेस) आदी ठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान, हनुमान जयंती उत्सवाला वाऱ्यासह पावसानेही हजेरी लावली होती. यावेळी सर्व मंदिरांना आकर्षक रंगरंगोटी व विद्युत रोषणाई, फुलांची सजावट करण्यात आली होती. बार्शी शहरातील पंचमुखी मारुती, बोंबल्या मारुती, ऐनापुर मारुती, सोन्या मारुती, वडार समाज मारुती, श्री हनुमान मंदिर (जुनी वेस), श्री हनुमान व नवग्रह मूर्ती मंदिर (आडवा रस्ता), महाद्वार चौक, माळे गल्ली, भवानी पेठ, वडार गल्ली मारुती, श्री हनुमान मंदिर (अलीपूर रोड), दंगल्या मारुती, जय शंकर मिल, मंगळवार पेठ, घोडके प्लॉट, ४२२ परिसर तसेच कसबा पेठेतील समर्थ व्यायामशाळेत (तरुण भारत कार्यालय) आदी ठिकाणी मोठ्या उत्साहात हा उत्सव साजरा करण्यात आला. दोस्ती ग्रुप (खुरपे बोळ) यांच्या वतीने हनुमान जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आ. सोपल व माजी आ. राजेंद्र राऊतांनी विविध हनुमान मंदिरांना भेटी देऊन पूजाअर्चा केली व भाविकांशी संवाद साधला.

## उमरड येथे हनुमान जयंती साजरी

**करमाळा :** उमरड येथे हनुमान जयंती उत्साह पूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. सकाळपासूनच बजरंग बली हनुमानजीचा अभिषेक करून गावकऱ्यांनी देवाच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. सत्रात ह भ प दयानंद महाराज यांचे कीर्तन झाले. त्यांनी आपल्या कीर्तनातून बजरंग बली हनुमान शक्ती व भक्तीचे द्वैतक असल्याचे सांगितले कीर्तनसेवेनंतर सर्व गावकऱ्यांना भोजन देण्यात आले.

सायंकाळी भव्य मिरवणूक गावातून काढण्यात आली. या मिरवणुकीत गावातील अनेक तरुण आनंदाने सहभागी झाले होते. ही संपूर्ण जयंती पार पाडण्यासाठी कैलास इटकर व त्यांचे सहकारी मित्र सक्रिय सहभागी झाले होते.



सत्ताधारी पक्षाच्या सभागृह नेत्याला बैठका घेण्यासाठी नव्याने उभारत असलेल्या सभागृह नूतनीकरणाचे काम युध्दपातळीवर सुरु आहे.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर | शुक्रवार, दि. ३ एप्रिल २०२६ | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात...

### महिला भाडेकरुने लंपास केली सोने, चांदी, रोख रक्कम

**सोलापूर दि. २ एप्रिल-**
घराशेजारी मोकळ्या जागेत घर उघडे ठेवून कपडे धुण्यास गेले असता, भाडेकरुने घरात प्रवेश करुन देव्हाऱ्याजवळ ठेवलेले सोने, चांदी व रोख रक्कम असा ५ लाख ९० हजार ४०० रुपये किंमतीचे ऐवज लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी मालन शेख व जैतुन शेख या दोघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबतचे वृत्त असे की, सुवर्णा भागप्पा आजमाने (रा.शांती नगर, मजरेवाडी, सोलापूर) ह्या दि.१७ फेब्रुवारी रोजी घराशेजारील मोकळ्या जागेत कपडे धुण्यास गेले असता, भाडेकरु मालन शेख यांनी घरात प्रवेश करत देव्हाऱ्याजवळ ठेवलेले सोन्याचे ३ गंठण, सोन्याचे २ कानातील, सोन्याचे कानातील पट्टी, सोन्याची बुगडी, सोन्याची बाली, सोन्याची बोरमाळ, सोन्याचे रिंग, सोन्याची पिळ्याची अंगठी, चांदीचे पैंजण, ब्रेसलेट व रोख रक्कम चोरुन जैतुन शेख हिला दिले. याबाबत विचारणा केली असता सदर दागिने व रोख रक्कम परत देणार असल्याचे शेख यांनी सांगितले होते. परंतु आजपर्यंत परत दिलेले नाही. त्यामुळे दि. १ एप्रिल रोजी फिर्याद दाखल करण्यात आली.

### इंडक्शनसह पाणबुडी मोटारी, टिकाव, खोरे चोरुन नेले

**सोलापूर दि. २ एप्रिल-**
उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथील एका घरात चोरी झाल्याची घटना घडली. विनायक योगिनाथ भेंडे यांच्या घराचा कडीकोयंडा तोडून ४ इंडक्शन मोटारी, ३ एचपी क्रॉम्प्टन, २ पाणबुडी मोटारी, ३ एचपी, ६ लोखंडी पार, ६ टिकाव, ८ लोखंडी घन, ६ लोखंडी खोरे, १ लोखंडी बाज असा सुमारे हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यानी चोरुन नेला. याबाबत तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली.

### दूध देण्यासाठी जात असताना कोयत्याने वार

**सोलापूर दि. २ एप्रिल-**
मालकाच्या घरी दूध देण्यासाठी जात असताना चौघांनी मिळून एकास शिवीगाळ, दमदाटी करत लाथाबुक्क्यांनी मारहाण आणि कोयत्याने वार केल्याची घटना गोंधळी वस्ती येथे घडली. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विष्णू बापूराव घोडके हे दि.३१ मार्च रोजी मुळेगाव रोडवरील गुरु राघवेंद्र नगर येथील मालकाच्या घरी दूध देण्यासाठी जात असताना गोंधळी वस्ती सुजित साळुंखे, अभिषेक गोटीपामुल, साहिल शेख व नितीन या चौघांनी तू शुभम स्वामी याच्याबरोबर का फिरतो? असे म्हणून शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी करत कोयत्याने वार केले, असे फिर्यादीत नमूद आहे.

### कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा

**सोलापूर दि. २ एप्रिल-**
सोलापूर महानगरपालिकेतील विविध कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनने म हापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली. २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. जीएसटी अनुदानात वाढ करुन वेतन व पेन्शनसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन द्यावा. म हागाई भत्त्यात टप्प्याटप्प्याने वाढ करावी. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे थकित देणे अदा करावे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर घनकचरा व्यवस्थापन विभागातील कर्मचाऱ्यांच्या कामाच्या वेळेत बदल करावा, असे या निवेदनात म्हटले आहे. यावेळी संघटनेचे अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले, इक्बाल तडकल, श्रीनिवास रामगल, अरुण म्हेत्रे, राम चंदनशिवे, सुनील शिंदे उपस्थित होते.

### जुळे सोलापुरात हनुमान जन्मोत्सव उत्साहात

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**
जुळे सोलापुरातील दोंदे नगर येथील जागृत हनुमान मंदिरात श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी जन्मोत्सव सोहळा, दुपारी महाप्रसाद वाटप तर सायंकाळी भजन कार्यक्रम झाला. सन १९९० पासून या परिसरातील भाविकांचे श्रध्दास्थान म्हणून गणल्या जाणाऱ्या या मंदिराची उभारणी सन २००२ साली करण्यात आली. श्री हनुमान समाजसेवी संस्थेच्यावतीने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी बसवराज सोन्नद, विठ्ठल गरड, भिमराया कापसे, सुरेश खमितकर, दयानंद स्वामी, नागेश कालेकर आदींनी परिश्रम घेतले.

# पॅनिक बुकिंगमुळे गॅस सिलेंडरच्या मागणीत अडीच पट वाढ

### जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल, गॅस सिलेंडरचा तुटवडा नाही
### गॅस एजन्सीसमोर ई-केवायसी, बुकिंगसाठी गर्दी नको
### एजन्सींना वाढीव गॅस सिलेंडर पुरवठा केला जाणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ एप्रिल-**
सोलापूर जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडरचा तुटवडा नाही. एलपीजी गॅस पुरवठामध्ये बदल झालेला नाही. परंतु पॅनिक बुकिंगमुळे गॅस सिलेंडरच्या मागणीत अडीच पट वाढ झालेली आहे. त्यामुळे सिलेंडरचा पुरवठा करण्यात वेळ लागत आहे, असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्पष्ट केले. गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्या आणि एजन्सीच्या प्रतिनिधींच्या बैठकीत ते बोलत होते.



शहरात बीपीसीएल, आयओसीएल व एचपीसीएल या तीन गॅस कंपनीच्या एकूण २० गॅस एजन्सी कार्यरत आहेत. यातील ७ गॅस एजन्सीकडे ई-केवायसी, गॅस सिलेंडरसाठी नागरिक मोठ्या प्रमाणावर गर्दी करत असल्याचे निदर्शनास आले आहे. नागरिकांनी घरी बसून क्यूआर कोडच्या माध्यमातून ई केवायसी करावी. गॅस एजन्सींना वाढीव गॅस सिलेंडर पुरवठा केला जाणार आहे.

गॅस सिलेंडर, पेट्रोल, डिझेल संदर्भात नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नयेत. गॅस सिलेंडरचा अतिरिक्त साठा आवश्यक असल्यास एजन्सीज्नी मागणी नोंदवावी. ऑनलाइन बुकिंग केलेल्या ग्राहकांनाच घरपोच गॅस सिलेंडर पोहोचवण्याचे योग्य नियोजन करावे. त्यासाठी अतिरिक्त वाहने व डिलिव्हरी बॉय उपलब्ध करून घ्यावेत, असे निर्देशही त्यांनी दिले. ग्राहकांची होत असलेली गर्दी लक्षात घेवून ग्राहकांसाठी तक्रार निवारण केंद्र उभारले जात आहेत. यासाठी पुरवठा विभागाचे तीन कर्मचारी, एचपीसीएल बीपीसीएल व आयओसीएल या कंपनीचा एक एक प्रतिनिधी नियुक्त करण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, गॅस कंपनीचे जिल्हा समन्वयक रघुकुमार, एचपीसीएलचे सागर चव्हाण व आयओसीएलचे सागर गौतम आदी उपस्थित होते.

#### तिन्ही कंपन्यांना वाढीव गॅस पुरवठा : रघुकुमार

तिन्ही कंपन्यांच्या वतीने गॅस सिलेंडरची वाढीव मागणी असलेल्या गॅस एजन्सींना पुरवठा करण्यात येईल. ग्राहक तक्रार निवारण केंद्रासाठी एक-एक कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात येईल. गॅस सिलेंडरची डिलिव्हरी झाली त्या दिवसापासून शहरी भागात एक गॅसधारक २५ दिवसात तर डबल गॅसधारक ३५ दिवसात आणि ग्रामीण भागात ४५ दिवसात गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्यात येणार आहे, गॅस कंपनीचे जिल्हा समन्वयक रघुकुमार यांनी सांगितले.

# तुरटी खरेदीसह १० ठिकाणी इलेक्ट्रिक पंपसेट बसविण्यास मंजुरी

### महापालिका स्थायी समिती सभेत दोन महत्त्वाच्या विषयांना मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**
सोलापूर महानगरपालिका स्थायी समितीच्या सभेत तुरटी खरेदीसह शहरातील १० ठिकाणी विंधन विहिरीवर इलेक्ट्रिक पंपसेट बसविण्याच्या महत्त्वाच्या विषयांना मंजुरी देण्यात आली.

महापालिकेची स्थायी समिती सभा गुरुवारी सायंकाळी कौन्सिल हॉल येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात सभापती रंजीता चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेशी संबंधित दोन महत्त्वाचे प्रस्ताव एकम ताने मंजूर करण्यात आले. सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागांतर्गत सर्व जलशुद्धीकरण केंद्रांसाठी पाणी शुद्धीकरण प्रक्रियेस आवश्यक असलेली ७०० मेट्रिक टन तुरटी खरेदी करण्यास म ान्यता देण्यात आली. ही खरेदी महालक्ष्मी ट्रेडींग कंपनीकडून ६३ लाख ३९ हजार ९०० रुपयांना करण्यात येणार आहे.



तसेच झोन क्र. १ व २ अंतर्गत केगाव दळवे गल्ली, मराठा वस्ती ५० सीट, जम्मा वस्ती, काडादी चाळ जाधव पान दुकानासमोर, तुप्पद धट्टी, काडादी ते चाळ कोकाटे यांच्या घराजवळ, धोत्रीकर वस्ती, बोरमाळ, भीम नगर, दहिटणे, सरवदे नगर अशा एकूण १० ठिकाणी विंधन विहिरीवर इलेक्ट्रिक पंपसेट बसविण्याच्या कामास मंजुरी देण्यात आली. हे काम गुरुकृपा इलेक्ट्रिकल अँड रिवाइंडिंग वर्कस्, सोलापूर यांच्याकडून इस्टिमेट दरापेक्षा ०.५० टक्के कमी दराने ६ लाख ७१ हजार ५२० रुपयांत करण्यात येणार आहे.

दरम्यान, पंपसेट बसविण्याच्या विषयावर चर्चा करताना आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी संबंधित ठिकाणी हातपंप बसविण्याची सूचना केली. यावर सभापती चाकोते यांनी आता हातपंप कोण वापरणार? असा सवाल उपस्थित करत आधुनिक पद्धतीने इलेक्ट्रिक पंप बसविणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. तसेच पाणीपुरवठा व्यवस्थेबाबत अधिक कार्यक्षमतेने काम करण्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांना विविध सूचना देत येत्या आठवड्यात कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

# गॅस वेळेत मिळण्यासाठी २४७ आपत्कालीन कक्ष स्थापन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २ एप्रिल-**
सध्या आखातातील युध्दामुळे सोलापूर जिल्हयामध्ये गॅस टंचाई निर्माण झालेली आहे, त्यामुळे गॅस एजन्सीमार्फत वेळेवर गॅस सिलेंडर मिळणेकामी अडचणी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर शासन गॅस वितरणाबाबत कडक उपाययोजना अंमलात आणित आहे. सदर उपायोजनेनुसार सोलापूर जिल्हयामध्ये गॅस वितरण करणेत येत आहे. सदर उपाययोजनेची अंमलबजावणी योग्य स्वरूपात व्हावी याकरीता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मान्यतेने २४७ आपत्कालीन कक्षाची स्थापना करणेत आलेली आहे.

त्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयात आपत्कालीन कक्षाची स्थापना करणेत आलेली असून, ज्या नागरिकांना गॅस/पेट्रोल वितरणाबाबत तक्रार करायची असेल त्यांनी ०२१७-२७३१०१२ या क्रमांकावर संपर्क करून आपली तक्रार नोंदवावी. जेणे करून प्रशासनास अपात्कालीन कक्षात प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण करणे उचित होईल. तसेच जिल्हयामध्ये पेट्रोल/डिझेल व घरगुती गॅस सिलेंडरचा कोठेही तुटवडा भासणार नाही या दृष्टीने जनतेने अतिरीक्त साठवणूक न करता प्रशासनास सहकार्य करावे व कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केलेले आहे.

ग्रामीण भागामध्ये गॅस वितरणाबाबत तक्रार असलेस खालील क्रमांकावर संपर्क साधणेत यावा. जिल्हा सोलापूर तालुकानिहाय पुरवठा अधिकारी / कर्मचारी यांची माहिती. तालुका **मोहोळ** - पुरवठा निरीक्षण अधिकारी, श्रीमती सोनाली निटुरे मोबाईल क्रमांक ९०२२००८६८१, पुरवठा निरीक्षक, महेश घोडके मोबाईल क्रमांक ९४२००८९६४६

**माढा** - पुरवठा निरीक्षण अधिकारी प्रितम पवार मोबाईल क्रमांक ९९७०८२७५७४, पुरवठा निरीक्षक,जी.जी.कुंथलवाड मोबाईल क्रम ांक ९०२८०६५४१२ **करमाळा** - पुरवठा निरीक्षण अधिकारी शत्रुघ्न चव्हाण, मोबाईल क्रमांक ८८०५९०७६८६ , पुरवठा निरीक्षक, श्रीम ती दिव्याश्री वामनराव ढोबळे, मोबाईल क्रमांक ८२७५७५३३६१ **पंढरपूर** - पुरवठा निरीक्षक, विजय बादल मोबाईल क्रमांक ९८८१२३५५७४ **सांगोला** - पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती प्रांजली गावंडे, मोबाईल क्रमांक ७२१९६१६६६३ पुरवठा निरीक्षक श्रीमती प्रियांका राजेश जाधव मोबाईल क्रमांक ७७४३८५७८३८ **मंगळवेढा** - पुरवठा निरीक्षक श्रीमती शितल कन्हेरे मोबाईल क्रमांक ८३९०५७२२५७ पुरवठा निरीक्षक जयंत कुलकर्णी मोबाईल क्रमांक ९१७५६२६७४९ **माळशिरस** - पुरवठा निरीक्षण अधिकारी रविकिरण शेटे मोबाईल क्रमांक ८२७५९२६९५५ पुरवठा निरीक्षक एस.डी. केमकर मोबाईल क्रमांक ७०२८१२२२९४ तालुका **बार्शी** - पुरवठा निरीक्षक निलेश आठवले मोबाईल क्रमांक ७२१८९८१३४४ पुरवठा निरीक्षक संतोष शिंदे मोबाईल ९५१८५६२५३२ **उत्तर सोलापूर** - पुरवठा निरीक्षक निखिल महानूर मोबाईल क्रमांक ९८६०५०८१६१ पुरवठा निरीक्षक किरण सुरुशे मोबाईल क्रमांक ७४४८१४५७२९ **दक्षिण सोलापूर** - पुरवठा निरीक्षक नासिरखान पठाण मोबाईल क्रमांक ९८८१५६३६९३ पुरवठा निरीक्षक श्रीमती रमा अमोल शिखरे मोबाईल क्रमांक ८४३३३६२८६९७ **अक्कलकोट** - पुरवठा अधिकारी विराज वासेकर मोबाईल क्रमांक ८०५५९०४९१७ पुरवठा निरीक्षक श्रीमती पल्लवी शेंडगे मोबाईल क्रमांक ९७६६१४५९८६

#### शहरी भागामध्ये गॅस वितरण तक्रार अधिकारी संपर्क क्रमांक

**परिमंडळ अधिकारी ड व क अन्नधान्य वितरण अधिकारी,**
* प्रफुल्ल जयश्री संदीप नाईक (मो. ८८८८९६९३१७)
* नंदकिशोर मालू महादेव ढोके (मो. ९६६५३९४५९४)
* राजेश रुक्मिणबाई सुभाष यमपुरे (मो. ९६६००१००६०)
* सज्जन सिंधु रघुनाथ भोसले (मो. ८३२९३६००५१)
* ज्ञानेश्वर दुष्यांत तानाजी काशिद (मो. ७७१९८३९०१३)
* श्रीमती डंके गिता गणेश (मो. ८३०००९८५५)

# हनुमान जयंतीनिमित्त शहरात ५५ पेक्षा अधिक ठिकाणी सामुहिक गदापूजन



### शौर्य, धैर्य आणि एकजूट संदर्भात करण्यात आला संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ एप्रिल-**
हनुमान जयंतीनिमित्त हिंदू जनजागृती समितीच्या वतीने सोलापूर शहरातील ५५ पेक्षा अधिक ठिकाणी सामुहिक गदापूजन करण्यात आले. दरम्यान, जागतिक युध्दजन्य पार्श्वभूमीवर हिंदू समाजाम ध्ये शौर्य, धैर्य आणि एकजूट संदर्भात संकल्प करण्यात आला.

प्रभू राम यांच्या सैन्यात राहून रावणाचा पराभव करणारे, महाभारतात अर्जुनाच्या रथावर ध्वजावर विराजमान राहून पांडवांना बळ देणारे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्यासाठी समर्थ रामदास स्वामी यांनी प्रेरित केलेली बलोपासना अशाठिकाणी हनुमानाचे सामर्थ्य निर्णायक ठरले आहे.

या प्रेरणेतून हिंदू जनजागृती समितीच्या वतीने हनुमान जयंतीचे औचित्य साधून सदर उपक्रम राबविण्यात आला. यात १ हजार २०० हून अधिक भाविकांनी सहभाग नोंदविला होता. यात युवक, महिला आणि लहान मुलांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता.

गदापूजन विधीसह हनुमान आरती, मारुती स्तोत्रपठण, शंखनाद आणि सामूहिक 'श्री हनुमते नमः' नामजप करण्यात आला. रामराज्य स्थापनेसाठी मारुतीरायांचे गुण आत्मसात करण्याची प्रेरणादायी मार्गदर्शन सत्रही घेण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी एकमुखाने रामराज्य स्थापनेसाठी आणि धर्मरक्षणासाठी कार्य करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. उपस्थित युवकांनी वानरसेना बनून धर्माधिष्ठित राष्ट्र स्थापनेच्या दिशेने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.



**काळजापूर मारुतीरायाच्या दर्शनासाठी रांगा...**
हनुमान जयंतीनिमित्त डफरीन चौकातील काळजापूर मारुती मंदिरात 'श्रीं'च्या दर्शनासाठी भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

# श्री पंचमुखी हनुमान देवस्थानम्च्या वतीने रथोत्सव मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल -**
भावनाऋषी पेठ, जुन्या वालचंद कॉलेजसमोरील श्री पंचमुखी हनुमान देवस्थानम् येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त दाक्षिणात्य मंदिर परंपरेचा तेजोमय, दिव्य आणि चैतन्यमय सोहळा अपार भक्तिभावात व अद्भुत उत्साहात संपन्न झाला. रंगीबेरंगी फुलांनी सजवलेल्या तोरणांच्या, केळीच्या झाडांचे तोरणांनी पहाटेच्या पवित्र ब्रह्ममुहूर्तावर मंगल वाद्यांच्या निनादात गुंजलेल्या सुप्रभातम् आणि वैदिक ऋचांच्या मंगल घोषात पार पडलेले षोडश रूद्राभिषेकम् हे जणू भक्तांच्या अंतःकरणातील श्रद्धेला जागृत करणारे ठरले.

सुगंधित पुष्पमालांनी, रत्नखचित अलंकारांनी सजवलेल्या पाळण्यात बाल हनुमंताचा जन्मोत्सव अत्यंत भावमधुर वातावरणात साजरा करण्यात आला. महिला भगिनींनी सादर केलेल्या



कोमल अंगाई गीतांनी मंदिर परिसर भक्तिरसात पूर्णतः ओथंबून गेला. अलंकार सेवेत पंचमुखी हनुमानाचे तेजस्वी, दिव्य व अलौकिक स्वरूप पाहून भाविक मंत्रमुग्ध झाले, तर दिव्य दर्शनम् साठी भाविकांची अखंड रांग लागली होती.

यानंतर झालेल्या १०८ संगीतमय सामूहिक हनुमान चालीसा पठणाने संपूर्ण परिसर जय श्रीराम आणि हनुमान नामघोषाने अक्षरशः दुमदुमून गेला. गदा पूजनम् विधीने हनुमंताच्या अद्वितीय पराक्रम, भक्ती आणि रक्षणशक्तीची जाणीव प्रत्येक भक्ताच्या मनात दृढ झाली. समाजसेवेचा दैवी संदेश देत आयोजित रक्तदान शिबिरात युवकांसह युवतींचाही उत्स्फूर्त सहभाग लाभला. विशेष म्हणजे, आमदार देवेंद्रदादा कोठे यांच्या सुविद्य पत्नी मोनिकाताई कोठे यांनीही रक्तदान करून समाजाप्रती असलेली निष्ठा आणि बांधिलकी अधोरेखित केली.

भव्य रथयात्रा हे सोहळ्याचे शिखर आकर्षण ठरले. दाक्षिणात्य मंगल वाद्यांच्या गजरात आणि जय श्रीरामच्या अखंड घोषात वातावरण भक्तिमय झाले. सुबक नक्षीकाम केलेल्या भव्य लाकडी रथात विराजमान पंचमुखी हनुमानाची दिव्य मूर्ती तसेच पंचमुखी पाच अवतारांचे तेजस्वी स्वरूप मंदिर परिसरातील प्रमुख मार्गांवरून मिरवण्यात आले.

या शोभायात्रेत बाल वानरांनी रथ ओढत साक्षात भक्तीचे रूप साकारले, तर वनवासी रूपातील व राज्याभिषेकातील राम-लक्ष्मण-सीता-हनुमान वेषातील बालकांनी उपस्थितांची मने जिंकली. उंट-घोड्यांची शान, पारंपरिक वेशातील स्वयंसेवक, भगवे फेटेधारी भक्त व पताकाधारींची उपस्थिती यामुळे रथयात्रेला अद्वितीय भव्यता प्राप्त झाली. ढोल-ताशे, बॅन्ड व दाक्षिणात्य वाद्यांच्या गजरात संपूर्ण परिसर दणाणून गेला. प्रत्येक क्षणी भक्तिभाव, उत्साह आणि संस्कृतीचा मिलाफ अनुभवायला मिळत होता. हनुमान भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे या सोहळ्याला केवळ धार्मिकच नव्हे, तर सांस्कृतिक वैभवाचीही दिव्य झळाळी प्राप्त झाली.

# प्रसाद नगर येथे श्रीगणेश, वीर हनुमान मुर्ती प्राणप्रतिष्ठापना

**सोलापूर दि. २ एप्रिल-**
जुळे सोलापुरातील प्रसाद नगर येथे श्रीगणेश, वीर हनुमान मुर्ती प्राणप्रतिष्ठापना पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी, राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आली. करबसय्या स्वामी धार्मिक विधींचे पौरोहित्य केले. वैभव लक्ष्मी मंदिरापासून जलकुंभासह श्रीगणेश, वीर हनुमान, नंदी, शिवलिंग, कासव मुर्तींची मिरवणूक काढण्यात आली.



यावेळी विक्रांत जाधव, कनकी आप्पा, विजयकुमार जवळे, वालजीभाई गामी, अनिल गड्डम, मनोज जैस्वाल यांच्यासह शंकर कांबळे, यशवंत पाथरुट, बाजीराव वाघमारे, ईरय्या मठपत्ती, राजशेखर स्वामी, मल्लप्पा कोरे, नीलप्पा स्वामी, अप्पू स्वामी, शिवा कोकरे, अविनाश सुणगार, अभिषेक बिराजदार, सागर मठपती, आकाश हिरेमठ, चेतन निंबर्गी, शशिकांत स्वामी, कुमार मठपती, श्रील्लभ वाघमारे, श्रीरुद्र वाघमारे, वीरेश कोळी, सचिन कोळी, अमोल राऊत, अभिषेक गामी, राजशेखर पाटील, लक्ष्मी कांबळे, छाया हिरेमठ, जगदेवी स्वामी, प्रा.स्वामीनाथ कलशेट्टी यांच्यासह जय हनुमान तरुण मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४०१

**बोलावें तें धर्मा मिळे। बरे डोळे उघडूनी।।**
**काशासाठीं खावे शेण।जेणें जन थुंके तें।।**

शेण ही कांही खाण्याची वस्तू किंवा पदार्थ नाही तरी पण बऱ्याच वेळा आपण एखाद्याला चिडून म्हणतो की, कशाला शेण खायला गेला होतास तिथे, किंवा कशाला शेण खाल्लास किंवा अगोदर शेण खाल्ला आहेस आता भर वगैरे. असे म्हणण्यामागे हेतू स्पष्ट असतो की समोरच्याने नको ती चूक केली आहे. चुकीचे करणे किंवा नीती-नियमाच्या विरुध्द वागणे म्हणजे मानवाला अशोभनिय असे करणे होय. अशी अशोभनियता माणूस मोठेपणासाठी, खोटारड्या मी ला टिकवण्यासाठी, स्वार्थासाठी करत असतो. नीती-नियमांची



गोळा बेरीज असणाऱ्या धर्माचे पालन न करणे, धर्मशास्त्राच्या विरुध्द बोलणे किंवा वागणे म्हणजे एक प्रकारे शेण खाण्यासारखा मूर्ख प्रकार होय. अशा मूर्ख माणसाच्या वागण्या बोलण्यावर समाज थुंकणार नाही तर काय? असे प्रश्नात्मक स्पष्टीकरण करतांना तुकाराम महाराज म्हणतात, बोलावें तें **धर्मा मिळे। बरे डोळे उघडूनी।।**
**काशासाठी खावें शेण। जेणें जन थुंके तें ।।**

बुध्दी असणारा हा माणूस कधी कधी इतक्या खालच्या स्तरावर जातो की, सामान्याच्या तोंडून सुध्दा अशांची छी-थू होते. केवळ स्वार्थ, विषयाधिनता, खोटारडे मोठेपण माणसाला अशा स्तराला नेऊन पोहचवते. कांही लोकांचे वर्तन तर इतक्या खालच्या स्तराला जाते की ते समाजाच्या तर सोडाच पण स्वत:च्याही नजरेतून उतरतात. स्वत:च्या नजरेतून उतरण्याइतके जगाच्या पाठीवर इतर कांही लाजीरवाणे नसते. स्वत:च्या नजरेतून उतरणारा माणूस सुधारु लागतो, असे म्हणतात. पण स्वत:च्या नजरेतून उतरण्यासाठी मनाची सकारात्मकता लागते. मन असा सकारात्मक विचार करीतच नसेल तर हे लोक स्वत:च्या नजरेतून उतरतीलच कसे? मी म्हणजे काही तरी आहे, ही वृत्तीच माणसासाठी घातक आहे. मूळात मी म्हणजे नेमके काय? याचा शोध लागणेच कठीण आहे. ज्याला मी चा खरा शोध लागला त्याच्या हातून लज्जास्पद वर्तन होतच नाही. अर्थात जन थुंकेल अशी कृती मी परिचित व्यक्तीकडून घडत नाही. प्रत्यक्षात कोणी शेण खात नाही. पण व्यक्तीची कृतीच अशी असते की ती शेणाच्या घाणीलाही लाजवून जाते. त्यामुळे अशा वृत्तीबद्दल हे शब्द वापरले जातात. आपल्या वृत्तीबद्दल कोणीही असे शब्द वापरू नये असे आपणाला वाटत असेल तर आपण चुकीच्या मार्गावर पाऊलच टाकायला नको. अनावधानाने किंवा प्रसंगानुरूप आपण नको त्या मार्गावर गेलो तरी या क्षणापासून पुढचे पाऊल न पडू देता त्याला थांबायला हवे. आपल्या कृतीमुळे आपणाला समाजाने डोक्यावर किंवा हृदयात घ्यावे असे जरी आपल्याने शक्य नसेल तरी समाज आपल्याकडे वाईट नजरेने पाहिल किंवा जन थुंकेल असे तरी आपल्याकडून घडू नये. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. ३ एप्रिल २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - फाल्गुन कृ प्रतिपदा**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- चित्रा (१९.२४)**
**योग - व्याघ्यात (१४.०७)**
**करण - तौतिल (२१.२२)**
**राहू काल : शुक्रवार**
**स. १०.३० ते १२.००**

**दिनविशेष : १६८०: छत्रपती शिवाजी महाराज भोसले यांचे निधन.**
**१७८१: भारतीय धार्मिक नेते स्वामीनारायण यांचा जन्म.**
**१८८२: सामाजिक ऐतिहासिक कादंबरीकार नाथमाधव यांचा जन्म.**
**१९५५: सुप्रसिद्ध गायक हरिहरन यांचा जन्म.**
**२०१७: भारतीय शास्त्रीय गायक किशोरी आमोणकर यांचे निधन.**

# आरोग्यसमृद्ध महाराष्ट्रासाठी व्यापक लोकचळवळ व्हावी

## सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १ एप्रिल-**

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे केवळ शासकीय अभियान नसून ती व्यापक लोकचळवळ व्हावी. लोकसहभागातून गावोगावी आरोग्याचा जागर निर्माण झाला, तरच आरोग्यसमृद्ध महाराष्ट्र घडू शकतो, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर यांनी केले.




येथील श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय व सामान्य रुग्णालय येथे आयोजित 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' विभागीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, उपाध्यक्ष मधुकर पाटील, डॉ. निपुण विनायक, ई. रविंद्रन, डॉ. सुनील भोकरे, गजानन पाटील, डॉ. नितीन अंबाडेकर, डॉ. विजय कंदेवाड, डॉ. मारुती नवले आदी मान्यवर उपस्थित होते.

मंत्री आबीटकर म्हणाले, या अभियानात उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपायांवर अधिक भर देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सवयींमध्ये सकारात्मक बदल घडवून आरोग्यदायी जीवनशैली रुजविणे, हा या उपक्रमाचा गाभा आहे. ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य यंत्रणा तसेच आशा सेविका व ग्रामस्थ यांच्या सक्रिय सहभागातूनच हे उद्दिष्ट साध्य होणार आहे.


कार्यशाळेत 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाच्या माहिती पुस्तिकेचे आणि गीताचे अनावरण तसेच जनजागृतीसाठी चित्ररथाचे उद्घाटन करण्यात आले. विविध जिल्ह्यांतील प्रतिनिधींनी अभियानाच्या पूर्वतयारीची माहिती सादर केली. या कार्यशाळेला पुणे विभागासह मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा आणि सांगली जिल्ह्यांतील आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### उत्कृष्ट ग्रामपंचायतींना मानांकन

या अभियानांतर्गत एकात्मिक कार्यपद्धती आणि पारदर्शक मूल्यांकन प्रणालीद्वारे उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना 'आरोग्य संपन्न ग्राम' म्हणून मानांकन देण्यात येणार असून त्यांना प्रोत्साहनपर पुरस्कारही दिले जाणार आहेत. राज्य मंत्रिमंडळाने १० फेब्रुवारी २०२६ रोजी या अभियानास मंजुरी दिली असून आवश्यक निधीची तरतूदही करण्यात आली आहे. याशिवाय, १४ वर्षे वयोगटातील सुमारे ९.८४ लाख मुलींसाठी कर्करोग प्रतिबंधक लसीकरण मोहिम सुरू असून त्याबाबत व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन मंत्री आबिटकर यांनी केले.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### मुक्तीचा मार्ग म्हणजे 'रत्नत्रय' साधना



सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक् चारित्र्य या तीन रत्नांचा एकत्रित स्वीकार म्हणजेच 'रत्नत्रय' होय. हाच मुक्तीचा खरा मार्ग असून आत्म्याला परम शांती मिळवून देण्याचे ते श्रेष्ठ साधन आहे, असे प्रतिपादन जैन मुनी वीरसागर महाराज यांनी केले.

माणिक चौक येथील महावीर सांस्कृतिक भवनमध्ये गुरुवारी झालेल्या मंगल प्रवचनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी व्यवहार आणि निश्चय या दोन अंगांनी आध्यात्मिक मार्गाचे सखोल विश्लेषण केले.

महाराज म्हणाले की, ज्या आत्म्यामध्ये मुक्ती मिळवण्याची क्षमता आहे, असा 'भव्य' आत्मा जेव्हा 'जिन' भगवानांकडून सात तत्वे किंवा नऊ पदार्थांचे स्वरूप ऐकतो, तेव्हा त्याच्या आध्यात्मिक प्रवासाला सुरुवात होते. ही तत्वे केवळ ऐकून न थांबता ती अंतर्मनात रुजवून त्यावर श्रद्धा दृढ करणे आवश्यक आहे.

उपदेशाचा आश्रय घेऊन जेव्हा साधक आपल्या मनातील 'राग' (आसक्ती) आणि 'द्वेष' (विरोध) हे विकार नष्ट करण्यास सुरुवात करतो, तेव्हा त्याला 'व्यवहार रत्नत्रय' म्हटले जाते. हा टप्पा साधनेसाठी 'निमित्त कारण' म्हणून अत्यंत महत्त्वाचा आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

साधनेच्या पुढच्या टप्प्याबद्दल मार्गदर्शन करताना मुनीश्री म्हणाले की, सात तत्वे किंवा नऊ पदार्थ यांचे स्वरूप आपल्या शुद्ध आत्म तत्वापेक्षा भिन्न आहे, हे ओळखून बाह्य भेदांच्या पलीकडे जाणे गरजेचे आहे. केवळ स्वतःच्या 'शुद्धात्म्या'मध्ये रुची, श्रद्धा आणि पूर्ण तल्लीनता प्राप्त करणे म्हणजे 'निश्चय रत्नत्रय' होय. हेच साधकाचे 'परम साध्य' आहे.

## जैन मुनी आचार्य नयन पद्मसागर यांच्यावर गुन्हा दाखल करा

**सोलापूर दि. २ एप्रिल-**

छत्रपती संभाजी महाराज आणि ताराराणी यांच्या बाबत चुकीचे वक्तव्य करून खोटा इतिहास सांगणारे जैन मुनी आचार्य नयन यांचा शिव-शंभू भक्तांकडून जाहीर निषेध करत जैन मुनी आचार्य नयन यांच्या विरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महादेव राऊत यांच्याकडे निवेदनाद्वारे केले आहे. त्या घटनेचा व्हिडिओ पुरावा त्यांनी दाखविला. ताराराणी शिवरायांचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या धाकल्या सुनबाई म्हणजे छत्रपती राजाराम महाराजांच्या धर्मपत्नी होत्या. धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी बलीदान दिले. राजांची बदनामी करणाऱ्या व चुकीचे इतिहास सांगणाऱ्यांचा जाहीर निषेध केला. असे चुकीचे इतिहास सांगणाऱ्या या जैनमुनीवर तात्काळ गुन्हा दाखल करावा. तात्काळ गुन्हा दाखल झाला नाही तर मराठा समाज, शिवशंभू भक्त रस्त्यावर आंदोलन करेन, असा इशारा मराठा आंदोलक तथा मराठा क्रांती मोर्चा राज्यसमन्वयक राम जाधव यांनी दिला. यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हा संपर्क प्रमुख छत्रगुण माने, किरण शिरसागर, सागर गायकवाड, अक्षय माळोदकर, शुभम खटमोडे आदी जन शिवशंभो भक्त उपस्थित होते.

# बौध्दिक क्षमतेसाठी योग-साधना अत्यावश्यक : मुनीश्री वीरसागर महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १ एप्रिल-**

''विद्यार्थ्यांनी बौद्धिक क्षमता, स्मरणशक्ती आणि मनाची एकाग्रता वाढविण्यासाठी दररोज योगाभ्यास व ध्यानसाधना करणे अत्यावश्यक आहे,'' असे प्रतिपादन पूज्य १०८ निर्यापक श्रमण मुनीश्री वीरसागरजी महाराज यांनी केले. श्री ऐ. प. दि. जैन पाठशाळा संचालित श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित योग व ध्यान शिबिरात ते मार्गदर्शन करत होते. प्रातःकाळी ६.३० ते ७.४५ या वेळेत पार पडलेल्या या शिबिरात सुमारे १२५० विद्यार्थ्यांनी योग व ध्यानाचे प्रभावी प्रात्यक्षिक सादर केले.

### जैन गुरुकुलातील १२५० विद्यार्थ्यांचे योग-ध्यान प्रात्यक्षिक; जीवनमूल्यांचे संस्कार



मुनीश्रीनी विद्यार्थ्यांना 'अरिहंत मुद्रा', 'सिद्ध मुद्रा', 'आचार्य मुद्रा' यांसारख्या योगमुद्रांद्वारे शारीरिक सुदृढतेसोबतच मनाची स्थिरता आणि एकाग्रता कशी वाढवावी, याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. ओंकार जप, भ्रामरी, प्राणायाम, अनुलोम-विलोम आणि दीर्घ श्वसन यांसारख्या साधनांद्वारे मेंदू अधिक कार्यक्षम बनतो, असे त्यांनी स्पष्ट केले. ''श्वास हा मनाचा लगाम आहे; श्वास शांत झाला की मन आपोआप स्थिर होते,'' असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना नियमित साधनेचे महत्त्व पटवून दिले.

''भगवंताचे नामस्मरण हे केवळ ओठांनी नव्हे, तर हृदयातून झाले पाहिजे. मन स्थिर करण्यासाठी सातत्यपूर्ण साधना आवश्यक आहे,'' असे सांगत त्यांनी साधनेतील कष्टांचे महत्त्व अधोरेखित केले. व त्याचप्रमाणे अंतर्मनातच खरी शांती दडलेली आहे, असे सांगत त्यांनी आत्मिक प्रवासाची जाणीव करून दिली. कर्तव्य आणि भक्ती यांचा सुंदर समन्वय साधण्याचे आवाहन करत त्यांनी सांगितले, ''आपली कर्तव्ये पार पाडत असतानाच ईश्वराचे स्मरण ठेवणे हीच खरी साधना आहे.'' अहंकाराचा त्याग व समर्पणभाव यांवर भर देत त्यांनी, ''मीपणा सोडल्याशिवाय खरे ज्ञान प्राप्त होत नाही; ईश्वराच्या चरणी सर्वस्व अर्पण केल्यानेच निर्भयता प्राप्त होते,'' असे मार्गदर्शन केले

यावेळी संस्थेचे विश्वस्त पराग शहा, मुख्याध्यापक राजकुमार काळे, उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ यांच्या हस्ते मुनीश्रींचा श्रीफळ अर्पण करून सन्मान करण्यात आला. पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, प्राथमिक मुख्याध्यापिका पुष्पा झुंजुर्डे व बालकमंदिर विभागप्रमुख विभावरी रणदिवे उपस्थित होते.

## माजी महापौरांससह एकावर अनधिकृत बांधकामप्रश्नी गुन्हा

**सोलापूर दि. २ एप्रिल-**

माजी महापौर मनोहर गणपत सपाटे व ज्ञानेश्वर बबन सपाटे यांच्यावर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात प्राचीन स्मारक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भुईकोट किल्ला हा शासनाने संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेला असून त्याच्या संरक्षित भिंतीपासून ३०० मीटर परिसरात कोणतेही बांधकाम, दुरुस्ती किंवा खोदकाम करण्यास मनाई आहे. असे असताना संबंधित आरोपींनी पुरातत्व विभागाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी पुरातत्व विभागातील कर्मचारी ऋषिराज सिंह सोलंकी यांनी तक्रार दिली असून त्यानुसार आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. मनोहर व ज्ञानेश्वर सपाटे यांना यापूर्वी नोटीस देऊनही त्यांनी संबंधित परवानगी न घेता बांधकाम पूर्ण केले असल्याने त्यांच्या विरोधात प्राचीन स्मारके व पुरातत्व स्थळे व अवशेष अधिनियम, १९५८ चे कलम ३० अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रवीण पवार यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

# 'मोठे बजेट, मोठी जबाबदारी' विकासाची ठरणार खरी कसोटी


## १४४९ कोटींचं 'विकास स्वप्न', समान निधी-नवी दिशा !

सोलापूर महापालिकेच्या २०२६-२७ च्या अंदाजपत्रकाने आकड्यांच्या पलीकडे जाऊन एक मोठा संदेश दिला आहे. विकासाची महत्त्वाकांक्षा वाढली आहे, पण त्यासोबत जबाबदाऱ्यांचं ओझंही वाढलं आहे. महापालिका स्थायी समितीच्या सहाव्या महिला सभापती रंजीता चाकोते यांनी आशावादी आणि लोकाभिमुख अंदाजपत्रक सादर केले.

आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या प्रशासकीय अंदाजपत्रकात ६६.३३ कोटींची वाढ करत तब्बल १४४९ कोटींच्या अंदाजपत्रकाला एकमताने मंजुरी देण्यात आली, ही केवळ आर्थिक वाढ नाही तर राजकीय इच्छाशक्तीचीही चाचणी आहे. महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेत समान निधी, समान संधी हे धोरण केंद्रस्थानी राहिले. प्रत्येक नगरसेवकाला ६६ लाखांचा निधी देण्याचा निर्णय हा राजकीय समतोल साधण्याचा प्रयत्न मानला जातो. यातून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील भेद कमी करण्याचा प्रयत्न झाला असला, तरी यामुळे निधीचा परिणामकारक वापर होणार का, हा खरा प्रश्न आहे.

अंदाजपत्रकातील महसुली जमेतून ८२४ कोटींची अपेक्षा आणि भांडवली कामांसाठी १५२ कोटींची तरतूद ही शहराच्या पायाभूत विकासासाठी सकारात्मक बाब आहे. रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, आरोग्य सुविधा, महिला सुरक्षा, शिक्षण अशा विविध क्षेत्रांमध्ये निधीची विभागणी करण्यात आली आहे. मात्र, केवळ तरतूद पुरेशी नसते. त्या निधीचा वापर किती पारदर्शक आणि परिणामकारक होतो, यावरच नागरिकांचा विश्वास टिकणार आहे. या अंदाजपत्रकातील एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे महसुली तूट. दरवर्षीप्रमाणे यंदाही महसुली तुटीची समस्या कायम आहे. प्रशासनाने ती मान्य करत भविष्यात कमी करण्याचा प्रयत्न होईल, असे सांगितले आहे. पण हा प्रयत्न नेमका कसा होणार? उत्पन्न वाढीसाठी ठोस धोरण, कर वसुलीतील शिस्त, आणि नव्या उत्पन्न स्रोतांचा शोध या बाबींवर स्पष्ट रोडमॅप दिसणे आवश्यक आहे.

सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी मांडलेल्या सूचना या विकासाभिमुख असल्या, तरी त्या अंमलबजावणीत उतरवणे हेच खरे आव्हान आहे. सुपर टॅक्स रद्द करून उद्योगांना चालना देणे, एमआयडीसी भागाचा विकास, सौरऊर्जा सवलती, डिजिटल शिक्षण या सर्व संकल्पना योग्य आहेत. मात्र, यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय आवश्यक आहे. महिला स्वच्छतागृहांचा अभाव यासारखे मुद्दे या सभेत पुढे आले, हे लोकाभिमुखतेचे लक्षण आहे. बहुतांश सदस्यांनी अभ्यासपूर्ण भाष्य केले. यामुळे अंदाजपत्रक केवळ कागदावरचे न राहता नागरिकांच्या प्रश्नांना उत्तर देणारे ठरले आहे. या अंदाजपत्रकात 'म्युनिसिपल बॉण्ड'सारख्या नव्या आर्थिक साधनांचा वापर करण्याचा निर्णयही महत्त्वाचा आहे. मात्र, कर्ज आणि बॉण्ड यांचा योग्य वापर झाला नाही, तर भविष्यात आर्थिक ओझं वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्या १३ मिनिटाच्या भाषणाने नवी स्वप्ने पेरली. नवी आशा आणि नवी उमेद निर्माण केली.





सोलापूर महापालिकेचे हे अंदाजपत्रक महत्त्वाकांक्षी, समावेशक आणि लोकाभिमुख आहे. पण आकड्यांचा गाजावाजा आणि घोषणांची आतषबाजी यापेक्षा प्रत्यक्ष कामगिरी अधिक महत्त्वाची ठरणार आहे.

**हे बजेट शहर बदलणार की फक्त आकडेच वाढवणार?**

कारण, खरा विकास कागदावर नव्हे, तर रस्त्यावर दिसायला हवा. या अंदाजपत्रकाने सोलापूरकरांच्या मनात एक सकारात्मक अपेक्षा निर्माण केली आहे. सर्वसमावेशक विकासाची, समान संधीची आणि एकत्रित प्रयत्नांची. जर हीच एकजूट, पारदर्शकता आणि प्रामाणिक अंमलबजावणी कायम राहिली, तर सोलापूर केवळ वाढणार नाही, तर उज्ज्वल भविष्याकडे आत्मविश्वासाने वाटचाल करेल. असा विश्वास आहे.

# उज्ज्वल करिअरसाठी स्वावलंबी विद्यार्थी घडवणे ही काळाची गरज

**आजच्या वेगाने बदलणाऱ्या आणि अत्यंत स्पर्धात्मक युगात केवळ पदवी किंवा शैक्षणिक गुण मिळवणे पुरेसे राहिलेले नाही. उद्योग, व्यवसाय आणि तंत्रज्ञान क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच विविध कौशल्यांचा विकास करणे ही काळाची गरज बनली आहे. आजच्या कंपन्या केवळ गुणपत्रिका पाहत नाहीत, तर विद्यार्थ्यांमधील संवाद कौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता, टीमवर्क, नेतृत्वगुण आणि तांत्रिक कौशल्ये यांना तितकेच महत्त्व देतात.**



आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता हे तंत्रज्ञान रोजगाराच्या क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवून आणत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी, कौशल्ये आणि क्षमतांनुसार योग्य करिअर पर्याय सुचवले जाऊ शकतात. अनेक कंपन्या आणि भरती संस्था आज कृत्रिम बुद्धिमत्ते आधारित प्रणालींचा वापर करून उमेदवारांचे रिझ्युम, कौशल्ये आणि अनुभव यांचे विश्लेषण करतात आणि त्यानुसार योग्य उमेदवारांची निवड करतात.

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे प्लेसमेंट प्रक्रियेत पारदर्शकता आणि वेग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. विद्यार्थ्यांचे रिझ्युम स्कॅन करून त्यातील कौशल्ये ओळखणे, कंपन्यांच्या गरजेनुसार योग्य उमेदवारांची निवड करणे, तसेच विद्यार्थ्यांना कोणती कौशल्ये विकसित करण्याची आवश्यकता आहे याबाबत मार्गदर्शन करणे अशा अनेक गोष्टी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने शक्य झाल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वत:ची तयारी अधिक नियोजनबद्ध आणि प्रभावी पद्धतीने करता येऊ लागली आहे. परंतु दुसऱ्या बाजूला कंपन्यांनी भरती प्रक्रिया अधिक कठीण आणि स्पर्धात्मक केली आहे. अनेक टप्प्यांमधून उमेदवारांना जावे लागते-जसे की aptitude Test, Technical Test, Group Discussion, Case Study तसेच Multiple Interview Rounds. या सर्व टप्प्यांमध्ये उमेदवारांची विश्लेषण क्षमता, तांत्रिक ज्ञान, संवाद कौशल्ये आणि समस्या सोडवण्याची क्षमता यांची कसून परीक्षा घेतली जाते.

आजच्या काळात विद्यार्थ्यांनी खालील कौशल्ये विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित डिजिटल साधने, ऑनलाइन प्रशिक्षण, मॉक इंटरव्ह्यू आणि कौशल्य चाचण्या यांचा उपयोग करून विद्यार्थी स्वत:ची तयारी अधिक सक्षमपणे करू शकतात. स्वावलंबी विद्यार्थी भविष्यात केवळ नोकरी शोधणारे राहत नाहीत, तर नवीन संधी निर्माण करणारे उद्योजक देखील बनू शकतात. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी संयुक्त प्रयत्नांची गरज विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा केवळ महाविद्यालयाची जबाबदारी नसून विद्यार्थी, पालक आणि प्रशिक्षण व प्लेसमेंट विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नातूनच शक्य होतो.

आजच्या काळात शिक्षण, कौशल्य विकास, आधुनिक तंत्रज्ञान आणि स्वावलंबनाचा दृष्टिकोन यांचा समतोल साधणे अत्यंत आवश्यक झाले आहे. विद्यार्थी, पालक आणि महाविद्यालय यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या अनेक नव्या संधी निर्माण होऊ शकतात.

आजच्या स्पर्धात्मक युगात self-learning, online certifications, internships, projects Am{U practical exposure यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जे विद्यार्थी सतत शिकण्याची सवय जपतात, स्वतःला अपडेट ठेवतात आणि नवीन तंत्रज्ञान आत्मसात करतात, तेच भविष्यातील स्पर्धेत यशस्वी ठरतात. म्हणूनच विद्यार्थ्यांनी केवळ पदवीपुरते शिक्षण मर्यादित न ठेवता कौशल्यविकास, नव्या संधींचा शोध आणि स्वतःच्या क्षमतांचा विकास यावर भर देणे आवश्यक आहे.



अशा प्रकारे घडणारे विद्यार्थी भविष्यात आत्मविश्वासपूर्ण, स्वावलंबी आणि यशस्वी नागरिक म्हणून समाजाच्या प्रगतीत महत्वपूर्ण योगदान देऊ शकतील.

**-प्रा. डॉ. रविंद्र रघुनाथ पाटील**
अधिष्ठाता, नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर.

## जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ३७ कोतवालांची शिपाई पदावर पदोन्नती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

जिल्ह्यातील ११ तालुक्यातील ३७ कोतवालांना आता शासनाच्या सेवेत दाखल करण्यात आले असून, आज त्यांच्यातील गुणवत्ताधारकांच्या मुलाखती घेवून आजपासून त्यांना शिपाई या पदावर पदोन्नती देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यातील विविध गावात सुशिक्षित, पदवीधर असूनही अनेकांना तुटपुंज्या मानधनावर कोतवाल म्हणून काम करावे लागत होते. शासन निर्णया नुसार गेल्या वर्षी इच्छुकांच्या वतीने अर्ज प्रकिया घेण्यात आली होती. यामध्ये जिल्ह्यातून जवळपास ५०० हुन अधिक अर्ज प्राप्त झाले होते. यातून गुणवत्ताधारक व शासनाच्या नियमानुसार ३७ कोतवालांना शिपाई या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. यांना ज्या-त्या भागातील तहसीलदारांकडून नियुक्तीपत्रही दिले जाणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### मायबोली मंडळातर्फे हसवणूक कार्यक्रम

**बार्शी, दि. १ एप्रिल-**

येथील मायबोली सांस्कृतिक मंडळाच्यावतीने प्रा. अजितकुमार कोष्टी यांच्या हसवणूक या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन मोरया फंक्शन हॉल इथे नुकताच करण्यात आले होते. सुरवातीस मायबोलीच्या संस्थापक सदस्या स्व. उषा दशरथ यांच्या निधनाने मायबोलीतर्फे शोकसंदेशपर हळूवार फुंकर घातली गेली. डॉ. प्रशांत मोहिरे यांनी हा शोकसंदेश वाचून दाखवला. त्यानंतर जितेंद्र माढेकर यांनी स्व. उषा दशरथ यांच्या शोकसभेतील वृत्तांत व त्यांच्या आठवणी नमूद केल्या. मोरया फंक्शन हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला मायबोलीच्या रसिक सभासदांची उस्फूर्त दाद मिळाली. आपल्या ओघवत्या विनोदी शैलीत प्रा. अजितकुमार कोष्टी यांनी बार्शीकर रसिकांना खळखळून हसवले. कार्यक्रमाची सुरुवात मायबोलीचे संस्थापक अध्यक्ष स्व. विजयकुमार माढेकर आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या प्रतिम ांचे पूजन करुन आणि दीपप्रज्वलन करुन झाली. सचिव डॉ. प्रशांत मोहिरे यांनी प्रास्ताविक केले. खजिनदार व्यंकटेश कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. याप्रसंगी उपाध्यक्ष जवाहर माढेकर यांनी पाहुण्यांना सन्मानित केले. तसेच अनिल बंडेवार यांनी म ायबोलीला अंशत: प्रायोजित केल्याबद्दल त्यांचाही सत्कार सुनिल पाटील यांच्या हंस्ते करण्यात आला. आभार राजेंद्र श्रीश्रीमाळ यांनी केले. सूत्रसंचालन पल्लवी माढेकर यांनी केले. यावेळी व्यासपीठावर मायबोलीचे संचालक अरुण शहा, जितेंद्र माढेकर, सुनील पाटील उपस्थित होते.



### कोर्टीत जुगार अड्ड्यावर कारवाई, ४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पंढरपूर, दि.२ एप्रिल -**

येथील सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे (भा.पो.से.) यांनी तालुक्यातील कोर्टी येथे जुगार अड्ड्यावर कारवाई करीत ४ लाख ६ हजार ६४० रूपयेचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाई मध्ये नऊ जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यांनी ३१ मार्च रोजी मौजे कोर्टी गावातून माळेवस्तीकडे जाणारे उजनी कॅनॉलच्या बाजुस दिनेश दिगंबर चव्हाण याचे शेतातील पत्राशेड समोर काही इसम जुगार खेळत असल्याचे बातमी मिळाल्याने बातमीप्रमाणे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, पंढरपूर यांचेकडील पोलीस पथकाने बातमीची खात्री करून त्या ठिकाणी छापा मारला. या छापा कारवाईत इसमनामे दिनेश दिगंबर चव्हाण (वय ३१ वर्षे), रियाज जावेद सय्यद (वय ३५ वर्षे), लतिफ दिलावर शेख ( वय ४९ वर्षे), तायाप्पा कृष्णा काळे ( वय ४५ वर्षे), उमेश मच्छींद्र काळे (वय ४५ वर्षे), नवनाथ अंकुश गडदे (वय ३५ वर्षे), गोविंद विठ्ठल कोळेकर (वय ५५ वर्षे), बिरा पांडुरंग अनुसे (वय ४० वर्षे) आणि हाजु यासिन शेख (वय ६० वर्षे सर्व रा. कोर्टी, ता. पंढरपूर) असे मिळून आले. या छापा कारवाई मध्ये त्यांचे कब्जात रुपये ४ हजार ६४० रोख, ८ मोबाईल, ७ मोटार सायकल व जुगाराचे साहित्य असा एकुण ४ लाख ६ हजार ६४० रुपये किंमतीचा मुददेमाल मिळून आला. पोना विनोद सुग्रीव शिंदे यांनी ९ जणांविरुद्ध फिर्याद दिली ही कारवाई पोहेकॉ कामतकर, पोना शिंदे, पोकॉ हुलजंती, पोकॉ लोंढे यांनी पार पाडलेली आहे.



### बार्शीत काव्याचा जल्लोष : नक्षत्रांची फुलेने उजळला साहित्यसोहळा

**बार्शी, दि. २ एप्रिल-**

शब्द, संवेदना आणि सर्जनशीलतेचा अद्वितीय मिलाफ अनुभवायला मिळालेल्या साहित्यिक वातावरणात *अर्लिअन के. ए. ग्रूप ऑफ सोलापूर साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने मातृमंदिर, ढगे मळा येथे पाचवे कविसंमेलन व नक्षत्रांची फुले या प्रातिनिधिक काव्यसंग्रहासह अस्मिता गुंड यांच्या कविता अस्मितेच्या या दोन काव्यसंग्रहाचे प्रकाशन उत्साहात पार पडले. या भव्य साहित्य सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रकाश गव्हाणे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाश जडे उपस्थित होते.

उद्घाटक म्हणून अर्लिअनचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. सागर गुडमेवार उपस्थित होते. या तिघांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत साहित्यसेवेची प्रेरणा दिली. नक्षत्रांची फुले या काव्यसंग्रहात ४१ साहित्यिकांचा सहभाग असून ८२ कवितांचा समृद्ध असा काव्य पुष्पगुच्छ साकारला आहे. विविध भावविश्व, जीवनदृष्टी आणि सामाजिक जाण यांचा संगम असलेल्या या काव्यसंग्रहाने रसिकांची मने जिंकली. अर्लिअन के.ए.च्या माध्यमातून प्रकाशित झालेला हा संग्रह साहित्यविश्वातील एक उल्लेखनीय पाऊल ठरत आहे.या काव्यसंग्रहाला श्री प्रकाश महामुनी सर यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली असून डॉ. सागर गुडमेवार यांचे मनोगत आणि मलपृष्ठावर छाया उंब्रजकर यांचे लेखन संग्रहाला अधिक परिपूर्णतेकडे नेणारे ठरले आहे. कविसंमेलनात सुमारे ३० साहित्यिकांनी आपल्या ओजस्वी व हृदयस्पर्शी काव्यरचनांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. सुमारे ५० रसिकांच्या उपस्थितीने कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सूत्रसंचालन नीता देव यांनी केले.संतोष जाधव यांनी आभार मानले.

# अंजनगाव (खे) येथे शिवरायांचा पुतळा बसवल्याने दोन गटात तणाव

## गावात छावणीचे स्वरुप, परिसरात तणावपूर्ण शांतता

**तभा वृतसेवा,**
**माढा, दि २ एप्रिल-**

माढा तालुक्यातील अंजनगाव (खे) येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा रातोरात बसवण्यात आला असल्याने गावातील दोन गटांमध्ये तणाव निर्माण होऊन या घटनेने प्रशासकीय आणि सामाजिक पेच निर्माण झाला आहे. गावात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा विनापरवाना आणि रातोरात बसवल्याने दोन समाजात वादाची ठिणगी पडली. तणावाची परिस्थिती लक्षात घेऊन दिवसभर पोलिस गावात ठाण मांडून होते. एकगट मंदिर परिसरात रातोरात बसवलेला पुतळा हटवण्यासाठी तर दुसरा गट पुतळा तेथेच ठेवण्याची भूमिकेवर ठाम आहेत.

बुधवारी पहाटेच्या सुमारास फटाक्यांची आतषबाजी झाल्यानंतर मंदिराचे मानकरी फरांडे महाराज, आप्पाराव वाघमोडे यांच्यासह ग्रामस्थांना पुतळा उभारल्याचे समजताच माढा पोलिस ठाण्यात धाव घेत मंदिर परिसरात उभारलेला पुतळा हटवण्याची मागणी केली. याची तात्काळ दखल घेत माढा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत प्रकरण हाताळण्याचा प्रयत्न केला. परंतु दुसरा गट पुतळा हलवण्यास तयार नसल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले.

बुधवारी रात्री प्रशासनाकडून पुतळा हटवण्याचा निर्णयाने आंदोलन हिंसक वळणावर गेल्याने या ठिकाणी दगडफेक झाली ही परिस्थिती पोलिसांच्या हाताबाहेर गेल्याने पोलिसांकडून लाठी चार्ज करण्यात आला होता. यात काही आंदोलक व १५ हून अधिक पोलीस जखमी झाले होते. यावेळी काही आंदोलन कर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन गुरुवारी पोलीस प्रशासनाने मोठा पोलीस बंदोबस्त येथे तैनात केला आहे. या ठिकाणी पोलीस व प्रशासनाच्या वतीने दोन्ही गटात समझोता करून हा वाद मिटवण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. दोन्ही गटांना प्रशासनाच्या वतीने शांतता राखण्याचे आवाहन करण्यात येत आहे.



### ग्रामपंचायतीकडे तीन आठवड्यापूर्वी केला होता अर्ज

तीन आठवड्यापूर्वी दत्तात्रय पाटेकर, ओंकार चव्हाण आणि गजानन कृपाळयांनी अंजनगाव खे ग्रामपंचायतीकडे पुतळा उभा करण्यासाठी अर्ज केला होता. ग्रामपंचायत प्रशासनाने रितसर परवानगी घेऊन पुतळा उभारण्याचे सांगत अर्ज स्वीकारण्यास नकार दिला.पोलिस प्रशासनास माहिती कळल्यानंतर पोलिसांनी तिघांना नोटिस बजावली होती,असे सहाय्यक पोलिस निरीक्षक रोहित शिंदे यांनी सांगितले.

### छत्रपती शिवरायांचा पुतळा मंदिर प्रवेशद्वारात

खेलोबा देवा प्रमाणेच आम्ही छत्रपती शिवाजी महाराज आमचे कुलदैवत मानतो. परंतु ज्या जागेवर शिवरायांचा पुतळा उभा केला आहे, ती जागा मंदिराच्या प्रवेशद्वारावर येत असल्याने धार्मिक विधी करण्यास अडथळा निर्माण होणार आहे. संबंधितांनी इतर ठिकाणी महाराजांचा पुतळा उभा करावा, आम्ही त्यास मदत करू.

**- राजाभाऊ वाघमोडे महाराज**, मुख्य मानकरी


# कलेमुळे जीवन समृध्द होते : गदगे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ एप्रिल-**

माणसाच्या दैनंदिन जगण्यात कलेला अत्यंत महत्त्वाचे स्थान असून, कलेमुळे जीवनातील ताणतणाव कमी होतात आणि जीवन अधिक सुंदर व समृद्ध होते, असे प्रतिपादन राज्य पुरस्कारप्राप्त कलाध्यापक भारत गदगे यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात आयोजित 'कला महोत्सव स्पर्धा २०२६' च्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव होते. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता डॉ. समाधान माने, डॉ.बाळासाहेब बळवंत, उपप्राचार्य डॉ.भगवान नाईकनवरे, डॉ.सुशील शिंदे तसेच स्वायत्त महाविद्यालयाचे समन्वयक प्रा.डॉ.आनंद शिंदे, युवा महोत्सव समिती प्रमुख प्रा. मारुती नायकू आदी मान्यवर उपस्थित होते.

भारत गदगे यांनी विद्यार्थ्यांना कला क्षेत्रातील प्रवास, त्यासाठी लागणारी मेहनत व साधना याबाबत मार्गदर्शन केले. कलेकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि कलाकाराची सातत्यपूर्ण साधना यावर त्यांनी विशेष भर दिला. यावेळी त्यांनी आकर्षक पेंटिंगचे प्रात्यक्षिक सादर केले, ज्याला विद्यार्थ्यांकडून



उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.बी.टी. जाधव यांनी कला, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात असलेले महत्त्व अधोरेखित केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी आत्मनिर्भर बनून जीवनात स्वतःच्या पायावर उभे राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात डॉ.समाधान माने यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.रमेश शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.सागर नाईकनवरे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कला महोत्सव समितीतील सदस्य, विविध विभागांचे प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# दक्षिण सोलापूर पंचायत समिती मासिक सभेत लोकोपयोगी निर्णय

### तालुक्यातील होतकरू विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर पंचायत समितीची पाहिली मासिक सभा नवख्या असणाऱ्या पंचायत समिती सदस्यांनी परिपक्वता दाखवत महत्वपूर्ण अभ्यासपूर्ण निर्णय घेत सर्व विभागाच्या अधिकारी वर्गाना विश्वासात घेत खेळीमेळीत सभा पार पाडली.

पाहिली मासिक सभा सभापती संदीप टेळे यांच्या अध्यक्षतेखाली व सचिव तथा गटविकास अधिकारी मनोज राऊत व उपसभापती वर्षा पटणे व सर्व पंचायत समिती सदस्य यांच्या उपस्थित पंचायत समिती सभागृहात पार पडली. सुरुवातीस सर्व अधिकाऱ्याने आपल्या विभागाचा सविस्तर आढावा सभागृहासमोर मांडला त्यात दुरुस्ती व सूचना सदस्यांनी दिल्या त्याप्रमाणे ठराव करण्यात आले. दक्षिण सोलापूर तालुक्यातील एमपीएससी, यूपीएससी पूर्व परीक्षा उत्तीर्ण ग्रामीण भागातील होतकरू विध्यार्थ्यांना पुस्तके /शिकवणी घेणेकामी अनुक्रमे दहा हजार व पाच हजार रुपये अर्थसहाय्य देण्याचा ठराव गट नेते बलवान गोतसुर्वे यांनी मांडला. टंचाई पूर्व दक्षता घेण्याच्या सूचना, त्याचप्रमाणे आरोग्यशी निगडित प्रश्न,प्राथमिक शाळा अंगणवाडी संबंधित प्रश्न व अडचणी जाणून घेण्यात आले. पशुसंवर्धन विभागातील रिक्त जागा याबाबत वरिष्ठाशी चर्चा करण्याचे ठरले. महिला बचत गट संबंधित प्रश्न, त्याचप्रमाणे ५%दिव्यांग, १५% टक्के ग्रामपंचायत सेस याबाबतीत प्रत्यक्षातील खर्च पडताळणी करणे याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

तसेच एनटीपीसी कडून ग्राम पंचायतीला मिळणाऱ्या टॅक्स च्या खर्चाचा आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आले. या मासिक सभेत गटनेते बलवान गोतसुर्वे,सदस्य मळसिद्ध मुगळे, अंबिका पाटील,पंचप्पा धनशेट्टी यांनी विभागवार अधिकाऱ्यांनी आढावा सादर करीत असताना अपेक्षित सुधारणा करण्याचे सूचना दिल्या. नावीन्यपूर्ण दीर्घकालीन टिकणाऱ्या लोकोपयोगी योजना राबवण्याचे सर्वानुमते ठरले. विभागाचा आढावा त्यावरील सदस्यांचे सूचना यावर सकारात्मकता गट विकास अधिकारी मनोज राऊत यांनी दाखवली. एम. एस, ई.बी, सार्वजनिक बांधकाम, उजनी कलवा, जीएसडीये, तालुका कृषी कार्यालय व महसूल विभागाशी संबंधित अधिकारी व प्रतिनिधी अनुपस्थित बद्दल सदस्यांनी नाराजी व्यक्त करीत पुढील बैठीकीस आवर्जून उपस्थित राहण्यासंबधी पत्रव्यवहार करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी विजय राठोड, सूरज पाटील, अंबिका दुपारगुडे, प्रियांका कुबसंगे, आसबे, बिराजदार आदी सदस्य व जलसंधारण अधिकारी मुजावर, पाणीपुरवठा उपअभियंता सोनवणे, जिप बांधकाम उपअभियंता उषा बिडला, रविकांत बोधले,गट शिक्षण अधिकारी जयश्री सुतार, जिप तालुका कृषी अधिकारी उमेश काटे, क्रीडा अधिकारी राहुल गायकवाड, बाल विकास अधिकारी विशाल भोसले, पशु संवर्धन अधिकारी डॉ. गिड्डे, उमेदचे शिवाजी वाघमारे, विस्तार अधिकारी एस बी कोळी व पठाण आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

# अभय योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद; दोन दिवसांत १.२५ कोटींची वसुली

## ३१ मार्च अखेर एकूण वसुली २३.७० कोटींवर; सुमारे ८७ टक्के वसुली पूर्ण

**तभा वृतसेवा**
**बार्शी, दि २ एप्रिल-**

राज्य शासनाने घरपट्टी व नळपट्टीवरील दंडव्याज शंभर टक्के माफ करण्याचा निर्णय घेतल्यानंतर बार्शी नगरपरिषदेच्या कर विभागात तसेच नागरी सुविधा केंद्रात कर भरण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी आहे. थकीत करदाते नागरिकांनी शेवटच्या दिवसांत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




अभय योजनेच्या अंतिम टप्प्यात ३० व ३१ मार्च या दोन दिवसांतच सुमारे १ कोटी २५ लाख रुपये नगरपरिषदेकडे जमा झाले. यामध्ये सोमवारी अंदाजे ७० लाख, तर मंगळवारी सुमारे ५५ लाख रुपये रोख स्वरुपात नागरिकांनी भरले. धनादेशाद्वारे प्राप्त झालेल्या रकमेचा यात समावेश नसून, त्या रकमेसह एकूण वसुलीचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

कर अधिकारी विठ्ठल पाटोळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अभययोजनेअंतर्गत आतापर्यंत सुमारे २३ कोटी ७० लाख रुपयांची वसुली झाली असून, ही वसुली सुमारे ८७ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. धनादेशाद्वारे भरलेली रक्कम जमा झाल्यानंतर हा आकडा २४ कोटी रुपयांच्या आसपास जाऊ शकतो, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

राज्य शासनाने १९ मे २०२५ पर्यंतच्या थकीत मालमत्तेवरील दंडव्याज पूर्णतः माफ केल्याने अनेक नागरिकांना आर्थिक दिलासा मिळाला. यामुळे दीर्घकाळ प्रलंबित राहिलेल्या घरपट्टी व नळपट्टीची थकबाकी भरण्यासाठी नागरिक पुढाकार घेत असल्याचे चित्र शहरात दिसून आले.

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी मुख्याधिकारी तैमूर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली कर अधिकारी विठ्ठल पाटोळे, उपमुख्याधिकारी राजाराम नरुटे, वाहन विभाग प्रमुख नागनाथ गायकवाड तसेच कर विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी सातत्याने प्रयत्न केले. शेवटच्या दिवसांत वाढलेल्या गर्दीचे नियोजन करुन नागरिकांना सुरळीत सेवा देण्यासाठी अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली होती. या योजनेला मिळालेल्या या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे नगरपरिषदेच्या महसुलात मोठी वाढ झाली असून, शहरातील प्रलंबित कर वसुलीचा प्रश्न मार्गी लागला आहे.

# पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीची येत्या बुधवारी मोटरसायकल रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ एप्रिल -**

पंढरीतील सरकारी मोकळ्या जागांच्या शोधासाठी पंढरपूर तिर्थक्षेत्र बचाव समितीकडून येत्या बुधवारी मोटरसायकल रँलीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती तिर्थक्षेत्र बचाव समितीचे प्रमुख अभयसिंह कुलकर्णी (इचगावकर ) यांनी दिली.

या आगळ्यावेगळ्या विषया संदर्भातील रँलीच्या आयोजनाबाबत माहिती देताना कुलकर्णी यांनी सांगितले की, पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे वतीने महिन्यापूर्वी कोरिडोर विरोधात भला मोठा मोर्चा निघून जनप्रक्षोभ दिसून आलेला होता. निश्चितपणे त्याचे अपेक्षित प्रतिसाद दिसून आले. त्या मोर्चात, घरेदारे पाडून विध्वंसक विकास करण्यापेक्षा वर्षानुवर्षे मोकळ्या पडलेल्या सरकारी जागांवर कोरिडोरसारखी विकास कामे कराव्याअशा प्रमुख मागण्या होत्या.

दरम्यान अनेक जागरूक नागरिक, पत्रकार, जिज्ञासू बाधित यांची त्यावेळेस मागणी होती की, या पडाक सरकारी जागा उजेडात आल्या पाहिजेत. आजवरच्या झालेल्या प्रचंड सरकारी खर्चाची उपयोगिता तपासली पाहिजे. यासाठी पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे वतीने., पंढरीच्या शाश्वत विकासासाठी सरकारी मोकळ्या जागांच्या शोधासाठी खास मोटरसायकल रँली काढण्यात येणार आहे.

ही रँली येत्या बुधवारी (ता.४ ) सकाळी ०९.३० वाजता येथील खादी ग्रामोद्योग, स्टेशन रोड येथून निघून, विविध बिगरउपयोगी शासकीय जागांचे अवलोकन करुन, येथील उपविभागीय अधिकारी (प्रांतसाहेब) यांना निवेदन देण्यात येणार आहे. तरी या बाईक रँली तथा मोटरसायकल फेरीस संभाव्य कोरिडोर बाधित व पंढरपूर पावित्र्य रक्षक नागरिक यांनी अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे वतीने करण्यात आल्याचे देखील कुलकर्णी यांनी सांगितले.

# प्रसारमाध्यमांना सभेची माहिती देण्याचे सभापतींचे तर न देण्याचे बीडीओंचे आदेश

## पाच दिवसानंतरही माहिती लपवण्याचे गौडबंगाल, महिला पं.स.सदस्यांच्या पतीराजांना सभेत नो एंट्री

**तभा वृतसेवा**
**कुर्डूवाडी, दि २ एप्रिल-**

माढा पंचायत समितीची सर्वसाधारण सभा ३० मार्च रोजी सभापती पंडीत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेच्या पाच दिवसानंतरही कामकाजाची माहीती अद्याप पत्रकारांना न देता अद्याप गुलदस्त्यातच ठेवण्यात आली.

याबाबत सभापतींनी सबंधीत अधिका-यांना सभेचा वृत्तांत पत्रकारांना देण्याच्या सुचना करण्यात आल्या. मात्र अधिका-यांनी माहीती देणार नसल्याचे स्पष्ट केले. पाच दिवसानंतरही प्रोसिडींग पुर्ण नाही. माहीती लपवण्यामागचे गौडबंगाल काय हे सर्वसामान्य नागरीकांना समजणे हा हक्क आहे. या सभेत महीला पं.स.सदस्यांच्या पतीराजांना मात्र नो ऐंट्री करण्यात आल्याने सर्वत्र चर्चा रंगल्या होत्या.

३० मार्च रोजी कुर्डूवाडी पंचायत समितीमध्ये पहीली सर्वसाधारण सभा झाली. या सभेमध्ये तालुक्यातील पेय जल योजनेतील विवीध अर्धवट कामे यावर बरीच चर्चा करण्यात आल्याची माहीती आहे. काही गावात तर पाण्याची टाकी पुर्ण आहे, पाईपलाईन पुर्ण आहे परंतु विहीरीचे कामच अद्याप नाही याबाबतच्या तक्रारीवर बराच गोंधळ झाल्याचे समजते. साडेचार




वर्षाच्या प्रशासकाच्या काळात अनेक कामे अर्धवट स्वरूपात आहेत ती कशी पुर्ण करूण घेता येतील यावरही चर्चा झाल्याचे समजते. सभेनंतर पत्रकारांनी सभापती पंडीत देशमुख यांना सभेत कोणत्या विषयावर चर्चा करण्यात आली. कोणते विषय मंजूर करण्यात आले याबाबत विचारले असता त्यांना ती सांगता आली नाही. त्यामुळे त्यांनी महेश शेंडे यांना सबंधीत कक्ष अधिकारी नागेश पाटील यांना प्रोसिडींगवरील माहीती देण्याच्या सुचना केल्या. प्रस्तुद प्रतिनीधीनी पाटील व शेंडे या दोघांनाही भेटून माहीती मागीतली व सभापतींनी आपणास माहीती देण्याच्या सुचना केल्या असताना आपण माहीती का देत नाही असे विचारले. यावर पाटील व शेंडे यांनी आम्हाला सभापतींनी जरी सुचना केली असली तरी गटविकास अधिकारी महेश सुळे यांनी सुचना केल्याशिवाय माहीती देता येत नसल्याचे स्पष्ट केले. त्यावेळी प्रस्तुद प्रतीनीधींनी सभापती पंडीत देशमुख यांना संपर्क साधला असता मी गुरूवारी कार्यालयात आल्यानंतर सबंधीतांना बोलावून घेतो असे सांगून वेळ मारून घेतली. त्यानंतर गुरूवारीही माहिती मिळाली नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे महेश शेंडे व नागेश पाटील या दोघांची कारकीर्द वादग्रस्त आहे. ते माहीती का लपवत आहेत. कोणाच्या सांगण्यावरून गटविकास अधिकारी महेश सुळे यांनी सभापती पंडीत देशमुख यांचे आदेश गांभिर्याने घेतले नाहीत .हे समजणे गरजेचे आहे.असे कोणते विषय सभेमध्दे चर्चेला आले कींवा पास झाले की ते पत्रकारांना माहीती देणे अडचणीचे होते ते बाहेर पडले पाहीजेत.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## बार्शीच्या चाटे गल्ली परिसरात ७७ हजारांचे कपडे चोरीला

**बार्शी, दि २ एप्रिल-**

बार्शी शहरातील नवी चाटे गल्ली परिसरातील एका कपड्यांच्या दुकानातून सुमारे ७७ हजार रुपयांचा लेडीज कपड्यांचा डाग अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना समोर आली असून याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सचिन नामदेव रंगदार (वय ४४), व्यवसाय- कपड्यांचा व्यापार, रा. नवी चाटे गल्ली, बार्शी यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे 'गीता लेडीज वेअर' नावाचे दुकान असून ते आई अरुणा व मोठा भाऊ सागर यांच्यासह व्यवसाय सांभाळतात. दि. २४ मार्च रोजी दुपारीच्या सुमारास मुंबईहून दुकानासाठी मागविलेला लेडीज कपड्यांचा माल दुकानासमोर आला. दुकानात ग्राहकांची वर्दळ असल्याने हा माल तात्पुरता दुकानाच्या दरवाज्याजवळ ठेवण्यात आला होता. दुपारी सचिन रंगदार जेवणासाठी घरी निघाले असता दरवाज्याजवळ ठेवलेला पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिक पॅकेजमधील कपड्यांचा डाग तेथे आढळून आला नाही.यानंतर त्यांनी कुटुंबीय व शेजारील दुकानदारांकडे चौकशी करुन परिसरात शोध घेतला.

मात्र संबंधित डाग कुठेही सापडला नाही. त्यानंतर कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तो डाग चोरी केल्याची खात्री झाल्याने त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.चोरीस गेलेल्या डागामध्ये 'कंफर्ट' कंपनीचे विविध रंगांचे एकूण १४३ लेडीज गाऊन असून त्याची एकूण किंमत ७७,२१५ रुपये इतकी असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास बार्शी शहर पोलीस करीत आहेत.




शेगाव : हनुमान जयंतीनिमित्त शेगाव (तालुका अक्कलकोट) येथील हनुमान मंदिरात ज्योती जगदेव पाटील या भक्ताने प्रभू श्रीराम आणि हनुमान यांच्या गळाभेटीचे सुंदर चित्र रांगोळीतून रेखाटले आहे.

## माळशिरसमध्ये हनुमान जयंती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**माळशिरस, दि २ एप्रिल-**





येथील हनुमान मंदिरात हनुमान जयंती उत्साहात व मोठ्या भक्तिभावात साजरी करण्यात आली. माळशिरस येथे जागृत हनुमान मंदीर आहे. या मंदिरातील हनुमानाची मूर्ती कललेली आहे त्यामुळे या हनुमानास झोपाळु हनुमान असेही म्हणतात. ही हनुमानाची मुर्ती जागृत असुन भाविकांची श्रद्धा आहे. हनुमान जयंती निमीत्त मंदीरात काल रात्री जागर करण्यात आला. त्यानंतर पहाटे पाच ते सुर्योदयापर्यंत ह भ प कैवल्य महाराज चातुर्मासे यांचे किर्तन झाले.

सूर्यादया बरोबर उपस्थित भक्तांनी गुलाल व फुले टाकून हनुमान जन्मोत्सव साजरा केला. यावेळी पहाटेपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती यात माहिलांची लक्षणीय उपस्थिती होती. हनुमानाची मुर्ती स्वयंभु असल्याने अनेक भाविक या हनुमानास नवस बोलतात व आज हनुमान जयंती दिवशी हे भक्त आपले बोललेले नवस फेडण्यासाठी येतात. तसेच नोकरी निमित्त बाहेरगावी असलेले नागरिकही या ग्रामदैवताच्या उत्सवासाठी येतात.हनुमान जयंती निमीत्त मंदीरात महाप्रसादाचे वाटप करण्यात आले तसेच दिवसभर परिसरातील नागरीकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

जयंती निमित्त मंदीरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. मंदीरात नारळ वाढविण्यासाठी आज पाटील कुटुबाचा मान असतो त्यामुळे माळशिरस चे पोलीस पाटील शितल पाटील, अमित पाटील, अभिजित पाटील व त्यांचे कुटबीय मंदीरात उपस्थित होते. हनुमान जयंतीनिमीत्त मंदीर परिसरात यात्रा भरली होती, या यात्रेत अनेक प्रकारची दुकाने थाटण्यात आली होती.

लहान मुले व माहिलांनी तेथे खरेदी साठी एकच गर्दी केली होती. सायंकाळी पालखीतून श्री च्या पादुकांची नगर प्रदक्षिणा काढण्यात येणार आली. तसेच मंदिरात महाआरती करण्यात आली.



## एकता महिला मंचच्यावतीने हनुमान जयंती उत्साहात

**तभा वृतसेवा**
**वैराग, दि २ एप्रिल-**

आंबेगाव (ता. बार्शी) येथे हनुमान जयंतीचा सण मोठ्या भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे, 'एकता महिला मंचा'च्या पुढाकाराने आंबेगावमध्ये पहिल्यांदाच अशा प्रकारे महिलांनी एकत्र येत हनुमान जयंतीचे भव्य आयोजन केले होते.

ग्रामदैवत हनुमान मंदिरात सकाळी मारुतीरायाची विधीवत पूजा आणि अभिषेक करण्यात आला. यावेळी महिलांनी सामूहिक हनुमान चालिसा पठण आणि आरत्या केल्या. मंदिराचा परिसर फुलांनी आणि विद्युत रोषणाईने सजवण्यात आला होता. बजरंग बली की जय च्या घोषणांनी संपूर्ण गाव दुमदुमून गेले होते.

एकता महिला मंचाच्या वर्षा साळुंखे, प्रेमाला सुरवसे, पूजा काळे, विद्या माळी, मथुराबाई माळी, मनुबाई माळी, राधा माळी, सुवर्णा साळुंखे, वंदना करंडे, गौरी देळवे, सुलोचना काळे, आशिता दळवी यांच्यासह गावातील अन्य महिला व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## महत्त्वाचे

### अकलूज परिसरात हनुमान जयंती साजरी

**अकलूज, दि २ एप्रिल-**

अकलूज परीसरात हनुमान जयंती धार्मिक कार्यक्रम व सामाजिक उपक्रम राबवुन भक्तिभावाने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. आज हनुमान जयंती निमित्त अकलुजच्या हनुमान मंदीरात पहाटे ५ वा.हनुमानाच्या मुर्तीस अभिषेक करुन महापूजा करण्यात आली. स्थानिक भजनी मंडळाने भजन करीत सकाळी ६:३० च्या सुमारास हनुमान भक्तांच्या जयजयकारात पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी माजी उपसरपंच पांडुरंगराव देशमुख यांच्यासह भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते. उपस्थित भक्तांना प्रसादाचा लाभ देण्यात आला. शंकरनगर येथील हनुमान मंदिरात अकलुज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील यांच्या हनुमान मुर्तीस अभिषेक व महापुजा करण्यात आली यावेळी कांचनमाला मोहिते पाटील यांच्यासह भाविक बहुसंख्येने उपस्थित होते.



उपस्थित भक्तांना प्रसादाचा लाभ देण्यात आला.धवल श्रीराम मंदिरात अभिषेक व महापुजा करण्यात येवून माऊली व श्रीराम भजनी मंडळाच्या सुश्राव्य भजनात पुष्पवृष्टी करण्यात आली यावेळी श्रीराम सार्वजनिक ट्रस्टचे उपाध्यक्ष आण्णासाहेब शिंदे, सचिव विलास लोंढे, वैभव पाटील, नितीन शिंदे, पिंटु वैद्य, ज्योती कुंभार व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थिताना प्रसाद देण्यात आला. हनुमान तालीम चौकातील हनुमान मंदिरात महापुजा आरती होऊन पुष्पवृष्टी करण्यात आली.तर जुना बाजार तळावरील कर्मवीर बाबासाहेब माने पाटील सांस्कृतिक भवनात महाराष्ट्र राज्य सकल वडार समाज शाखा अकलूज व एस बी ग्रुपच्यावतीने अध्यक्ष लक्ष्मण बंदपट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. या प्रसंगी आयोजित रक्तदान शिबीरात १९५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच नवनिर्वाचित नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील, नगरसेवक क्रांतीसिंह माने पाटील,सयाजीराजे मोहिते पाटील यांच्यासह सर्व नगरसेवकाच्रा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित भक्तगणांना महाप्रसाद लाभ देण्यात आला. सायंकाळी हनुमान जयंती निमित्ताने हनुमानाच्या प्रतिमेची सवाद्यात शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेचा शुभारंभ माजी सरपंच किशोरसिंह माने पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. शोभायात्रेत सकल वडार समाजाचे बांधव भगिनी सहभागी झाले होते. संपुर्ण अकलुज शहरातुन शोभायात्रा काढण्यात आली. याचबरोबर शंभू महादेवाच्या कवडींचा महाप्रसाद व सांगता समारंभ आज केला जातो

## खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांचा माढ्यातील पाणीटंचाईवर लोकसभेत प्रश्न

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२ एप्रिल -**





माढा लोकसभा मतदार संघातील वाढत्या पाणीटंचाईच्या प्रश्नावर खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी लोकसभेत आवाज उठवत केंद्र सरकारचे लक्ष वेधले. मतदार संघातील रखडलेले जलजीवन मिशनची कामे व दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून, तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली.

मतदारसंघात 'जल जीवन मिशन' अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा उल्लेख करत, ही कामे अद्याप अपूर्ण का आहेत, ते कधी पूर्ण होणार असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

लोकसभेतील चर्चेदरम्यान बोलताना खा.मोहिते-पाटील यांनी जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील पाणीटंचाईचे भीषण वास्तव मांडले. अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, भूजल पातळी मोठ्या प्रमाणात खालावल्यामुळे शेती आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. तात्पुरत्या उपायांऐवजी दीर्घ कालीन उपाययोजना आवश्यक असल्याचे सांगत, जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणासाठी माढा लोकसभा मतदारसंघाला विशेष आर्थिक पॅकेज देण्याची मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली. भविष्यातील दुष्काळ टाळण्यासाठी केंद्र सरकारकडे नेमका कोणता कृती आराखडा आहे, तसेच टंचाईग्रस्त भागांना प्राधान्य कधी दिले जाणार, याबाबतही त्यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केले.

माढा मतदारसंघातील नागरिकांना पाणीटंचाई पासून दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करून प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी खासदार मोहिते-पाटील यांनी यावेळी केली.

## अकलूजमध्ये 'विराट हिंदू संमेलन' उत्साहात

### पारंपरिक वैभव, भक्तीमय वातावरणात भव्य सोहळा

**तभा वृतसेवा**
**अकलूज, दि २ एप्रिल-**

अकलूज नगरीत पार पडलेले 'विराट हिंदू संमेलन' पारंपरिक वैभव, सांस्कृतिक दर्शन आणि भक्तीमय वातावरणामुळे विशेष ठरले. या कार्यक्रमात हिंदू संस्कृतीचे जिवंत चित्र उभे राहिले. आकर्षक सभामंडपसह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मावळ्यांचा देखावा साकारण्यात आला होता. तसेच शिवरायांची भव्य मूर्ती आणि प्रभू श्रीराम यांची मूर्ती आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

सभामंडप परिसरात मशाली, परमपवित्र भगवा ध्वज आणि पारंपरिक सजावटीमुळे वातावरण भारावून गेले होते. विजय चौकात आगमनानंतर अनिल महाराज देवळेकर व श्रीपादतीर्थ स्वामी महाराज यांचे महिलां भगिनींकडून पारंपरिक औक्षण करण्यात आले.

औक्षणानंतर गाईचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शंखनाद करण्यात आला व शिवगर्जना देत वातावरण दणाणून सोडण्यात आले. श्रीपादतीर्थ स्वामी महाराज यांनी आशीर्वचन देत उपस्थितांना धर्म, संस्कार आणि एकतेचा संदेश दिला. यानंतर मनीष बोत्रे यांनी 'पंच परिवर्तन' विषयी मार्गदर्शन केले. गौरवशाली शताब्दी वर्षांमध्ये पदार्पण यानिमित्त संघ शताब्दी विशेषांक या पुस्तकाचे प्रकाशन उपस्थित प्रमुख वक्त्यांच्या हस्ते करण्यात आले. व सर्व हिंदू बांधवांपर्यंत हा इतिहास पोहोचावा यासाठी पुस्तक विक्री स्टॉल सुद्धा उपलब्ध करण्यात आला होता. त्यानंतर ह.भ.प अनिल महाराज देवळेकर यांनी 'हिंदू समाज प्रबोधन' या विषयावर प्रभावी आणि ओजस्वी व्याख्यान देत एकता, संस्कार आणि राष्ट्रभक्तीचा संदेश दिला. या कार्यक्रमाला डॉ. धवलसिंह प्रतापसिंह मोहिते पाटील, माळशिरस तालुक्याचे माजी आमदार रामभाऊ सातपुते, अकलूज नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या धर्मपत्नी देवण्यादेवी मोहिते पाटील, व इतर सर्वच पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व मान्यवर,नगरसेवक तसेच सकल हिंदू समाज संयोजक संजय एकतपुरे, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान सोलापूर जिल्हा कार्यवाहक प्रताप साळुंखे तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पंढरपूर जिल्हा प्रचारक मनीष जी बोत्रे यांच्यासह सकल हिंदू समाजाचे पदाधिकारी, कार्यकारणी सदस्य व कार्यकर्ते, सर्व हिंदुत्ववादी संघटना गणेश उत्सव मंडळ, शिवजयंती मंडळ, नवरात्र उत्सव मंडळ, आधी संघटनेचे अध्यक्ष उपाध्यक्ष व कार्यकर्ते उपस्थित होते.




**गांधी चौकातून स्वागत मिरवणूक**

यावेळी गांधी चौकातून स्वागत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ह.भ.प अनिल महाराज देवळेकर आणि श्रीपादतीर्थ स्वामी महाराज यांचे जिप्सीद्वारे स्वागत करण्यात आले. जयशंकर उद्यानापर्यंत ही मिरवणूक मोठ्या उत्साहात पार पडली. तेथे छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांना हार अर्पण करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यानंतर शिवरायांची पालखी विजय चौकाच्या दिशेने मार्गस्थ झाली. या पालखीत लहान वारकरी मंडळ, भगवा ध्वज, भजनी मंडळ तसेच हलगी वादकांचा सहभाग होता. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि भक्तीमय वातावरणात पालखी विजय चौकात पोहोचली. येथे पालखी, महाराजांचे फुलांच्या वर्षावात भव्य स्वागत करण्यात आले. अबदागिरी, मशाली आणि भगवा ध्वजांनी सजलेले पालखीचे स्वरूप सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.




### डॉ. आंबेडकर मागासवर्गीय संस्थेच्या सामुदायिक विवाह सोहळा अध्यक्षपदी शिंदे

**अक्कलकोट, दि २ एप्रिल-**

अक्कलकोट येथे शिव बसव डॉक्टर बी.आर. आंबेडकर मागासवर्गीय सामाजिक संस्थेच्या सामुदायिक विवाह सोहळ्याच्या अध्यक्षपदी किशोर शिंदे यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी एकनाथ बनसोडे, सचिव सोनू राजापूरे, खजिनदार श्रीशैल कारागीर, सहकार्याध्यक्ष अजय होटकर आदींची निवड करण्यात आली. विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले आहे. यासाठी पदाधिकाऱ्यांची निवड दोड्याळ येथील नडगम यांच्या शेतात झाली. नूतन पदाधिकाऱ्याचां उपस्थित मान्यवराच्यां हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थापक अध्यक्ष संदीप मडिखांबे, नगरसेवक अविनाश मडिखांबे, प्रहार संघटनेचे शहर अध्यक्ष अमर शिरसाट, वंचित बहुजन आघाडीचे युवा तालुका अध्यक्ष शिलामणि बनसोडे, वंचित बहुजन आघाडी माथाडी कामगार आघाडी अध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे, आरपीआय आठवले गटाचे अध्यक्ष अजय मुकणार, आरपीआय जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन आशीष गायकवाड यानी केले. संस्था अध्यक्ष संदीप मडिखांबे यानी आभार मानले.





## हजारो भाविकांच्या उपस्थितीत रथोत्सवाने मल्लिकार्जुन यात्रेची सांगता

'हर हर महादेव, श्रीशैल मल्लीकार्जुन महाराजकी जय'चा जयघोष व शोभेच्या दारुची आतषबाजी

**तभा वृतसेवा**
**अक्कलकोट, दि २ एप्रिल-**

श्री मल्लिकार्जुन यात्रेची सांगता हजारो भाविकांच्या उपस्थितीमध्ये रथोत्सवाने झाली. यावेळी हजारो भाविकांनी रथ ओढला. हर हर महादेव श्रीशैल मल्लीकार्जुन महाराज की जयच्या घोषाने व शोभेच्या दारुच्या भव्य आतषबाजीने सारा आसमंत दुमदुमून गेला.

एकादशी ते पोर्णिमा नंदिध्वजाची रोज शोभा यात्रा व सांगता भव्य मिरवणुक हलगी ढोल, आकर्षक विद्युत रोषनाईने सजलेले होते. नंदिध्वज पांढरे शुभ्र बाराबंदी पोशाख घातलेले युवक मल्लीकार्जुन मंदिर परिसरात हजारो भाविकांनी गजबजले होता. यात्रा सोहळ्यात विरक्त मठ, अक्कलकोटचे म.नि.प्र. बसवलिंग महास्वामीजी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, अतुल बऱ्हाणपूरे, श्री मल्लिकार्जुन देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवलिंग स्वामी, प्रथमेश इंगळे, विश्वस्त प्रकाश उण्णद, स्वामिनाथ हिप्परगी, बसलिंगप्पा खेडगी, महेश हिंडोळे, राजशेखर नागुरे, प्रा. विजयकुमार लिंबीतोटे, शिवकुमार कापसे, प्रशांत लोकापुरे, नंदिध्वजाचे मानकरी पाटील, रोडगे, नंदिकोले, अडवितोटे, लिंबीतोटे परिवार आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रामदैवत मल्लीकार्जुन यात्रेनिमित्य पहाटेपासून भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. पारंपारीक धार्मीक विधी, रुद्राभिषेक, होम हवन पुजन कार्यक्रम संपन्न झाले. दुपारी शहरातील प्रमुख मार्गावरून नंदीध्वज मिरवणुक विविध वाद्यांच्या गजरात निघाली. श्री मल्लीकार्जुन मंदिरास नांदीध्वजानी पाच प्रदक्षिणा घातल्या. हजारो भाविकानी श्रीच्या जय घोषात छत्रपती शिवाजी महाराज चौक ते मंदिरापर्यंत रथ ओढला पुन्हा रथ मंदिरापासुन मुळ स्थानापर्यंत भाविकांनी रथ ओढला. यावेळी शोभेच्या दारूची भव्य आताषबाजी झाली.

याप्रसंगी चोळप्पा महाराजांचे वंशज धनंजय पुजारी, अप्पू महाराज पुजारी, अन्नछत्र मंडळाचे पुरोहित, अप्पू पुजारी, सुधाकर पुजारी, संदेश पुजारी, अनुप पुजारी, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, पाणी पुरवठा सभापती देवीदास कवटगी, उपसभापती अप्पासाहेब पाटील, नगरसेवक तम्मा शेळके, नगरसेवक अविनाश मडीखांबे, अॅड. फहीम पिरजादे, झिपरे परिवार आदी भक्त उपस्थित होते.



### डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी रोहित गायकवाड

**कुरुल, दि २ एप्रिल-**

मोहोळ तालुक्यातील कुरुल येथील भीमशक्ती तरुण मंडळाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त जयंती उत्सव समितीची अध्यक्षपदी रोहित गायकवाड तर उपाध्यक्षपदी बाबा गायकवाड यांची निवड करण्यात आली.



समितीची बैठक परशुराम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व लक्ष्मण भालेराव यांच्या अध्यक्षस्थानी झाली. धनाजी चंदनशिवे यांनी प्रास्ताविक केली. यावेळी समाधान गायकवाड, संजय भालेराव, शंकर भालेराव, परशुराम गायकवाड, आदर्श भालेराव, नागेश भालेराव आदींची उपस्थिती होती. यावेळी जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन तसेच डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य-दिव्य मिरवणूक काढण्यात येणार असल्याचे ठरले.